
# माणूस

१६ एप्रिल १९८३
दोन रुपये



## चाळीस गावातल्या लोकांवर विषप्रयोग !

साप्ताहिक
# माणूस
◻
वर्ष : बाविसावे
अंक : चव्वेचाळीसावा
◻
१६ एप्रिल १९८३
किंमत : दोन रुपये
◻
संपादक
श्री. ग. माजगावकर
◻
सहाय्यक
दिलीप माजगावकर
सौ. निर्मला पुरंदरे
◻
वार्षिक वर्गणी
पन्नास रुपये
◻
प्रकाशित लेख, चित्रे इत्यादीबाबतचे हक्क स्वाधीन. अंकात व्यक्त झालेल्या मतांशी चालक सहमत असतीलच असे नाही.
◻
राजहंस प्रकाशन संस्थेच्या मालकीचे हे साप्ताहिक संस्थेतर्फे मुद्रक व प्रकाशक श्री. ग. माजगावकर यांनी साप्ताहिक मुद्रण, १०२५ सदाशिव, पुणे येथे छापून तेथेच संस्थेच्या कार्यालयात प्रसिद्ध केले.
◻
। पत्ता ।
साप्ताहिक माणूस
१०२५ सदाशिव, पुणे ३०
दूरध्वनी : ४४३४५९
◻
मुखपृष्ठ
सुभाष अवचट

# इथून–तिथून

## लष्करी कायदा : बेनझीर

भुट्टोकन्या बेनझीर हिची कराचीच्या न्यायालयातील जबानी लक्ष वेधून घेणारी आहे.

साक्ष देताना तिचा प्रत्येक शब्द पूर्वीसारखाच ठाम होता. तोच निर्धार, तोच बाणेदारपणा आणि तेच वाक्चातुर्य बेनझीरच्या न्यायालयीन साक्षीत पुन्हा एकदा प्रत्ययास आले.

इस्लाम आणि लष्करी कायदा या दोहोंमधील भिन्नता स्पष्ट करताना ती म्हणाली, 'इस्लाम सर्वसाक्षी देवापुढे विनम्र होण्याचे आवाहन करतो. मात्र लष्करी कायदा केवळ कायदाच शिरसावंद्य मानण्यास सांगत नाही. लष्करी अधिकाऱ्यालाच सर्वेसर्वा मानून त्याच्या कोणत्याही कृत्याला विनाआक्षेप मान्य करण्यास भाग पाडतो. तो इतर नागरिकांना आपले अंकित करण्याचा प्रयत्न करतो. इस्लामची भूमिका यापेक्षा पूर्णपणे निराळी आहे.'

याच जबानीत बेनझीरने 'क्रांती' बद्दलचेही आपले विचार स्पष्ट केले. ती म्हणते– 'ज्या वेळी शासन जनतेच्या इच्छेला मान न देता, 'जैसे थे' कायम ठेवण्याचा प्रयत्न करते त्या वेळी क्रांतीचा उठाव होतो.'

दोन वर्षांच्या अज्ञातवासानंतर बेनझीर प्रथमच सर्वांना साक्षीदाराच्या पिंजऱ्यात दिसली !

## 'ऑपरेशन ट्रॉल'

सध्या रशियन अर्थव्यवस्थेवर बाह्य दबावापेक्षा अंतर्गत दबाव फार मोठा आहे. रशियातील अर्थव्यवहारावर सुस्ती चढली आहे. कम्युनिस्ट राजवटीच्या प्राथमिक कालातील कार्यतत्परता, चपलता आणि कामसूपणा रशियन लोकांमध्ये कमी झाला आहे. कामात टाळाटाळ करणे, दिरंगाई करणे, काम सोडून बाजारहाटाला जाणे, हॉटेलात सिगरेट शिलगावीत गप्पा मारीत तासन्तास बसणे, मद्यगृहात मद्यपान करत बसणे अशा वायफळ गोष्टींमध्ये रशियन लोकांनी जास्त लक्ष घातले आहे.

याविरुद्धचा उपाय म्हणून 'ऑपरेशन ट्रॉल' सुरू केला. कामाच्या वेळी वरील प्रकारे कामाचे ठिकाण सोडून इतरत्र वेळ घालविणाऱ्यांचा छडा लावण्याचा प्रयत्न झाला; मात्र रशियन सरकारच्या कारवाईचा परिणाम या कामचुकार लोकांवर झाला नाही. त्यांनी आपला निरुद्योग चालूच ठेवला.

अखेर अॅन्ड्रोपोव्हनी नवीन उपाय योजला. या कामचुकारांना काम सोडून हिंडण्याची संधीच मिळू नये म्हणून कामाच्या वेळाव्यतिरिक्त कचेरीच्या वेळेनंतर म्हणजे संध्याकाळपासून रात्री उशीरापर्यंत बाजारहाटासाठी दुकाने उघडी ठेवावीत असा सरकारी आदेश जारी केला.

अॅन्ड्रोपोव्ह यांचा हा सरकारी आदेश रशियन लोकांना क्वचित अचूक लागू पडेल. मात्र भारतात असा आदेश म्हणजे कामचुकार सडकयात्रींना नामी संधीच !

## प्रतिमा बेदी

होय तीच ! मुक्त स्त्री-पुरुषसंबंधांचा पुरस्कार आणि आचरण करणारी प्रतिमा बेदी.

कबीर बेदीची एकस पत्नी. बॅ. रजनी पटेलांबरोबरचे संबंध खुल्लम खुल्ला पुस्तक रूपाने प्रसिद्ध करणाऱ्या प्रतिमा बेदीने नुकतीच एका वार्ताहराला मुलाखत दिली. त्यामध्ये नेहमीप्रमाणे स्वतःबद्दल सर्व खुल्लम खुल्ला सांगितले आणि या मुलखावेगळ्या जंत्रावळीत दिलीपकुमारही गोवला गेला. तिच्या म्हणण्याप्रमाणे श्रेष्ठ अभिनेता दिलीपकुमार सभ्य, सज्जन गृहस्थ नाही, तर आहे एक बदफैली... !

प्रतिमा बेदीचे हे उद्गार कसेही असोत. एक गोष्ट निश्चित. अशा ह्या बेफाम ढंगामुळेच ती मर्कंटलीलाफेम आय. एस. जोहरांची जवळची सखी असावी.

–जगदीश

# मुंबापुरी

कॅग (CAG). म्हणजे सिटिझनस् अॅक्शन ग्रुप–नागरिक कृतिसंघ. मुंबापुरीच्या वाढत्या नागरी समस्यांवर उपाय शोधून काढण्यासाठी स्थापन झालेला स्वयंस्फूर्त संघ. 'जन्टलमन' ह्या मासिकाचे संपादक मिनाझ मर्चंट ह्यांनी पुढाकार घेऊन 'कॅग' ची स्थापना केली.

कोणतीही समिती स्थापन झाली की, तिला उपसमिती लागते, तशी 'कॅग'ची एक उपसमिती आहे. तिचे सदस्य आहेत, 'टाटा सन्स अँड लिमिटेड'चे अध्यक्ष साबावाला, एम्. आर्. पै, मिनाझ मर्चंट आणि 'क्लीन बॉम्बे'च्या मिसेस सेठना.

मागच्या आठवड्यात ह्या कृतिसमितीने मसजिदबंदरजवळील मांडवी भागाला भेट द्यावयाचे ठरविले. फ्लोरा फाउंटनमधून दोन गाड्या करून पत्रकारांसहित समिती पाहणीस निघाली. मांडवी म्हणजे देशातील एकमेव बाजारपेठ ! सर्वाधिक लोकवस्तीचा भाग. धान्याची, तेलाची, मसाल्यांची, रंगांची आणि औषधांची जवळजवळ पंधरा हजार गुदामे ह्या अर्ध्या मैलाच्या परिसरात आहेत. शिवाय दोनएक हजार ट्रॅन्स्पोर्ट ऑफिसेस. दररोज जवळजवळ ऐंशी हजार लोकांची ह्या भागात ये–जा असते.

मार्गातल्या गल्ली-बोळात मोठमोठे ट्रक्स उभे केलेले. त्यामधून वाट काढीत जाणारे हातगाडीवाले. पाठीवरून धान्याची पोती वाहून नेणारे माथाडी कामगार. दिसेल तेथे गाळे टाकून बसलेले फेरीवाले. सर्वत्र एकच दुर्गंधी पसरलेली. रस्त्यांवर महिनोन् महिने कचरा साठून राहिलेला. महापालिकेची गाडी म्हणे आतपर्यंत येऊच शकत नाही !

कृतिसमिती काही अशा वातावरणात वाढलेली नाही. मांडवी पाहून ते दिङ्मूढ झाले. क्रॉफर्ड मार्केट ते मसजिदबंदर मिसेस सेठना नाकाला रुमाल लावून आल्या. मांडवीच्या व्यापाऱ्यांना त्यांनी सभेत ठणकावून सांगितले,

" वाय कान्त यू पीपल तेक इनिशिएतिव्ह अॅन् क्लीन द रोदस् ? आइ स्ते अॅत नेयियनसी रोद अॅन् वी क्लीन अव सराउंदिंग्स् ! वाय कान्त्यू पीपल दू दॅत् ?"

ह्या सगळ्या इमारती जमीनदोस्त केल्याशिवाय हा भाग सुधारणार नाही असे साबावालांचे स्पष्ट मत पडले. (आइ व्ह सीन लंदन अॅन् न्यूयॉर्क ! इफ् दे कॅन् मेन्तेन दोज सितीज क्लीन वाय कान्त वी दू दॅत हियऽ?')

मांडवी पाहून कृतिसमिती चिंताक्रांत झाली. ह्या मुंबापुरीचे आता काय होणार ह्या प्रश्नाने त्यांना पुरते ग्रासून टाकलेले दिसले. मांडवीतून साबावालांच्या एअरकण्डिशण्ड ऑफिसमध्ये आलो तेव्हा कोठे सर्वांना हायसे वाटले. मिसेस सेठनांनी रुमाल पर्समध्ये ठेवला. चर्चेत असे ठरले की, मेच्या मध्याशी ताजमहालमध्ये दोन दिवसांचे एक सेमिनार घ्यावे. शहरातील नागरी समस्यांशी संबंधित असलेल्या चाळीसएक संस्थांना निमंत्रित करावयाचे ठरले.

पण ह्या सेमिनारचा उद्देश काय ? 'वेल, दे विल डिस्कस व्हेरियस प्रॉब्लम्स् कन्फ्रॉंटिंग द सिटी अॅन अराइव्ह अॅट ए कन्सेन्सस रिगार्डिंग सोल्युशन्स टु सॉल्व्ह देम.'

ह्या सेमिनारसाठी एक कृतिसमिती नेमावयाचे ठरले. शहर सुधारण्याच्या साऱ्या सूचना एकत्र करून ही समिती त्या महापालिका आणि राज्यसरकारला सादर करणार. आता कोठे समितीचा जीव भांड्यात पडला.

लहानपणी वडिलांबरोबर जवळच्या एका खेड्यात ट्रेनिंग कॉलेजच्या कॅंपला गेलो होतो. गावात पाण्याची टंचाई. तलावात गाळ साचून राहिला होता. मुलांनी कमरा कसल्या आणि तलाव खोदून दिला.

कन्सर्नड अथॉरिटीजना अॅप्रोप्रिएट रिकमेंडेशन्स' करण्यासाठी विद्यार्थ्यांनी 'अॅक्शन कमिटी' स्थापन केल्याचे मात्र मला आठवत नाही.

## राज करेगा खालसा !

कॉंग्रेस आयवाल्या रमेश दुब्यांचा दणदणीत पराभव करून पुरोगामी लोकशाहीदलाचे मनमोहनसिंग बेदी महापौरपदी निवडून आले हे एका अर्थी बरंच झालं. अन्यथा पुलोद आघाडीचे अक्षरशः बाराच वाजले असते. (चुकलो–सरदार बेदीसाहेब, राग मानू नका हं !) आता कायंय की, बेदी निवडून आल्यामुळं पुलोद आघाडीची एकजूट कशी अभेद्य राहिली आहे. आता वर्षभर पुन्हा भांडायला मोकळे !

बेदींना घसघशीत १०२ मते मिळाली. तर दुब्यांकडे ३२ मते गेली. कॉंग्रेस (आय) शी तडकाफडकी काडीमोड घेऊन, पुलोदशी सोयरीक जमवून शिवसेनेने हात दाखवून अवलक्षण की कायसं म्हणतात ते करून घेतलं. सेनेचा डोळा स्थायीसमितीवर होता. अगदीच काही नाही तर शिक्षण किंवा सुधारसमिती मिळाली असती तरी सेनेनं आनंद मानला असता; पण सेनेला काहीच मिळालं नाही. आपापसात कज्जे करणाऱ्या पुलोद मंडळींनी सेनेच्या बाबतीत मात्र एकमुखी निर्णय घेतला. तरी सेनेने बेदींना पाठिंबा देऊन पुलोदवरची आपली स्वामीभक्ती सिद्ध केली. मराठी बाणा म्हणतात तो हा !

बेदी बिनविरोध निवडून यायला आतुर होते. तेवढ्यासाठी ते वसंतदादांना भेटून आले. दादा देवरांशी बोलले. देवराही जवळजवळ तयार होते म्हणतात; पण डॉ. रवींद्र कुळकर्णीच्या कडव्या विरोधापुढे सगळे नमले. शिवाय आय कॉंग्रेस नगरसेवकही बेदींना बिनविरोध निवडून आणण्याच्या मूडमध्ये नव्हते. शेवटी दुबे उभे राहिले. निकाल जाहीर झाल्यानंतर दुबे पत्रकारांना म्हणाले-'कोई बात नही. ऐसेही नाच करते करते एक दिन शादी हो जायेगी.' दुब्यांचा हा दुसरा की तिसऱ्यांदा पराभव झालाय. आता आणखीन किती वेळा हा असा नाच करणार कोण जाणे !

बेदींची निवड सुरळीत झाली. क्रॉस वोटिंग झालं नाही. तीन अपक्ष नगरसेवक वगळता सभागृहात उपस्थिती शंभर टक्के होती. मतमोजणी सुरू होताच कमलाकर ठाणेकर-जगजीवन तन्नाप्रभृतींनी 'सत् श्री अकाल'चा नारा लावायला सुरुवात केली. त्यामुळे प्रेक्षकांच्या गॅलरीत उभे असलेले पंजाबी 'पुलोद जिंदाबाद' ओरडू लागले.

महापालिका हपिसासमोर भांगडा सुरू होता तर आत सभागृहात नगरसेवकांचं पिंगा–नृत्य सुरू होतं. आता वर्षभर हे नृत्य सुरू राहील.

हातात सोन्याचा कडा आणि वीतभर

उंचीची 'फर कॅप' लावून आलेले मावळते महापौर डॉ. प्रभाकर पै नंतर एका कोपऱ्यात जाऊन बसले. उगवत्या सूर्याची पूजा कशी करायची ते नगरसेवकांना शिकवायला नको!

बेदींची पाच-सहा हॉटेलं आहेत. 'शेरे-पंजाब' 'हॉटेल डिप्लोमॅट' वगैरे. त्यामुळे जावे तेथे खावे वंशाचे ते आहेत. त्यांच्या दृष्टीने बेदींची निवड हा शुभशकून आहे. बेदींनी निवडणुकीच्या आदल्याच दिवशी काँग्रेसवाल्यांना सोडून उरलेल्या सगळ्या नगरसेवकांना जेवू घातलं. शिवसेनेचे लोक मात्र आले नाहीत. उगाच वर्षभर खाल्ल्या मिठाला जागावं लागेल. निवडणुकीच्या दिवशीही बेदींतर्फे भोजनाची चोख व्यवस्था होती. 'बोलो-राज करेगा खालसा!' आता वर्षभर पालिका बैठकींची सुरुवात 'वंदे मातरम्' ऐवजी 'वदनी कवळ घेता नाम घ्या श्रीहरीचे' ने करायला हरकत नसावी. काय बेदीसाहेब, आपकी क्या राय है?

— विष्णू जयदेव

मुंबई वार्ता

# आंधळं दुर्लक्ष नि आंधळं कवटाळणं

'स्टुडिओ ट्वेंटीनाइन' या मुंबईच्या आधुनिक डिस्को क्लबमध्ये इंग्रजी नाटकं झाल्याचं नुकतंच वाचनात आलं. विशेष म्हणजे या नाटकांमध्ये ब्रॉडवेची मूळ आणि जुनी शैली जशीच्या तशी मांडण्याचा प्रयत्न म्हणे केला गेला.

नव्या काळातल्या परिस्थितीची, प्रगत आणि आधुनिक तंत्राची मुळीच खबरबातही न घेणाऱ्या आणि 'जुन्या ब्रॉडवे'त रममाण इत्यादी होणाऱ्या या प्रयोगाबद्दल वाचलं आणि तेवढ्यातच 'भारतीय इतिहास पुनर्लेखन संस्थे'नं आयोजित केलेल्या 'हिंदु परंपरेतील नृत्य आणि नाट्य' अशा शीर्षकाच्या एका परिसंवादाला जाण्याचा योग आला.

ब्रॉडवेची सहीसही केलेली नक्कल जर आपल्याला सहन होऊ शकते, तर 'हिंदु परंपरा' या शब्दानंही बिचकण्याचं काही कारण नाही असं मी ठरवलं! एखादा विद्वत्तापूर्ण अभ्यास असेल, सरळ, स्वच्छ मनानं केलेलं आणि वास्तवाच्या, सत्याच्या कसोटीवर उतरणारं ऐतिहासिक संशोधन असेल, तर त्याचं केव्हाही स्वागतच करायला हवं. मग ते हिंदु- भारतीय असो की ग्रीक.

असे व्यवस्थित तर्कसुसंगत विचार करून ठाण्याच्या गडकरी रंगायतनमध्ये पोचले. परिसंवादात भाग घेणारी मंडळी प्रसिद्ध विद्वान होती. काही आपल्या कलागुणांमुळे चांगल्याच प्रसिद्धीला आलेल्या नर्तिकाही परिसंवादात भाग घेणार होत्या. या सर्वांमुळे कार्यक्रमाबद्दल प्रथमदर्शनी मतही असं अनुकूल बनलं की, ही सारी अभ्यासू मंडळी, आपण विचारपूर्वक केलेल्या अभ्यासाचे काही निष्कर्ष सांगतील.

कार्यक्रमाच्या सुरुवातीलाच मंडळातर्फे प्रसिद्ध केल्या जाणाऱ्या त्रैमासिकाचा 'इतिहासपत्रिके'चा चालू वर्षातला पहिला अंक आणि त्या अंकाची पुरवणी हातात पडली. त्याच्या संपादकीयातून आणि प्रस्तावनेतून मंडळाच्या एकूण कामाबद्दल आणि त्या कामामागच्या प्रेरणेबद्दल बरंच काही लक्षात आलं.

इतिहासाचं पुनर्लेखन का आणि कशासाठी, त्याचबरोबर कसं? —असे काही साहजिकच प्रश्न होते. त्यामधल्या 'कशासाठी'चं उत्तर देताना प्रस्तावना म्हणते, 'दिवसेंदिवस आपलं ज्ञान वाढतं आहे, त्याबरोबर इतिहासाविषयीही नवी नवी माहिती हाती येते आहे. नव्या तंत्रांनी नवीन पुरावे उपलब्ध होताहेत आणि म्हणूनच इतिहासाविषयी पुनर्विचार आणि पुनर्रचना करण्याची वेळ आली आहे...आपण एखाद्या नव्या माहितीबद्दल कसा प्रतिसाद देतो? स्वातंत्र्य, विचारांचा मोकळेपणा अशा विषयांवर आपण बोलतो तर पुष्कळ; पण दुर्दैवानं आपल्या 'कंडिशण्ड' वृत्तीमुळे आपण नव्या शोधांकडे आणि दृष्टिकोनांकडे द्यावं तितकं लक्ष देत नाही. आपल्या इतिहासतज्ज्ञ आणि विद्वानांविषयीही हेच खरं आहे आणि त्यामुळे आपण सत्यापासून दूर जातो.' प्रस्तावनेनं या संदर्भात ब्रुनरनं केलेल्या एका प्रयोगाचं उदाहरण दिलं आहे. पत्त्यांमध्ये चौकट आणि बदाम लाल आणि किलवर, इस्पिक काळे असतात आणि याबाबत आपण अधिक विचार करत नाही. ब्रुनरनं केलेल्या प्रयोगात, इतर पत्त्यांबरोबर इस्पिकचे लाल पत्ते दाखवले गेले आणि प्रेक्षकांनी ते बदामचेच आहेत असं म्हटलं. म्हणजेच पूर्वग्रहाच्या दोषामुळं नवीन माहिती येण्याचा रस्ता बंद झाला. इतिहासाविषयीही तेच म्हणता येईल.

इथपर्यंत सर्व ठीक आहे; पण या इतिहासाच्या पुनर्लेखनाविषयी या मंडळाची दृष्टी काय आहे, याचा पुरावा त्यांच्या पत्रिकेच्या संपादकीयातून मिळतो. त्यांची स्वतःची नजर कितपत साफ आहे आणि त्यामध्ये काही पूर्वग्रहाचे दोष आहेत का तेही या संपादकीयातून स्पष्ट होतं— 'गेल्या काही वर्षांत गरिबी हटवणाऱ्या आणि समानता आणणाऱ्या बऱ्याच अनेक कलमी कार्यक्रमांचा आपल्यावर वर्षाव झाला आहे. पक्षांची धोरणं निरनिराळी असल्यामुळे असलेल्या कार्यक्रमांबाबत एकवाक्यता दिसून येत नाही; पण भारतीय नागरिकांनी एकमतानं एक तीन कलमी कार्यक्रम मात्र स्वीकारला आहे आणि तो म्हणजे आपल्या प्राचीन इतिहास, धर्म आणि संस्कृतीकडे अज्ञान, दुर्लक्ष आणि ...आपण तथाकथित आधुनिक, शास्त्रीय निधार्मिक तत्त्वांचा पुरस्कार केला आणि त्यामुळे समता, शांती, सामंजस्य येईल अशी आपली समजूत होती; परंतु तसं काहीही आपल्याला यामधून मिळालं नाही. मात्र आपल्या प्राचीन इतिहास आणि संस्कृतीबद्दलचा आपला अभिमान, आदर आणि विश्वास तेवढा साफ पुसला गेला!' (स्वैर अनुवाद.)

संपादकीयातल्या समजुतीमुळे यामागची पार्श्वभूमी स्पष्ट झाली आणि इतिहास-संशोधनातले नवे रस्ते शोधणारी ही माणसं काही रस्ते पूर्णपणे बंद करून किंवा खरं म्हणजे काही ठराविक रस्त्यांनीच जायचं

असं 'ठरवून निघाली आहेत की काय, अशी दाट शंका निर्माण झाली आणि नंतरच्या कार्यक्रमातून तिला पुष्टीही मिळत गेली.

हिंदु, हिंदुत्वनिष्ठ किंवा हिंदुपरंपरा या साऱ्या गोष्टी सरळ आणि वस्तुनिष्ठ– नजरेनं पाहिल्या जात नाहीत हे खरंच आहे. म्हणजे असं की, या विषयांचा अभ्यास करणाऱ्यांची मतं या विषयाच्या अनुकूल किंवा प्रतिकूल आधीच बनलेली असतात. प्रत्येक वेळी ती पुरेशा अभ्यासावर आधारलेली असतात असंही नाही आणि एकदा मत बनल्यावर नव्यानं येणारे पुरावे बहुधा कोणी नव्यानं तपासून पहात नाही. थोडक्यात हे ब्रुनरच्या प्रयोगात उल्लेखित केलेलं 'कण्डिशनिंग 'च झालं.

तेव्हा ह्या सर्व विचाराच्या पार्श्वभूमीवर 'हिंदु नृत्य–नाट्यपरंपरे' वरची व्याख्यानंही स्वच्छ मनानं–अर्थात शक्य तितक्या– ऐकावी असं ठरवलं. त्यामुळं व्याख्यात्यांचे दृष्टिकोन, त्या दृष्टिकोनातल्या उणीवा आणि मर्यादाही स्पष्टपणे लक्षात आल्या.

'नाट्य आणि नृत्य यांचा परस्पर संबंध' 'संस्कृत नाट्यसिद्धीचे महत्त्वाचे पैलू', 'प्राचीन नृत्य व नाट्यपरंपरेच्या जोपासनेतील देवालयाचा सहभाग', 'प्राचीन नाट्यनिर्मिति–विश्लेषण'–ही या परिसंवादातली काही महत्त्वाची व्याख्यानं. सर्वसाधारण सिद्धांतात्मक बाजू या व्याख्यानांतून मांडली गेली. यापैकी 'संस्कृत नाट्यसिद्धीचे महत्त्वाचे पैलू' या विषयावर बोलताना भरतानं ज्यानं नाटकाचा रसभंग होईल अशा कोणत्या चुका किती तपशीलवार दिल्या आहेत इत्यादींची एक जंत्रीवजा माहिती होती. 'प्राचीन नाट्यनिर्मिति-विश्लेषण' यामध्ये प्राचीन रंगभूमीचं स्वरूप आणि त्यामुळं नाटकांच्या स्वरूपावर होणारा परिणाम इत्यादींची माहिती होती. जुनी नाटकं आज सादर होताना शक्यतो जुन्याच पेहेरावात मांडली जावीत असंही एक मत या भाषणात व्यक्त झालं.

पण सर्वांत महत्त्वाचं भाषण म्हणजे 'नाट्य आणि नृत्य यांचा परस्पर संबंध' या विषयावरचं. व्याख्यात्यांनी सुरुवातीला आपली नाट्यपरंपरा किती प्राचीन आहे इत्यादींवरची आपली मतं नोंदवली. आपली नाट्यपरंपरा ख्रिस्तपूर्व आहे. तिच्यावर ग्रीक नाटकांचा प्रभाव नाही. यवनिका म्हणजे पडदा या शब्दाचा यवन म्हणजे ग्रीक या शब्दाशी संबंध नसून त्याचं मूळ संस्कृत धातूमध्ये शोधता येतं, इत्यादी. यानंतर भरतानं प्रेक्षागृहाची रचना कशी सांगितली आहे, तिची लांबी–रुंदी काय असावी, तिची विभागणी कशी करावी, तिला दरवाजे कुठे असावेत या बाबतीतल्या भरताच्या विवेचनाचा परामर्ष घेतला. यानंतर रसास्वाद, रसाचं आनंदमय स्वरूप याविषयी बोलून 'विभाव अनुभाव व्यभिचारी भाव। संयोगात रसनिष्पत्ति' ही भरतानं दिलेली रसनिष्पत्तीसंबंधीची प्रसिद्ध व्याख्या सांगून तिच्याबद्दलही विवेचन केलं. स्थिर भावना, क्षणिक भावना आणि भावोर्मींबरोबर असणाऱ्या शारीरप्रक्रिया हे या विभाव, अनुभाव, व्यभिचारीभाव या संज्ञांचे ढोबळ मानाने अर्थ आहेत आणि या तिन्हींच्या संगमामुळं रसनिष्पत्ती होते हा भरताचा सिद्धांत आहे.

विचाराचा मुद्दा असा आहे की, या सर्व विवेचनाचा आजच्या संदर्भात उपयोग काय किंवा तो कशा प्रकारे अर्थपूर्ण आहे, हे पहायला हवं. रंगभूमीची रचना यासारख्या पूर्णत: तांत्रिक गोष्टी तर दिवसेंदिवस अधिकाधिक विकसित होत जातात आणि जुन्या काळातल्या अभ्यासाला ऐतिहासिक महत्त्वापलीकडे स्थान उरत नाही. कारण नवीन घडणीमध्ये या जुन्या परंपरांचा विचार होकारात्मक अथवा नकारात्मक, कुठल्या तरी मार्गानं सामील असतोच.

रसविचारासारख्या विषयांबाबत मात्र असं म्हणता येणार नाही. ते चिरतरुण आहेत– म्हणजेच त्याविषयीचा विचार कधीही अनावश्यक ठरणार नाही. मात्र भरतापासून ते थेट आजवरच्या विचारवंतांनी भरताच्या अनुकूल अथवा प्रतिकूल लिहून एकूण रसविचारात भर टाकली आहे, तीही तितकीच चिरतरुण आणि कधीच अनावश्यक न ठरणारी आहे. रससिद्धांत म्हणजे भरत, भट्टनायक, अभिनवगुप्त अशी सोयीची चार नावं टाकून भागणार नाही. कारण अनेक समीक्षकांनी निरनिराळे दृष्टिकोन मांडताना रससिद्धांताचे नवे अर्थ लावले आहेत. नव्या उणीवा आणि मर्यादाही दाखवून दिल्या आहेत आणि रससिद्धांताच्या विवेचनात या सर्वांचा समावेश व्हायलाच हवा, तरच या 'ऐतिहासिक संशोधना'ला अर्थ असेल.

रसविचारांचं हे एक केवळ उदाहरण झालं. शेवटी हा प्रश्न निव्वळ कौतुक, आदरमिश्रित विश्वास किंवा विचक्षणपणे केलेली मीमांसा यामध्ये निवड करण्याचा आहे. आपल्या स्वकीय गोष्टींबद्दल आत्मीयता ही साहजिकच आहे; पण मग भारतीय गोष्टींबद्दल आंधळं दुर्लक्ष वांझ, तसं हे आंधळं कवटाळणंही अर्थहीनच. इतिहासाकडे पाठ फिरवू नये हे ठीक; पण तरीही मोहरा मात्र भविष्यकाळाकडेच वळवलेला असावा. इतिहासाचं पुनर्लेखन करावं, त्याचा अभ्यासही करावा; पण तरीही जगावं वर्तमानकाळात. तेही भविष्याच्या अंदाजानं. त्यामध्ये इतिहासातल्या खाच-खळग्यांनी आलेलं अंतर्मुख शहाणपण असावं; पण इतिहासाच्या कुबड्या असू नयेत. पूर्वजांच्या कर्तबगारीवर आपण जगावं आणि प्राचीन भारतात जलसिंचनव्यवस्था अशी होती आणि विजेचा शोध लागला होता अशा वल्गना कराव्या हा तर स्वत:ची निष्क्रियता लपवण्याचा प्रकार झाला.

तेव्हा प्राचीन भारतीय इतिहासाच्या पुनर्लेखनापासून ते ब्रॉडवेच्या अनुकरणापर्यंत आवश्यकता साऱ्याचीच आहे; पण इतिहासासारख्या सामाजिक शास्त्राच्या अभ्यासानं, स्वत:चं आणि सध्याच्या काळाचं पर्स्पेक्टिव यायला हवं, नजर विशाल व्हायला हवी. आंधळं अनुकरण आणि श्रद्धा असली, तर इतिहासाची विशेषत: त्यातल्या चुकांची पुनरावृत्ती व्हायला वेळ लागणार नाही !

–ललिता बर्वे


प्रसिद्ध झाले

## सांगत्ये ऐका

हंसा वाडकर

आवृत्ती चौथी

किंमत : चौदा रुपये

राजहंस प्रकाशन, पुणे

## चाळीस गावात विषप्रयोग

# हे पाणी पिण्यालायक नाही !

गेली काही वर्षे ग्रामीण भागात फिरताना, तेथील मित्रांशी, बोलताना अन्याय, दडपशाही, भ्रष्टाचाराचे विविध नमुने पाहिले होते, ऐकले होते. आदिवासी भागात काम करताना तर निर्लज्ज लाचखोरी, अनन्वित अन्याचार व क्रूरतेच्या कहाण्यांनी, अनुभवांनी अनेक रात्रींची झोप उडवली होती; पण हळूहळू याचीही सवय व्हायला लागते. काही काळाने मन थोडेसे निर्ढावते. थोडासा बनचुकेपणा येतो. कोणताही नवा किस्सा कानावर आला तरी हे सुन्नबधिर मन फारसे हालचाल करीत नाही.

परवा असेच काहीसे झाले. पनवेलजवळ साई गावी आदिवासींच्या सामुदायिक लग्नासाठी गेलो होतो. सोबत रंगीत रोल भरलेला कॅमेरा होता. जवळच्याच त रा गावी असलेल्या युसुफ मेहेरअली सेंटरमध्ये काम करणारा मदन मराठे भेटला. रंगीत रोल पाहून म्हणाला, एका ठिकाणाचा फोटो काढायचाय. 'रसायनी 'मधील कारखान्यांनी पिण्याच्या पाण्याच्या साठ्यात रासायनिक सांडपाणी सोडलंय. त्यामुळं पिण्याचे पाणी पिवळे होते. वास येतो. अंगाला खाज सुटते. मासे मरतात. त्या दूषित रंगीत पाण्याचा रंगीत फोटो घ्यायचाय.' थोड्याशा अनुत्साहानेच व केवळ त्याचे मन मोडायचे नाही म्हणून कबूल झालो. 'एखादा पाइप लिक झाला असेल किंवा नदीत थोडेफार पाणी झिरपत असेल.' चेंबूर, उल्हासनगर, ठाणे इ. ठिकाणच्या रासायनिक प्रदूषणाबद्दल ऐकून ऐकून बधिर झालेल्या मनाची ही थोडीशी 'असे व्हायचेच' टाइप टिपिकल 'बनचुकी' प्रतिक्रिया. त्यामुळे खरे तर जायला फारसा उत्साह नव्हताच.

लग्ने आटोपल्यावर दुपारी चारच्या सुमारास आम्ही निघालो. कोकणरेल्वेमुळे प्रसिद्ध झालेल्या 'आपटा' गावाजवळ 'चावणा पाणीपुरवठा योजनेचा' बंधारा आहे. त्या बंधाऱ्यावरूनच पलीकडे चावणा गावी जायला पायवाट आहे. बंधाऱ्यावरून थोडेसे पाणी वाहात होते. बंधाऱ्याला कामचलाऊ गेटस् (म्हणजे मोकळेच) आहेत. त्यातून धबाधबा पाणी वाहात होते पाण्याचा रंग बघितला आणि चक्क हादरलोच. शहरातून बाटल्यांमधून पायनॅपल स्क्वॅशचे जे कॉन्सेंट्रेट (सरबत नव्हे) मिळते तसा पिवळा रंग. बंधाऱ्याअलीकडचा डोह फारसा खोल नसूनही हिरवागार का दिसतो त्याचे रहस्य आता कळले. ते पाणी समोरच्या खडकांवरून पलीकडे जात होते. पुढच्या पात्रातल्या वाहत्या पाण्यात पांढरट चॉकलेटी मळीचे (scum) पुंजके खडकांना अडकून बसले होते. ताऱ्याला आलो की आपण हे पाणी पिनो. हे जेव्हा 'स्ट्राइक' झाले तेव्हा चक्क उलटापालटा आलो! हे झिरपलेले पाणी नव्हे. हे काही तरी भयानक आहे अशी अंधुकशी जाणीव होऊ लागली. त्याचे फोटो घेऊन निघालो. जवळच्या चावणा स्कीमच्या ऑफिसमध्ये चौकशी केली. वरच्या बाजूला नदीत कुठेकुठे सांडपाणी सोडलेय ते दाखवायला तिथला एक कर्मचारी तयार झाला.

जवळच्याच लाडिवली गावी 'लोना' कंपनीचा रासायनिक कारखाना आहे, तिथे गेलो. रस्त्यालगतच एका मोठ्या तलावात मोरपिशी रंगाचा ओलसर साका काठापर्यंत भरून वाहात होता. केमिस्ट्रीच्या सामान्य ज्ञानावरून मोरचूद असावे असा जाताजाता एक तर्क केला. त्यालगतच खालच्या पातळीवर त्याच रंगाच्या पाण्याने भरलेला, एक लांबरुंद तलाव होता. वरच्या तलावातून खालच्या तलावात पाणी येत असावे. कारण त्या भिंतीतून दोन-तीन मोठे पइप बाहेर आले होते.

तिथेच थांबून त्या सोबतच्या माणसाबरोबर कंपनीच्या कुंपणाशेजारून नदीकडे आलो. नदीला समांतर असलेल्या तारेच्या कुंपणाला लागून एक अरुंद, अवघडशी पायवाट जात होती, तिने थोडे पुढे गेलो. कुंपणाखालून तीन फूट रुंद असा एक चर नदीला मिळाला होता. पाणी वाहात नव्हते; पण ओलसर, निळसर काळी दलदल होती. त्या चराच्या काठावर निळ्या–पांढऱ्या क्षारांचा थर दिसत होता. ह्या चरातून फक्त रात्रीच्या वेळीच पाणी सोडले जाते असे तो सोबतचा कर्मचारी म्हणाला. परतताना आणखी एक चर खणलेला दिसला. तसाच क्षारांचा थर असलेला. तलावातल्या पाण्याची पातळी फार वाटली. हा चर वापरला जातो असे कळले. परतताना पाहिले तर दोन घट्टीकट्टी माणसे कुंपणाच्या आतून आमच्यावर लक्ष ठेवून होती.

तेथेच रस्त्यालगत एक पाइपलाइन दिसली. त्यातून ड्रेनेज व इतर सांडपाणी पुढे नेऊन सोडले आहे असे कळले. त्यालाच लोना कंपनीतून आलेला पाच-सहा इंच व्यासाचा पाइप जोडला होता. वरच्या तलावातून बाहेर येणारे दोन–चार पाइप पाहिले होते. तेव्हा हा पाइप म्हणजे नियमातून पळवाटा काढून केलेली धूळफेक असावी हे स्पष्टच होते.

पुढे निघालो. रसायनीच्या HOC कारखान्याजवळ रस्त्याखालून एक नाला गेला आहे. मातकट लाललाल पाणी आणि नाकातून थेट डोक्यात चढणारा दर्प. डोक्यात झिणझिण्या आल्या. बऱ्याच वर्षांपूर्वीचे कॉलेजच्या ऑर्गेनिक केमिस्ट्रीच्या लॅबमधले वास आठवले. पाठ केलेल्या टेस्टस् आठवल्या मेंदू ठणाणा करू लागला. ' Smell : Bitter Almonds then Benzaldehyde. '

### तडजोड, चालढकल नको !

त्याच नाल्याला पुढे एक दुसरा नाला मिळतो. त्या दुसऱ्या नाल्यातही असेच पाणी होते. त्यात HOC च्या जागेतल्या एका तलावातून पाणी येते असे कळले. त्या तलावात ड्रेनेजचे व कारखान्याचे सांडपाणी सोडतात म्हणे. तेथपर्यंत जाता मात्र आले नाही. थोडक्यात ह्या नाल्यांमधून HOC [Hindustan Organic Chemicals] HIL [ Hindustan Insechcides Limited] व MAIDC

च्या कृषी उद्योग खतकारखाना व त्याबरोबरच्या इतर लहानथोर रासायनिक कंपन्यांची कर्तबगारी दरवळत होती, वाहात होती.

हे दोन नाले एकत्र होऊन जिथे पाताळगंगेला मिळतात त्या ठिकाणी तो चावणा स्कीमचा माणूस आम्हाला घेऊन गेला. पहिली प्रतिक्रिया अतीव दुःखाची होती. डोळ्यांसमोर राजरोस चाललेला हा सामूहिक सरकारी विषप्रयोग पाहून मन विषण्ण झाले.दहा–बारा फूट रुंद पात्राच्या नाल्यातून गर्द मातकट लाल रंगाचे, उन्हात चमचमणारे ते विषारी पाणी खळखळत नदीच्या पात्रात शिरत होते. त्या मोकळ्या जागेतही तो उग्र दर्प भरून राहिला होता. चाळीस गावांना पाणी पुरवणाऱ्या योजनेच्या त्या साठ्यात हे विष एवढ्या मोठ्या प्रमाणावर चोवीस तास मिसळत असते. त्या दृश्याच्या खऱ्याखुऱ्या भयानक स्वरूपाचे पूर्ण आकलन होण्यास काही क्षण जावे लागले. त्यामागच्या अमानुष, जीवघेण्या अत्याचाराने, अक्षम्य भ्रष्टाचाराने बधिर मनाला देखील पिंजून टाकले. दुःखाची जागा संतापाने घेतली ओठ चावले गेले. हे सगळे थांबले पाहिजे आणि ते देखील ताबडतोब! चाळीस गावांतील निरपराध लोकांवर होणारा हा उघडउघड व अव्याहत विषप्रयोग ताबडतोब थांबला पाहिजे !

'हे पाणी पिण्यालायक आहे असा तज्ज्ञांचा अभिप्राय आहे' असली टिपिकल सरकारी उत्तरे आम्हाला नको आहेत. कारखान्यातून उग्र दर्प असलेले रंगीत पाणी पिण्याच्या पाण्याच्या साठ्यात सोडले जात आहे व अंगाला खाज आणणारे पिवळे पाणी लोकांना प्यायला लागत आहे, एवढेच आम्हाला कळते आणि ते ताबडतोब थांबले पाहिजे हा एकच उपाय आम्हाला कळतो. चाळीस गावांतल्या लोकांच्या जीवनमरणाच्या ह्या प्रश्नात कोणतीही तडजोड, चालढकल होऊ शकत नाही. हे पाणी पिण्यालायक असेल तर कंपन्यांनी खुशाल ते पंप करून आपल्या पाण्याच्या साठ्यात सोडावे.

रायगड जिल्ह्यातील पेण व पनवेल तालुक्यांतल्या चाळीस गावांना ह्या चावणा पाणीपुरवठा योजनेद्वारा पाणी पुरवले जाते. परदेशी सहकार्याने सुरू करण्यात आलेली ही योजना सध्या राज्यसरकारच्या ताब्यात आहे. मुंबई–पुणे रस्त्यावर पनवेलजवळच्या दांड गावाजवळून एक रस्ता 'रसायनी'ला जातो. हाच रस्ता पुढे आपटा गावावरून जाऊन मुंबई गोवा रस्त्याला तारा गावाजवळ मिळतो. रसायनी भागात अनेक लहानमोठे रासायनिक कारखाने आहेत. ह्या कारखान्यांचे दूषित सांडपाणी नाल्यांमधून पाताळगंगानदीपर्यंत पोचते. ह्याच नदीवर पुढे चावणा गावाजवळ पाणीपुरवठायोजनेचा बंधारा आहे. ह्या दूषित पाण्याचा त्रास गेल्या कित्येक वर्षांपासून ह्या भागातल्या लोकांना होतो आहे. आ. दि. बा. पाटलांच्या नेतृत्वाखाली काही वर्षांपूर्वी ह्याविरुद्ध आंदोलन उभे राहिले होते.त्या वेळी उपाय म्हणून सांडपाण्यासाठी पाइपलाइन टाकून ती दूरवर नेऊन सोडण्यात येईल असे आश्वासन दिले गेले. त्या पाइपलाइनच्या अपुरेपणाचा उल्लेख आधी आला आहेच. ती पाइपलाइन देखील समुद्रापर्यंत न नेता मध्येच अर्धवट सोडण्यात आली आहे. त्यामुळे इतर अनेक समस्या निर्माण झाल्या आहेत. ही पाइपलाइन असूनदेखील वर उल्लेखिलेल्या सरकारी नियंत्रणाखालील कंपन्या ( HOC, HIL, MAIDC ), लोना कंपनी व इतर लहानमोठे कारखाने आजही सांडपाणी सरळ नदीनाल्यात सोडत आहेत आश्चर्य म्हणजे ही गोष्ट राजरोस केली जाते. कोणीही त्याबद्दल चकार शब्ददेखील काढत नाही ! बरोबरच्या एका स्थानिक माणसानेच सांगितले की, ह्या भागातल्या प्रत्येक सरपंचाला महिना पाचशे रुपये पुरवले जातात ! ह्यात सत्याचा बराच अंश असावा. इतरांबद्दल कोण काय बोलणार ?

ताऱ्याच्या युसुफ मेहेरअली सेंटरने ह्या बाबतीत पुढाकार घेण्याचे ठरवले आहे. गावागावात प्रचार सुरू झाला आहे. सेंटरतर्फे रायगडचे सुप्रसिद्ध जिल्हाधिकारी श्री. अरुण भाटिया ह्यांना निवेदन दिले आहे. भाटियांनी स्वतः येऊन तो प्रकार डोळ्यांखालून घालावा असा प्रयत्न चालू आहे. गप्प बसलेले लोकप्रतिनिधी, अमानुष, लोकांच्या जिवावर उठलेल्या कंपन्या व निष्क्रिय भ्रष्टाचारी अधिकारी ह्यांच्यासमोर उभे राहून लोकांना न्याय मिळवून देण्याइतका तडफदारपणा आणि न्यायबुद्धी भाटियांजवळ आहे असे त्यांच्या आजवरच्या धडाकेबाज कारकीर्दीवरून वाटते. मध्यभारतातील 'केशरी डाकप्रकरण', दादरच्या कोहिनूर मिलमधले 'दूषित खाद्यतेलप्रकरण' ह्यांच्या मालिकेत 'चावणा पाणीपुरवठा योजना' जाण्याआधी भाटियासाहेब काही हालचाल करतात का पाहू या !

–सुबोध वागळे

# सणकीत

## 'आला का स्टाप?'

मुंबई.
मुंबईचं आकर्षण कुणाला नाही ? अगदी
भारतातल्या भिकाऱ्यापासून ते अमेरिकेतल्या
श्रीमंतापर्यंत सर्वांनाच मुंबईचं आकर्षण आहे.
नव्यानेच पोहायला सुरुवात करणाऱ्याला
जसे त्याचे सहकारी बिनधास्त पाण्यात
ढकलतात, थोड्या गटांगळ्या खाल्ल्यावर
तो कसा बदकासारखा अलगद पोहू लागतो,
त्याप्रमाणेच मुंबईच्या प्रचंड गर्दीत प्रथमच
आलेला, थोडा वेळ गुदमरतो. नंतर त्याला
स्वतःच्याच उच्छ्वासातली शुद्ध (!) हवा
घेण्याची 'हॅबिट' अंगवळणी पडते.
तर अशी ही मुंबई. नगरीत नगरी मुंबई !
मुंबईच्या प्रत्येक माणसावर एखादी कादंबरी
होऊ शकते हे आता सिद्ध झालंय.
'मुंबई' शास्त्रज्ञांपासून साहित्यिकांपर्यंत
आणि उद्योगपतीपासून स्मगलर्सपर्यंत
सर्वांनाच आव्हान आणि तारण ठरलीय.
परवा असंच या मुंबईच्या रंगीबेरंगी
गोधडीतला एक रंग बघायला मिळाला.
हा रंग तसा नवीन नाही. जुनाच; पण असे
रंग डोळ्यांसमोर येतात, तसेच ते नाकाकाना-तोंडातून सबंध शरीरभर पसरत
जातात आणि घड्याळाच्या लंबकाप्रमाणे
मनस्थिती होते.
समजा आपली वेळ चुकली असती,
ठिकाण बदलले असते तर

आपल्या आयुष्यालाही कदाचित हाच रंग आला असता. आपल्या रंगपेटीत नसलेला, मिश्रणाने तयार झालेला रंग...
वांद्र्याहून मुलुंडकडे जाणाऱ्या बसमध्ये बसलो होतो. चेंबूरहून मुलुंडकडे जाताना हायवेच्या सुरुवातीच्या स्टॉपवर दोन मुली बसमध्ये चढल्या. पैकी एकीचं लग्न झालेलं. बसने नेहमी प्रवास करणाऱ्या किंवा मुंबईची माहिती असणाऱ्या प्रवाशास एखाद्या स्टॉपवर कशा प्रकारची माणसं चढणार आहेत हे थोडंफार माहीत असतं. पुण्यात जसं गोखलेनगर, जनवाडी बसमध्ये एक ठराविक ' मॉब ' असतो, साधारण तसंच !
या दोन मुलींपैकी एकीनं साडी तर दुसरीनं स्कर्ट व वरती बुशकोटवजा काहीबाही. दोघींच्या कपड्यांचे रंग मद्रासी पिक्चरच्या पोस्टरसारखे अंगावर येणारे. पायात प्लास्टिकच्या चपला. आर्ट स्कूलमध्ये फिगर ड्रॉइंग करताना ' गेस्चर ' घेण्याचं तंत्र शिकलो, ते अशा वेळी उपयोगी पडते. कारण नंतर त्या मुली माझ्या मागच्या सीटवर बसल्या होत्या. तिकिट काढतानाच फक्त त्या माझ्यासमोर दोन मिनिटं होत्या. तेवढ्यात मी ' ड्रॉइंग ' कंप्लीट केलं !
' मोठ्यानं बोलणं ' तेही चारचौघात हा आपल्या नव्या संस्कृतीत ' अशिष्ट ' मानला गेलेला भाग. अर्थात या नव्या संस्कृतीपासून फारच अलग असलेल्या मुली व्यवस्थित ऐकू येईल अशा आवाजात बोलत होत्या. त्यांच्या भाषेत शहरी अशिक्षितपणा होता, तसाच धडगुजरीपणाही होता. तरीही त्या बोलत होत्या. स्वत:चीच भाषा बिनदिक्कत. मुंबईची कॉस्मॉपॉलिटिन भाषा.
त्यांच्या संभाषणातून एक जाणवत होतं, ती जी स्कर्टमधली मुलगी होती ती घरातून कशी-बशी बाहेर पडली होती आणि ठराविक वेळात तिला घरी परत येणं भाग होतं. शिवाय ती प्रथमच या भागाकडे जात असावी. कारण प्रत्येक दोन वाक्यांनंतर ती, ' अजून किती लांब आहे ?' असा प्रश्न बॅकग्राउंड म्युझिकसारखा टाकत होती. दुसरी म्हणे ' येऊ ग तीनपर्यंत. '
ती लगेच ' नायबां, मी नाय थांबणार इतका येल. आपुन येक वाज्ता निगू तिथून. नको साडेबारालाच निगू...'
' अग येऊ गं, पटकन !'
' नक्को, तुला काय बाय, मी कश्ये आल्ये मला मायत. आये लगीच मला इचारील कुनाबरोबर पिक्चरला गेलीती ? कटकट करीत न्हायल. कामाचे बी वांदे होतील. पानीबिनी भरायचं मला...आपुन लवकरच निगू...आला का स्टाप ?'
' आता थोडंच हाय, ही येवढी खाडी पार केली की...किती बदललं सारं...माग मी इथे आल्ये...'
' तू आल्ती इथं पयल्यांदा ?'
' ... हूं, तवा काय बी नव्हतं. आता केवढ्या झोपड्या झाल्यात. '
बस धावत होती हायवेवरून. त्यांचा तोंडाचा पट्टाही धावत होता. विक्रोळी सोडून भांडुपची मिठाची आगरं लागली. ती साडीवाली...
' हे बघ मीठ. इथं बनवतात. पाणी साठवून ह्याच्यात पकतं !' दुसरीचा धेडगुजरी प्रश्न.
' हां, फ्रीजमधी कसं पानी साठवून बर्फ करतात... ' म्हणजे या कुणा उच्च मध्यमवर्गीयाकडं कामाला असाव्यात. बोलण्यातला चेंबूर कॅम्पचा उल्लेखही त्याला जोड देणारा होता.
मिठाविषयीचं ' ज्ञान ' दिल्यावर त्या साडीवालीनं त्या आगराच्या आसपास असलेल्या झोपडीबद्दल सांगितलं . ' मी कध्धीच इसरणार नाय ती झोपडी. लग्नानंतर किती दिवस मी तिथंच होते...' ती भूतकाळात. दुसरीचा प्रश्न ' आला स्टॉप ?'
' येल, येवढं जाऊन फुढं बस्स वळली की आलं ! मग शांतता. नंतर स्कर्टवाली...कालपासन माझ्या पोटात दुखतंय–
' डॉक्टरला दाखव, गोळ्या देल. '
' पन...सांगायचं काय ?'
' काय नाय, पोट दुखतंय सांगायचं, ' त्यो ओळखतो.
त्यालाच बिचाऱ्याला शरम येते...
' जायाला पायजे...'
सर्दी-पडशाच्या दुखण्यासारखा तो विषय त्या बोलत होत्या. अगदी थंडपणे. गोळीवर पूर्ण विश्वास ठेवून नीतीच्या गोष्टी डॉक्टरवर सोपवून त्या चालल्या होत्या. एका गोळीत एक गोळा समूळ नष्ट करणार होत्या...
मुंबईच्या झोपडपट्ट्यात वाढणाऱ्या कुणाकडे तरी कामाला राहणाऱ्या अशा बऱ्याच मुलींच्या पोटात असे गोळे आणि गोळ्या यांचं युद्ध चालू असतं.. संपूर्ण असुरक्षित, नागरी सुविधांपासून वंचित अशा वस्त्यांतून वाढणाऱ्या या पोरी समज येतायेताच ' समजूतदार ' बनून जातात. झोपड्यांचे दादा, मटके, दारूवाले यांसारखे अनेक त्यांच्या शोधात असतात... अंगावर उभारी येईपर्यंत फाटक्या-तुटक्या कपड्यात, उघड्यावर कुठेही वावरू शकणारी पोरं, वाढतं वय झाकू शकत नाही ..परिस्थिती तशीच राहिली तरी वय तेच रहात नाही...झाकण्यासाठी डोईवरचं आभाळ फक्त शिल्लक असतं; पण ते कवेत घेण्याइतके हात रुंद नसतात. असतात ते फैलावले तर ते सापडतात तावडीत एखाद्या दणकट पंजात. तो पंजा कुणाचाही असतो...त्याला एकच ' पुरुषी ' जात असते, तो गल्लीतल्या दादापासून, ज्याच्याकडे धुणी-भांडी करायची त्या सात्त्विक मालकाचाही असू शकतो. त्यांच्या विकार-वासनांना पण ' भोग ' ही एकच जात असते...संपूर्ण असुरक्षित आयुष्य एखाद्या पिक्चर, हातात सारलेली एखादी नोट किंवा कार्यभाग झाल्यावर हाणलेली लाथ यापुढे लाचार होऊन जाते. अशी किती तरी आयुष्ये आहेत या महानगरीच्या पोटात ! ही आयुष्ये जगत नाहीयत, ती मेलीत. फक्त शरीरं जगतायत. मरता येत नाही म्हणून. या महानगरीने कसली गोळी खाल्लीय की जिच्या अंमलाने ही अशी उभारणारी आयुष्यं जगण्याआधीच मारली जातायत ?
राष्ट्रीय महामार्गावरून बस धावत होती. शहराचं मोठेपण दाखवणारा महामार्ग; पण त्याला फुटलेल्या या अनैतिक पायफुटींचे काय ? या शहराच्या पोटात आतड्यासारखे लांबवर गुंडाळी करून बसलेले हे अंधारी रस्ते केव्हा संपणार आहेत ? त्यावर एखादा जवळचा स्टॉप, परतीकडे लवकर नेणारा स्टॉप आहे का ? होईल का ?
' आला का स्टाप ?' तिने परत विचारलं दुसरीला.
माझी तंद्री भंगली. स्टॉप अजून दूर होता. ते वळणही आले नव्हते अजून. समोर फक्त एकच महामार्ग दिसत होता. महानगरीचं महापण जपणारा.

–संजय पवार

# युगप्रवर्तक शास्त्रज्ञ : चार्ल्स डार्विन

'काय संपले ? पण ते आजच प्रसिद्ध होणार होते ना ?'

'होय. ते आजच प्रकाशित झाले व त्याच्या सर्व १२५० प्रती आजच विकल्या गेल्या !'

वरील संवाद २४ नोव्हेंबर १८५९ रोजी संध्याकाळी लंडनच्या एका पुस्तकांच्या दुकानातील आहे. सर्व आवृत्ती प्रकाशित झाल्याच्या व पहिल्याच दिवशी संपण्याचा विक्रम करणारे ते पुस्तक म्हणजे चार्ल्स डार्विनचे ' दि ओरिजिन ऑफ स्पीसीज. ' २५ नोव्हेंबर १९५९ रोजी या पुस्तकाच्या प्रकाशनाची शताब्दी साजरी करण्यात आली, हाही एक विक्रम म्हणावा लागेल ! तसेच प्रसिद्ध झाल्यानंतर १०० वर्षे होऊन गेली तरी वाचले / चर्चिले जाणारे ते एकमेव वैज्ञानिक पुस्तक असेल! या पुस्तकाने मानवी विचारविश्वात क्रांती करून सोडली आहे.

चार्ल्स डार्विनचे वडील डॉ. रॉबर्ट डार्विन श्रुसबरी ( इंग्लंड ) येथील एक सुप्रसिद्ध व यशस्वी डॉक्टर होते. चार्ल्सचे हायस्कूलचे शिक्षण डॉ. बटलर यांच्या जगप्रसिद्ध शाळेतच झाले. चार्ल्स शाळेत असताना विशेष चमकला नाही. इतकेच नव्हे तर तो उनाड, उडाणटप्पू म्हणूनच सर्वांना माहीत होता. मात्र लहानपणापासूनच चार्ल्सला पक्षी,प्राणी, वनस्पती, कीटक इ. च्या निरीक्षणाची आवड होती. अशा गोष्टी तो जमवत असे. शंख, शिपले, दगड, गारगोट्या या वस्तूंचाही त्याने संग्रह केला होता. मॅट्रिक झाल्यावर त्याच्या वडिलांनी चार्ल्सला एडिंबरा येथील मेडिकल कॉलेजमध्ये घातले. स्वत: डॉ. डार्विनही त्याच कॉलेजमध्ये शिकले होते. एडिंबराला गेल्यावर चार्ल्सने निसर्गप्रेम, भटकणे, शिकार इ. गोष्टींकडे जास्तच लक्ष दिले व वर्गातील शिकवण्याकडे तो अधिकच दुर्लक्ष करू लागला. शस्त्रक्रिया करताना रोग्याला भूल देण्याचे तंत्र त्या वेळी निघाले नव्हते. अशी भूल न देता केलेली शस्त्रक्रिया पाहून तर चार्ल्सने डॉक्टर न होण्याचे नक्की ठरवले !

इकडे वडिलांनाही चार्ल्सचे कसे होणार याची काळजी वाटू लागली. खूप विचार करून डॉ. डार्विननी मुलाला धर्मगुरु-पाद्री करायचे ठरवले. एखाद्या खेड्यात राहून चार्ल्सला आपला निसर्गाध्ययनाचा छंद चांगला जोपासता येईल असे डॉ. डार्विनना वाटले. त्यांनी चार्ल्सला घरी बोलावून त्याला आपली कल्पना सांगितली. ती त्याला पटली की नाही हे सांगता येत नाही; पण निदान वैद्यकीय शिक्षणातून (व त्या व्यवसायातून) सुटका होणार असल्याने चार्ल्सने वडिलांच्या बेताला संमती दिली; पण धर्मगुरु व्हायचे तर पदवी आवश्यक म्हणून डिसेंबर १८२७ मध्ये वयाच्या १८ व्या वर्षी डार्विन केंब्रिजच्या ख्राइस्ट कॉलेजमध्ये दाखल झाला.

केंब्रिजला डार्विनची अनेक मोठ्या व्यक्तींशी ओळख झाली. प्रा. हेन्स्लॉ केंब्रिजला वनस्पतिशास्त्र शिकवीत असत तर प्रा. सेजविक भूगर्भशास्त्र. या दोघांच्या सहवासाचा डार्विनला अतिशय उपयोग झाला. वास्तविक वरील दोन्ही विषय डार्विनच्या कॉलेजमधील नियमित अभ्यासाचे नव्हते; परंतु त्याच्या निसर्गाच्या प्रेमाने वरील दोघांकडे चार्ल्स ओढला गेला. त्याच्यातील उनाडपणा जाऊन तो गंभीरपणे निसर्गाध्यायी ( Naturalist ) बनला होता. बी. ए. होण्याच्या सुमारासच आपण धार्मिक वृत्तीचे नसून आपला कल बुद्धिवादी व वैज्ञानिक विषयाकडे आहे असे डार्विनला वाटू लागले होते. त्यामुळे त्याने चर्चकडे अर्जच केला नाही; पण त्यामुळे त्याच्या वडिलांना पुन्हा काळजी वाटू लागली.

बी. ए. झाल्यानंतर ( १८३१ ) लगेच डार्विन प्रा. सेजविक यांच्याबरोबर द. वेल्सच्या भूगर्भशास्त्रीय सर्वेक्षणाच्या मोहिमेसाठी गेला. दोन-तीन महिन्यांच्या या काळात त्याला अत्यंत मोलाचे प्रायोगिक ज्ञान मिळाले. या ज्ञानाचा व या मोहिमेमुळे आलेल्या आत्मविश्वासाचा त्याला नंतरच्या प्रदीर्घ मोहिमेच्या वेळी फारच उपयोग झाला. एक प्रकारे ही मोहीम म्हणजे त्या दुसऱ्या मोहिमेची पूर्वतयारीच होती. हे सर्वेक्षण संपवून चार्ल्स डार्विन घरी गेला तेव्हा दोन पत्रे त्याची वाट पहात होती.

ब्रिटिश आरमाराची ' बीगल ' (H. M. S. The Beagle) ही बोट जगप्रवासासाठी जाणार होती. दक्षिण अमेरिकेच्या किनाऱ्याचे भौगोलिक सर्वेक्षण करून त्याचा नकाशा तयार करणे, तसेच अनेक बेटांचे अक्षांश-रेखांश व क्षेत्रफळ ठरविणे ही प्रमुख कामगिरी ' बीगल ' ला करावयाची होती. तसेच द. अमेरिकेला वळसा घालून ऑस्ट्रेलियाला जाण्याचा मार्ग ठरवण्याचे कामही होतेच. या प्रवासात बोटीवर एखादा निसर्गाध्यायी असेल तर अनायासे अनेक भूप्रदेशांची जमीन, खडक, वनस्पती, प्राणी यांची माहिती गोळा करता येईल असा विचार बोटीचा कप्तान फिट्झरॉय याच्या मनात आला. त्याने लगेच वरिष्ठ अधिकाऱ्यांकडून तशी परवानगी मिळवली. मात्र अशा निसर्गनिरीक्षकाला आरमार काहीही पगार देणार नव्हते, उलट जेवणा खाण्याच्या खर्चापोटी त्या व्यक्तीनेच आरमाराला ठराविक रक्कम द्यावयाची होती. प्रा. हेन्स्लॉ यांनी या जागेसाठी आपला तरुण मित्र चार्ल्स डार्विन याचे नाव सुचवले होते आणि डार्विनने या सफरीवर जायचेच असा निश्चय केला.

या वेळी डार्विन फक्त २१ वर्षांचा होता. त्या वेळपर्यंतच्या आयुष्यात त्याला मोठेपणाची कोणतीही चिन्हे दिसून आली नव्हती; पण त्याने 'बीगल' वरून निसर्गाध्यायी म्हणून जाण्याचा निश्चय केला ही गोष्ट मात्र त्याच्या असामान्यतेची खूण मानली पाहिजे. हा प्रवास ५ वर्षांचा होता. पगाराचे राहोच पण खाण्यापिण्याचा खर्च घरून करायचा होता. इतर चैनींचे नावही नव्हते, स्त्रीचे दर्शनही दुर्लभ होते. त्याच्या जाण्याला वडिलांचाच विरोध होता. डार्विनने कॅ. फिट्झरॉयची भेट घेतली तेव्हा पहिल्या भेटीत कप्तानाचे डार्विनविषयी वाईट मत झाले; पण या सर्वांवर डार्विनने मात केली. मामाच्या सुप्रसिद्ध पॉटर जोस वेजवुड मध्यस्थीने वडि-

लांचे मन वळवले. चिकाटीने कॅ. फिट्झरॉयचा गैरसमज दूर केला. इतकी सर्व तयारी करून डार्विन बोटीवरून निघाला; पण बोट निघून पुरते २४ तासही झाले नाहीत तोच समुद्रावर प्रचंड तुफान सुरू झाले. बोटीची चांगलीच नासधूस झाली व ती परत फिरवून बंदरात आणावी लागली! तिच्या दुरुस्तीला आणखी दोन – तीन महिने लागले. त्या काळात डार्विनचे एक मोठे दुखण पार पडले.

हे सर्व संपल्यावर २७ डिसेंबर १८३१ रोजी डिव्होनपोर्ट बंदरातून बीगल बोट जग-प्रवासाला निघाली. हा प्रवास ४ वर्षे, ९ महिने, ५ दिवस चालला होता. बोटीने अटलांटिक, पॅसिफिक व हिंदी अशा तीन महासागरांतून, इतर कित्येक छोट्यामोठ्या समुद्रांतून, खाड्यांतून, सामुद्रधुन्यांतून प्रवास केला. युरोप, दक्षिण अमेरिका, ऑस्ट्रेलिया, आशिया, आफ्रिका अशा बहुतेक खंडांना स्पर्श केला. हा प्रवास हजारो किलोमीटर्सचा होता. जगप्रदक्षिणा आटोपून २ ऑक्टोबर १८३६ रोजी 'दि बीगल' जहाज इंग्लंड-मधील फालमाउथ बंदराला लागले !

## ओरिजिन ऑफ स्पिसिज

'माझ्या आयुष्यातील सर्वांत महत्त्वाचा कालखंड' असे डार्विनने या पाच वर्षांचे वर्णन केले आहे, ते अक्षरशः खरे आहे. प्रवासात केव्हा तरी बोटीवरच्या सर्वांनी दाढी वाढविण्याचे ठरविले. इतरांनी प्रवास संपल्यावर दाढी काढली; पण डार्विनने आजन्म दाढी राखली होती. त्याच्यात आमूलाग्र बदल झाला होता. तो २७ वर्षांचाच होता; पण इंग्लंडमधील विख्यात शास्त्रज्ञांत त्याची गणना होऊ लागली होती. प्रवासात असताना शक्य त्या प्रत्येक ठिकाणी उतरून डार्विन आत जमिनीवर जाई. तेथील माती, दगड, प्राणी, कीटक, वनस्पती इ. चे नमुने गोळा करी. बोटीवर येऊन त्या सर्वांची नीट व्यवस्था लावून पक्के पॅकिंग करून ते तो इंग्लंडला पाठवून देत असे. डार्विन घरी आला तेव्हा ठिकठिकाणाहून पाठवलेल्या वस्तूंनी त्याचे घर भरून गेले होते. या प्रवासात असतानाच केव्हा तरी डार्विनच्या मनात प्राण्यांत असलेल्या विविधतेबद्दल विचार आला. सजीवांत एवढ्या असंख्य प्रजाती, इतके प्रकार कसे निर्माण झाले असतील ? हा प्रश्न डार्विनच्या मनात पुढील आयुष्यभर मुक्काम ठोकून बसला होता. 'बीगल'च्या प्रवासाचा अधिकृत अहवाल डार्विनला लिहायचा होता. जमलेल्या वस्तूंची नीट मांडणी करून त्यांची माहिती लिहून काढावयाची होती. हे सर्व डार्विनला १० वर्षे पुरवले !

दरम्यान दोन गोष्टी झाल्या. प्रवासाहून आल्याबरोबर डार्विन आपल्या भावाच्या घरी लंडनला रहात होता. तेव्हा त्याच्या मनात लग्नाचा विचार डोकावला. लग्न करावे की न करावे हा प्रश्न डार्विनने वैज्ञानिक पद्धतीने (?) सोडवलेला दिसतो. त्या प्रश्नाच्या दोन बाजूंची तुलना करून काढलेला निष्कर्ष दर्शविणारा तक्ता लिहिलेला त्याच्याच हस्ताक्षरातील कागद आजही पहावयास मिळतो. एकदा लग्न करायचे ठरल्यानंतर डार्विनने वेळ लावला नाही. तो मामाकडे गेला व सर्वांत धाकट्या मामेबहिणीशी लग्न ठरवून परत आला. नंतर त्याने लंडनमध्येच गोवर स्ट्रीटवर नवी जागा घेतली. चार्ल्स डार्विन व एमा वेजवुड यांचे लग्न २९ जानेवारी १८३९ रोजी झाले; पण लंडनची दमट, कोंदट हवा डार्विनला मानवत नसे. लग्नानंतर २–३ वर्षांतच डार्विनने केंट परगण्यातील डाउन येथे नवे घर घेतले. मग मात्र डार्विन आयुष्यभर याच घरात राहिला. आजही हे घर ब्रिटिश सरकारने 'राष्ट्रीय स्मारक' म्हणून जतन करून ठेवले आहे.

लेखनाच्या संदर्भात डार्विन अतिशय नियमित होता. त्यामुळे तो भरपूर लिहू शकला. २०–२२ पुस्तके मिळून त्याने ५००० ते ७००० पृष्ठे लिहिली असतील! त्याच्या अनेक पुस्तकांपैकी प्रजातींच्या उत्पत्तीविषयी त्याने लिहिलेले 'दि ओरिजिन ऑफ स्पीसीज' हे पुस्तक अत्यंत वादग्रस्त ठरले. याच पुस्तकाने मानवी विचारांत क्रांती घडवून आणली.

'दि ओरिजिन ऑफ स्पीसीज बाय मीन्स ऑफ नॅचरल सिलेक्शन ऑर दि प्रिझर्वेशन ऑफ फेव्हर्ड रेसेस इन स्ट्रगल फॉर लाइफ' असे लांबलचक नाव असलेल्या पुस्तकात ३८६ पाने असून १५ प्रकरणे आहेत. हे डार्विनच्या लहान पुस्तकांपैकी एक आहे. पुस्तकाची पहिला १२५० प्रतींची सर्व आवृत्ती प्रकाशनाच्या दिवशीच संपली असे सुरुवातीला लिहिलेच आहे. दीड महिन्यातच 'दि ओरिजिनची' दुसरी २००० प्रतींची आवृत्ती काढली गेली. डार्विनच्या हयातीत १८८२ पर्यंत या पुस्तकाच्या पुढील आवृत्त्या निघाल्या होत्या.

इंग्लंड–६ आवृत्त्या
फ्रेंच– ४ "
जर्मन – ५ "
अमेरिकन–३ "
रशियन–३ "
डच, इटालियन, स्वीडिश प्रत्यकी–१

'दि ओरिजिन' या पुस्तकात काय आहे ? पृथ्वीच्या पाठीवर असंख्य सजीव दिसतात. प्राण्यांचे व वनस्पतींचे लाखो प्रकार आहेत. काहीत थोडेफार साम्य आहे, तर कित्येक अगदी भिन्न आहेत. झुरळ व नारळाचे झाड यांत प्रचंड फरक आहे. उलट कुत्रा आणि लांडगा यांत खूप साम्य आहे. सजीवांत इतकी विविधता कशी व का निर्माण झाली ? ख्रिश्चन धर्माने या प्रश्नाचे उत्तर 'बायबल' (जुना करार) मधील 'जेनेसिस' या प्रकरणात दिले आहे. त्यानुसार परमेश्वराने सर्व सजीवनिर्जीव विश्व सहा दिवसांत तयार केले असे आहे. ते जेव्हा निर्माण केले तेव्हापासून आजतागायत जसेच्या तसेच आहे. प्राणी, वनस्पती बदलत नाहीत. परमेश्वराने निर्माण केल्यामुळे ते नष्ट होत नाहीत. भिन्नभिन्न प्राणी व वनस्पती कसे निर्माण झाले, म्हणजेच नव्या प्रजाती (स्पीसीज) कशा तयार झाल्या याची एक नवी उपपत्ती डार्विनने आपल्या 'दि ओरिजिन' या पुस्तकात मांडली आहे. ती वैज्ञानिक उपपत्ती बायबलमधील कथनापेक्षा अर्थातच वेगळी आहे. त्यामुळे धर्मगुरू व सर्व धार्मिक यंत्रणा डार्विनवर खवळून उठली.

## डार्विनवाद

डार्विनच्या उपपत्तीला 'नैसर्गिक निवडीने उत्क्रांती' असे म्हणता येईल. पैकी 'उत्क्रांती' अर्थात हळूहळू होणारा फरक ही कल्पना जीवशास्त्रात डार्विनच्या आधीपासून खरे तर प्राचीन ग्रीक काळापासून आहे. लामार्क (१७४४–१८२९) या फ्रेंच शास्त्रज्ञाने उत्क्रांतीची कल्पना विस्ताराने मांडलेली होती. प्रत्येक प्राण्यात पूर्णत्वाकडे

जाण्याची दैवी अंत:प्रेरणा असते. म्हणून प्राणी हळूहळू (पूर्णत्वाकडे जाण्यासाठी) बदलतात. इतकेच नव्हे तर एका पिढीत जे बदल झाले असतील ते पुढच्या पिढीत उतरतात व ती पिढी त्यापुढे वाटचाल करू लागते, अशी काहीशी लामार्कची कल्पना होती. उत्क्रांतीचे डार्विनने दिलेले कारण म्हणजे निसर्गाची निवड. डार्विनच्या मताप्रमाणे उत्क्रांती कशी होते ते सूत्ररूपाने पुढीलप्रमाणे सांगता येईल.

१. भेद : भिन्न प्रजातीतील सजीवात रूपभेद असतात. उदा० सिंह व आंब्याचे झाड यात फरक आहे. तसेच एकाच प्रजातीतील सर्व प्राणीही अगदी सारखे नसतात. जसे दोन घोडे कधीच अगदी तंतोतंत सारखे नसतात.

२. संख्यावाढ : प्राणी अनुकूल परिस्थितीत भौमितिक श्रेढीने वाढतात. त्यामुळे त्यांची संख्या प्रचंड व्हायला हवी. उदा० पॅरामेशियम हा एकपेशीय प्राणी विभाजनाने वाढतो एका प्राण्याची वर्षात ६०० विभाजने होतात. सर्व विभाजित पॅरामेशियमची विभाजने याच वेगाने झाल्यास एका पॅरामेशियमपासून इतकी प्रजा निर्माण होईल की, त्यांचा गोळा पृथ्वीगोलापेक्षा मोठा होईल किंवा हत्ती १०० वर्षे जगतो, हत्तिणीला आयुष्यात फक्त ६ च पिले होतात असे धरले तर एका हत्तींच्या जोडप्यापासून ७५० वर्षांत १,९०,००,००० हत्ती तयार होतील; परंतु प्राण्यांची संख्या एवढी भरमसाठ वाढली आहे असे होत नाही. अन्नाचे दुर्भिक्ष्य, रोगराई, स्पर्धा, भक्षक–शत्रू इ० अनेक कारणांनी अनेक प्राणी नष्ट होतात.

३ संघर्ष : मरण्याची शक्यता खूपच असल्याने टिकून राहाण्यासाठी धडपड, स्पर्धा, संघर्ष अटळ असतात.प्राण्यांत भेद असतातच. सभोवतीच्या पर्यावरणात टिकून राहण्यासाठी जे भेद अनुकूल ठरतील ते भेद असणारे प्राणी टिकतात व आपल्यासारखी प्रजा निर्माण करतात. अनुकूल न ठरतील असे प्राणी नष्ट होतात.कधीकधी ते प्रजा निर्माणच करू शकत नाही.

४. नैसर्गिक निवड : म्हणजेच कोणी टिकायचे व प्रजा निर्माण करायची याची निसर्ग निवड करीत असतो. ही निवड आपोआप नैसर्गिक प्रक्रियेनेच होते. त्यात दैवी कृपा किंवा परमेश्वरी सामर्थ्य यांचा काही संबंध नाही.

५. योग्यतम तेच टिकतात: निवडीमुळे अयोग्य, आनुकूलन न झालेले प्राणी वगळले जातात. त्या त्या परिस्थितीत योग्यतम तेच टिकतात. भिन्न पर्यावरणात भिन्न गुणधर्म 'योग्यतम' ठरतात. त्यामुळे प्रथम एकाच प्रजातीचे प्राणी भिन्न परिस्थितीत सापडले तर हळूहळू भिन्न होत जातात व कालांतराने त्यांच्या भिन्न प्रजाती होतात.

'दि ओरिजिन' व वरील उपपत्ती यांवर खूप वादविवाद झाले. टीका झाली. या पुस्तकावर बंदी घालावी अशी मागणी करण्यात आली. ब्रिटिश सरकारने या मागणीकडे दुर्लक्ष केले तरी रोमच्या पोपने खरोखरीच हे पुस्तक 'काळ्या यादीत' टाकले ! कोपर्निकस व गॅलिलिओ यांची पुस्तकेही त्या यादीत

---

## लग्न

### करावे

मुले (ईश्वरी कृपेने)

कायमची सोबत म्हातारपणीचा मित्र. आपल्यात रस वाटेल अशी– प्रेम व क्रीडा यांचे पात्र–कुत्र्यापेक्षा खचितच चांगले. घर व घराची व्यवस्था पाहणारे कोणी तरी.

संगीताचा व स्त्रीजनांशी गप्पागोष्टी करण्यातील आनंद. या सर्व गोष्टी आरोग्याच्या दृष्टीने उत्तमच.

नातेवाइकांकडे जाण्याचे व ते घरी येऊन त्रास देण्याचे प्रसंग येणारच.

मुलाबाळांसाठी वेळ व पैसा खर्च करावा लागणार. काळजीने जीव हैराण होणार. भांडणांचे प्रसंग.

खूप मुले झाल्यास खाण्यापिण्यासाठी खूप खर्च व भरपूर कष्ट करावे लागणार.

कदाचित् बायकोला लंडनचे घर आवडणार नाही. तसे झाले तर एका मूर्ख व नाखूष व्यक्तीबरोबर जन्मठेपच !

एका नाजूक, हळुवार, सुंदर पत्नीसमवेत आपण सोफ्यावर बसलेलो आहोत. समोर ऊब मिळण्यासाठी शेगडी आहे. मधुर संगीत...जवळ पुस्तके...

### करू नये

– मुले नाहीत.

– वृद्धापकाळी काळजी घेण्यास कोणी नाही. (अगदी जिवलग व्यक्तींच्या सहानुभूतीशिवाय काम करणे व्यर्थच) आणि म्हाताऱ्यांना नातेवाइकांखेरीज जिवलग कोण असतात ?

– वाटेल तिकडे जाण्याचे स्वातंत्र्य शेजाऱ्यांची निवड करता येईल; पण मैत्री कमीच.

– मात्र क्लबमध्ये जाऊन चतुर स्त्री-पुरुषांचा सहवास मिळेल.

– नातेवाइकांकडे जाण्याची भानगड नाही. त्यामुळे एवढ्यातेवढ्यासाठी मनाविरुद्ध वागणे नाही.

– मुलांसाठी खर्च किंवा काळजी नाही. मात्र एकंदर वेळ फुकट जाणारच. भांडणे टळतील.

– संध्याकाळी स्वस्थपणे वाचायला मिळणार नाही

– काम, काम आणि नुसते काम; एखाद्या कामकरी मुंगीसारखे काम. शिवाय फार काम प्रकृतीला वाईटच.

– लंडनच्या धुरकट घरात एकट्याने आयुष्य घालविण्याची कल्पनाही असह्य.

? ? ?

**तस्मात् लग्न कर, लग्न कर, लग्न कर !**

---

त्या त्या काळीच समाविष्ट केली होती. बायबलमधील वचनांपेक्षा सत्य वेगळेच आहे असे कोपर्निक्स,गॅलिलिओ व डार्विन या तिघांनीही सिद्ध केले होते. आपल्या उपपत्तीच्या पुष्टयर्थ डार्विनने एवढा प्रचंड पुरावा ' दि ओरिजिन ' मध्ये मांडला आहे की, त्याचे म्हणणे खोटे किंवा चुकीचे आहे असे कोणी म्हणू धजला नाही. त्यामुळे पाखंडी, अनीतिमान, धर्मलंड, देवाची अवहेलना करणारा,... अशा शिव्या देण्याखेरीज धार्मिक लोकांना काही करता आले नाही. अगदी आज १९८२ मध्येही अमेरिकेत डार्विनचा उत्क्रांतिवाद शाळांत शिकवावा की नाही याची चर्चा अटीतटीने चालू आहे. कोर्टात खटले चालू आहेत; पण प्रामाणिकांना उत्क्रांतीवाद--त्यालाच पुढे लोक डार्विनवाद म्हणू लागले--पटू लागला होता. डार्विनच्या हयातीतच जीवशास्त्रात तरी उत्क्रांती हे एक मूलभूत सत्य मानण्यात येऊ लागले होते. आजसुद्धा जीवशास्त्राची अशी एकही शाखा नाही की जीत उत्क्रांती व नैसर्गिक निवड यांचा संदर्भ नाही.

डार्विनला सामाजिक विचारवंतांकडून अनपेक्षितपणे पाठिंबा व प्रसिद्धी मिळाली. हर्बर्ट स्पेन्सरला ' सामाजिक डार्विनवादाचा ' जनक मानले पाहिजे. सामाजिक व सांस्कृतिक क्षेत्रांना उत्क्रांतीचे तत्त्व लावण्याचा प्रयत्न स्पेन्सरने केल्याचे दिसते. ' जीवनार्थ संघर्ष ' ( Struggle for Existence ) व ' योग्यतम तेच टिकतात ' (Survival of the Fittest ) हे वाक्प्रचार लोकप्रिय करण्याचे श्रेय या सामाजिक डार्विनवाद्यांनाच दिले पाहिजे; पण सामाजिक डार्विनवाद ही मुळात वैज्ञानिक संकल्पना नाहीच. त्यामुळे त्याची वाटेल तशी ओढाताण झाली. संघर्ष आणि योग्यतम हे शब्द ( खरे म्हणजे हे शब्द डार्विनने स्वत: फारसे वापरलेलेच नाहीत. ) प्रत्येकाने आपापल्या सोयीप्रमाणे वापरायला सुरुवात केली. संघर्ष नैसर्गिकच असल्याने गोऱ्यांनी आशिया, आफ्रिका खंडातील लोकांवर हल्ले करून ठार मारणे किंवा त्यांना गुलाम बनवणे म्हणजे निसर्गनियमांचे पालन करणेच नव्हे काय ? नाही तरी योग्यतम म्हणजे सामर्थ्यवान तेच टिकतात.

अशा रीतीने काही लोकांनी साम्राज्यवादाला डार्विनवादाचे समर्थन मिळवून दिले, तर व्यापारी स्पर्धा आणि खुल्या बाजारपेठा असा डार्विनवादाचा भांडवलशाही अर्थ लावायला लोकांनी कमी केले नाही. मोठ्या माशांनी लहान मासे गिळणे स्वाभाविक आहे, तद्वतच मोठ्या भांडवलदाराने लहान भांडवलदाराला किंवा मजुराला गिळणे हा निसर्गनियमच आहे असे मानले गेले. उलट मार्क्सवादी लोकही डार्विनच्या संघर्ष व योग्यतम या शब्दांचा उपयोग आपल्या फायद्यासाठी करून घेत असत. स्वत: कार्ल मार्क्सवरही डार्विनचा चांगलाच प्रभाव होता. त्याने आपल्या ' कॅपिटल'चा दुसरा भाग डार्विनला अर्पण करण्याचे ठरवले होते; पण डार्विननेच त्याला संमती दिली नाही.

मानव पृथ्वीवर निर्माण झाल्याला हजारो वर्षे होऊन गेली. अगदी सुरुवातीला माणूस अज्ञानी होता आणि भ्यालेला होता. त्या अज्ञात, अदृश्य आणि बऱ्याच अंशी असत्य भयापासून मुक्त होण्याचा एकमेव मार्ग म्हणजे ज्ञान-विज्ञान. मानवी मुक्तीचा हा प्रवास प्रदीर्घ आहे. त्याचे अनेक टप्पे आहेत. त्यातील डार्विन हा एक मोठाच टप्पा आहे. मानवाच्या सजीव सृष्टीबद्दलच्या व मुख्य म्हणजे स्वत:बद्दलच्या ज्ञानात त्याने मूलभूत स्वरूपाची भर घातली आहे. पृथ्वीवरील सर्व प्राणी, वनस्पती नैसर्गिक नियमानुसारच झाले आहेत. त्यात दैवी किंवा धार्मिक काहीच नाही. माणसांची निर्मितीही अशीच इतर प्राण्यांसारखीच:झालेली आहे. माणूस देवाने स्वसदृश ( In His Image ) केलेला नाही किंवा तो 'परमेश्वराचा लाडकाही नाही. गुरुत्वाकर्षणाच्या नियमाने पृथ्वी सूर्याभोवती फिरत असते, त्यात ईश्वरी संकेत आहे असे कोणी मानीत नाहीत. त्याप्रमाणेच प्राण्यांची प्रजातींची उत्पत्तीही जड निसर्गनियमांनीच झाली व अजून होत आहे. डार्विनने मांडलेल्या उपपत्तीने मानवी ज्ञानात मोठी भर पडली आहे व त्याचा सृष्टीकडे व स्वत:कडेही पाहण्याचा दृष्टिकोन आमूलाग्र बदलून गेला आहे. म्हणूनच १९ एप्रिल १८८२ रोजी डार्विन मृत्यू पावला, तेव्हा सम्राटाच्या इच्छेनुसार त्याचे दफन वेस्ट मिनिस्टर अॅबेमध्ये न्यूटनच्या शेजारीच करण्यात आले !

--भा. रा. बापट




आसामबद्दलच्या उलटसुलट बातम्यांतून दिसणारे चित्र

# आसामचा प्रश्न केंद्र सरकार सोडवणार नाही !

**अभय गोखले**

आसामातील दंगली आज महिना उलटून गेला तरी अव्याहतपणे चालूच आहेत. आसाममध्ये तेथील स्थानिक लोकांचा निवडणुकांना विरोध असूनही केंद्र सरकारने तेथे निवडणुका लादल्या व त्याचा परिणाम म्हणजे आसामातील सर्वांत नावडते (अगदी अन्वरातैमूरच्या सरकारपेक्षाही ) सरकार अस्तित्वात आले ते घुसखोरांचे प्रतिनिधित्व करणारे. गेली तीन वर्षे सरकारने आसामातील जनतेचे प्रतिनिधित्व करणाऱ्या ऑल आसाम स्टुडंटस् युनियन व ऑल आसाम गणसंग्रामपरिषद ह्या संघटनांबरोबर परकीय नागरिकांच्या प्रश्नावरून वाटाघाटी करण्याचा फार्स केला; परंतु केंद्र सरकारने ज्या तऱ्हेने तडकाफडकी निवडणुका जाहीर केल्या त्यावरून परकीय नागरिकांचा प्रश्न सोडवण्याकरिता केंद्र सरकार मनापासून उत्सुक नव्हते हेच स्पष्ट होते. या तीन वर्षांत अन्वरातैमूरचे अल्पमतात असलेले मंत्रिमंडळ आसामी जनतेवर थोपण्याचा प्रयत्न झाला व बंगाल्यांचा कैवारी पक्ष, मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्षही नेहमी केंद्र सरकारला ह्या बाबतीत पाठिंबा देऊ लागला.

प्रथम परकीय नागरिकांचा प्रश्न सोडवण्याकरिता १९६१ हे मूळ वर्ष घ्यावे की १९७१ घ्यावे ह्याबाबत घोळ घालण्यात आला आणि ह्या वाटाघाटी चालू असताना घुसखोरांचा लोंढा रोजच्या रोज बांगला देशातून आसामात घुसतच होता. बंगाली मुस्लिमांना मीमेनसिंग व सिल्व्हेट ह्या पूर्व-पाकिस्तानातील जिल्ह्यांतून आसाममध्ये घुसण्यास प्रथम ४० वर्षांपूर्वी (आता बांगला देश) लीगच्या सादुल्लाने प्रोत्साहन दिले. नंतर १९६० च्या सुमारास भारताचे माजी राष्ट्रपती फक्रुद्दीन-अली अहमद ह्यांनी काँग्रेसला मुस्लिमांची एकगठ्ठा मते मिळवून देण्याकरिता बांगला मुस्लिमांची वरील जिल्ह्यातून आयात केली. नंतर १९७१ च्या बांगला देशाच्या स्वातंत्र्य-संग्रामात बांगलादेशचे हजारो नागरिक राजरोसपणे भारताच्या आश्रयास आले ते आसाममध्येच. आज ह्या घुसखोरांची अधिकृत संख्या आहे साडेनऊ लाख ! त्यात ठोकळमानाने नऊ लाख बंगाली हिंदू व पन्नास हजार बंगाली मुस्लिम आहेत. अर्थात अनधिकृतपणे हा आकडा फारच मोठा असावा असे वाटते घुसखोरांच्या ह्या प्रचंड संख्येने आसामातील मूळ आसामी नागरिक ( अहोम ) आता अल्पसंख्य झाले आहेत व त्यांच्यात निराशेची भावना निर्माण होणे साहजिकच आहे.

सध्या आसामची लोकसंख्या साधारणपणे दोन कोटीच्या वर आहे. त्यात आसामी लोक आहेत फक्त ४८ लाख तर बंगाली हिंदू व मुस्लिमांची संख्या आहे १ कोटी २० लाख. फार पूर्वीपासून बंगाली मोठ्या संख्येने आसाममध्ये स्थायिक झाले व आर्थिकदृष्ट्या ते आसामींपेक्षा संपन्न आहेत. प्रत्येक क्षेत्रात बंगाल्यांचे मोठे प्राबल्य आहे. आसामातील तिसरी मोठी जमात म्हणजे बोरो व लालुंग व गारो ह्या टोळीवाल्यांची. यांची लोकसंख्या आसामात २३ लाखांच्या आसपास आहे व त्यात बोरो टोळीवाले हे मोठ्या संख्येने आहेत. बोरो टोळीवाल्यांचा आसामींना विरोध आहे. प्लेन ट्रिबल्स कौन्सिल ह्या त्यांच्या राजकीय पक्षाने आसामातील निवडणुकात भाग घेतला व काही जागा जिंकल्याही. आसामातील भीषण हत्याकांडाला बोरो टोळीवाल्यांनीच सुरुवात करून दिली. लालुंग जमातीचे लोक हे आसामींबरोबर आहेत. नेल्लीच्या भीषण हत्याकांडात त्यांनी आसामींना साथ दिली होती. ह्या लालुंग टोळीवाल्यांचा घुसखोरांवर राग असण्याचे कारण म्हणजे त्यांच्या जमिनी घुसखोरांनी घशांत घातल्या आहेत. गारो जमातीचे लोक डोंगराळ प्रदेशात रहातात व ते ह्या हत्याकांडात जवळजवळ नव्हतेच. बोरो जमातीच्या लोकांना आसामींबरोबर रहायचे नसून त्यांची प्रामुख्याने वस्ती असलेल्या कारबी अँगलाँग, दारांग, लखीमपूर व काचर जिल्ह्याचा काही भाग एकत्र करून त्यांना उदयाचल ह्या नवीन राज्याची निर्मिती करावयाची आहे व त्यांची ही मागणी आता वाढली आहे.

## निवडणुकीचे विडंबन

आसाममध्ये निवडणुका जाहीर केल्यावर २ फेब्रुवारीला पहिली ठिणगी पडली. सरकारने प्रमुख आसामी नेत्यांना स्थानबद्ध केल्यामुळे जनता चिडली होती. त्यातच आसामी लोकांवर निवडणुका लादण्यात आल्या होत्या. त्या दिवशी वीस दिवसांच्या असहकार आंदोलनाची घोषणा करण्यात आली. सरकारी कर्मचाऱ्यांनी काम करण्यास नकार दिला म्हणून बाहेरून मोठी किंमत मोजून कर्मचारी आणण्यात आले. इंदिरा काँग्रेसच्याबरोबरच मार्क्सवादी, कम्युनिस्ट, शरद काँग्रेस व पी. टी. सी. ए. ह्यांनी निवडणुका लढवण्याचा निर्णय घेतला. जनता, भाजप, लोकदल ह्यांनी निवडणुकांवर बहिष्कार घातला. या तीन पक्षांनी आसामातील राष्ट्रपति–राजवट वाढवण्यास घटनादुरुस्ती करण्यासाठी इंदिरा काँग्रेसला पाठिंबा देऊ केला होता; पण इंदिरा काँग्रेसला राष्ट्रपति–राजवट आता नको होती.

इंदिरा काँग्रेसच्या धुरीणांचा असा गैरसमज झाला की, आसाम विद्यार्थी संघ व गणसंग्राम परिषद यांना आसामी लोकांचा आता पाठिंबा उरलेला नाही व असलाच तर तो शहरी भागातच आहे. निवडणुकीचे अर्ज

भरताना नेहमीचा उत्साह नव्हता. उमेदवार घरोघर प्रचार करण्याचे किंवा सभा घेण्याचे धारिष्ट्य करत नव्हते. इंदिरा गांधी, घनी-खान चौधरी, मार्क्सवादीनेते यांनी सभा घेतल्या तर घुसखोरांचे प्राबल्य असलेल्या क्लाचर नवगांग ह्यासारख्या भागातच. ह्या-उलट भाजपचे अटलबिहारी वाजपेयी, लोक-दलाचे चरणसिंग यांच्या मोठ्या सभा आसामात सर्व भागात सुरळीत पार पडल्या. बंगाली लोकांच्या मोठ्या संख्येचा फायदा घेण्याचे व त्यांच्यात असुरक्षिततेची भावना निर्माण करून त्यांची मते लाटण्याचा मार्क्स-वाद्यांचा डाव फसला व पूर्वीच्या अकरा जागांची त्यांची विधानसभेतील संख्या घटून दोनवर आली. बंगाली लोकांचा अपेक्षेप्रमाणे पाठिंबा मिळाला नाहीच; पण आसामी लोकांची गैरमर्जी मार्क्सवाद्यांनी ओढवून घेतली व त्यांची परिस्थिती न घरका न घाटका अशी झाली! मात्र इंदिरा काँग्रेस केंद्रात राज्य करत असल्याने बंगाली लोकांनी आपले आसामा-तील अस्तित्व टिकवण्याचा शेवटचा प्रयत्न म्हणून मोठ्या संख्येने (काही ठिकाणी ८० टक्के मतदान करून) इंदिरा काँग्रेसला मतदान केले व त्यांचे उमेदवार बहुमताने निवडून आणले. आसामातील मतदानाची सरासरी आकडेवारी २० टक्के देण्यात येते व त्याचे कारण म्हणजे बंगाली लोकांनी मोठ्या प्रमाणात केलेले मतदान; परंतु त्यामुळेच त्यांनी आसामी लोकांची नाराजी ओढवून घेतली. कित्येक ठिकाणी आसामी लोकांच्या मतदार-बहिष्काराच्या आवाहनास ठोकरून त्यांनी टिच्चून मतदान केले व प्राणहानी ओढवून घेतली! आश्चर्याची गोष्ट म्हणजे आसामातील फार जुन्या (घुसखोर नसलेल्या) बंगाली लोकांनी मतदानावरील बहिष्कारात आसामींना साथ दिली. 'कामरूप' या नावाने पूर्वी ओळखल्या जाणाऱ्या आसा-मात पूर्वी लोक शांततेने आणि सहभावनेने रहात होते हे आता आपण इतिहासात वाचायचे आहे. केंद्र सरकारने त्यांची शांतता उध्वस्त केली व भारताच्या इति-हासातील एक अपूर्व भीषण हत्याकांड घडून आले व अजून चालूच आहे! ए. ए. एस. यू. व ए. ए. जी. एस. पी. यांच्या आवाहना-नुसार आसामी लोक निवडणुका उधळून लावण्याचा प्रयत्न करत असताना त्यात त्यांना साथ न देणाऱ्या लोकांचा काटा काढ-ण्याचे ठरवण्यात आले व केंद्र सरकारने जे करावयाचे होते (घुसखोरांना हाकालण्याचे काम) ते काम मग आसामी जनतेने स्वतःच सुरू केले. १२ फेब्रुवारीला चामरिया येथे आसामी व घुसखोर यांची प्रथम चकमक झडली ती निवडणुकात भाग घेण्याच्या प्रश्नावरूनच. त्यात दोन्ही बाजूंची घरे उध्वस्त करण्यात आली व सरकारी आकडे-वारीनुसार डझनभर लोकांची हत्या करण्यात आली हे लोण आता आसामभर पसरत चालले आहे. दारांग जिल्ह्यातील गोहपूर येथे बोरो टोळीवाले व आसामी यांच्यात भीषण चकमक झाली. ही चकमकसुद्धा निवडणुकात भाग घेण्याच्या प्रश्नावरूनच होती. बोरो टोळी-वाले मतदान करण्याच्या बाजूचे होते. बंदुका, भाले, तिरकमठे ह्यांच्या सहाय्याने आसामी, लालुंग टोळीवाले हे बोरो टोळीवाल्यांवर तुटून पडले व दोन–तीन दिवसांत सरकारी आकडयांप्रमाणे दोन्ही बाजूंचे शेकडो लोक मृत्युमुखी पडले व हजारो लोक बेघर झाले! ह्या संघर्ष चालू असताना ऑल इंडिया रेडि-ओचा बळींचा आकडा दहा–पंधराच्या पुढे सरकत नव्हता व आसामातील भीषण हत्याकांडाबद्दल फारशा बातम्या रेडिओ किंवा टी. व्ही. वाले देत नव्हते. आसाम सरकार तर निवडणुका घेण्याच्या उद्योगात गुंतले होते, त्यामुळे त्यांच्या दृष्टीने मामुली असलेल्या ह्या हत्याकांडाची त्यांनी फारशी दखल घेतली नाही व खऱ्या बातम्या दडप-ण्याचे काम इमानेइतबारे केले. आसाम सरकारचा प्रसिद्धिविभाग, ऑल इंडिया रेडिओ व दूरदर्शन आसामींच्या दृष्टीने विश्वास ठेवण्याच्या लायकीचे राहिले नव्हते. त्यामुळे खरी परिस्थिती समजण्यासाठी आसामी लोक बी. बी. सी. ची मदत घेत होते व बी. बी. सी. च्या वार्ताहरांना राजे-शाही थाटात वागवत होते.

इतर कोणाचे हत्याकांडाचे ठिकाणी जाण्याचे धारिष्ट्यच नव्हते; पण पत्रकार मात्र कोठेही मुक्तपणे हिंडत होते. त्यामुळे कित्येक खऱ्या गोष्टींचा उलगडा बाहेरच्या जगाला झाला. पत्रकारांना निरनिराळी माहिती पुरवण्यात व त्यांना संरक्षण देण्यात ए. ए. एस. यू. व ए. ए. एस. जी. पी. ह्या संघटनांच्या आसामभर पसरलेल्या कार्यकर्त्यांनी चांगली साथ दिली. अर्थात ह्या कार्यकर्त्यां-कडून निःपक्षपातीपणे माहिती मिळणे शक्य नव्हते; पण पत्रकारांनी त्यांना हवी अस-लेली माहिती निरनिराळ्या मार्गांनी मिळव-लीच. ऑल इंडिया रेडिओच्या पक्षपातीपणाचे एकच ठळक उदाहरण म्हणजे कामरूप जिल्ह्यातील काही मतदानकेंद्रांवर एक टक्क्याहूनही कमी मतदान झाले; पण ए. आय. आर. ने त्याचे वर्णन समाधानकारक असे केले होते. काही ठिकाणी फिरती मत-दानकेंद्रे ठेवण्यात आली होती, हे तर निवड-णुकीचे सर्वांत मोठे विडंबन होते.

## भीषण थैमान!

गोहपूरच्या हत्याकांडापर्यंत दंगलींना जातीय स्वरूप आले नव्हते; पण नवगाँग-मधील नेल्लीच्या हत्याकांडात जातीय विद्वेष दिसून आला. आसामातील आजवरचे हे सर्वांत भीषण हत्याकांड! या ठिकाणी जी चकमक झाली ती आसामी व प्रामुख्याने बंगाली मुस्लिम यांच्यातच होती. अर्थात ही मारामारी आसामींच्या बाजूने एकतर्फीच होती. मुसलमान केवळ जीव वाचवण्या-करिता जिवाच्या आकांताने जिकडे–तिकडे पळताना दिसत होते व आसामी त्यांचा तितक्याच त्वेषाने पाठलाग करून यमसद-नास पाठवत होते! ह्या दंगलीला जातीय स्वरूप येण्याचे कारण काय असावे? काहींच्या मते घुसखोर बंगाली मुस्लिमांनी हिंदूंपेक्षा मतदानात भाग घेण्याचा जास्त उत्साह दाखवला होता. त्यातच घनीखान चौधरी व इंदिरा गांधी ह्यांच्या जातीय वक्तव्यांनी व त्यांच्या केसालाही धक्का पोचणार नाही ह्या आश्वासनाने ते धीट बनले होते. घनीखान चौधरींनी तर त्यांच्या-वर हल्ला झाला तर त्वेषाने बदला घेण्याचा सल्ला आपल्या मुस्लिम बांधवांना दिला होता, तर दुसऱ्या काही पत्रकारांच्या मते दंगलींना जातीय वळण लावण्यास भाजपचे नेते जबाबदार होते. अटलबिहारी वाजपेयी सतत भेट देऊन सभांतून भाषण करत होते, तर भाजपचे एक खासदार जसवंतसिंग तेथे मुक्कामच ठोकून बसले होते! ते व इतर भाजपचे कार्यकर्ते आसाम विद्यार्थी संघटना व आसाम गणसंग्राम परिषद ह्यांच्या

नेत्यांच्या सतत गुप्त बैठकी घेऊन वेळोवेळी स्ट्रॅटेजी ठरवत होते. आसामातील ह्या उद्रेकाचा सर्वांत मोठा फायदा भाजपला मिळालाय, ह्या 'इंडिया टुडे'सारख्या दैनिकाच्या म्हणण्यात नक्कीच तथ्य आहे. बंगाली घुसखोर (हिंदू व मुस्लिम) हे इंदिरा काँग्रेसच्या पाठीमागे, आसामी हिंदू भाजपच्या पाठीमागे व बोरो टोळीवाले पी. टी सी. ए च्या पाठीमागे अशी ठोबळ मानाने विभागणी झाली आहे. मुस्लिमांच्या आक्रमक वृत्तीनेही त्यांनी जास्त मार खाल्ला असा काहींचा होरा आहे. अन्वरा तैमूरच्या राजवटीत मुस्लिमांचे लाड करण्यात आले असा आसामींचा समज झाला असणे शक्य आहे. शिवाय भाजपने त्यांना (आसामींना) असे पटवून दिले की, हिंदू निर्वासित हे आपले आहेत. त्यांना बांगलादेशातून अत्याचार करून हाकलून देण्यात आले आहे, त्यामुळे त्यांच्याकडे सहानुभूतीने पहाण्यात यावे; परंतु मुस्लिमांच्या बाबतीत तसे म्हणता येणार नाही. बांगलादेश हा त्यांचाच आहे. तेव्हा त्यांना तेथे परत पाठवणे हे आपले कर्तव्य आहे. अर्थात भाजपने आसामींना असे पढवले नसेल असे मानण्यास जागा नाही. ते काहीही असो. आसामात आतापर्यंत दंगलीत २५०० लोक ठार झाले ! त्यातील हजारच्या वर एकट्या नेल्लीतीलच आहेत ! पुरेसे पोलीस हजर नसल्याने शेकडो घुसखोर असहाय्यपणे मारले गेले. हत्याकांडात मारल्या गेलेल्या काही मुस्लिम निर्वासितांच्या मते त्यांची लहान मुले व बायकांना मोठ्या प्रमाणावर ठार मारण्यात आले. ह्यापाठीमागचा उद्देश म्हणजे ह्या घुसखोरांची दुसरी पिढी उभी राहाता कामा नये हाच होता ! मात्र काहींच्या मते बायका–मुले मोठ्या संख्येने मारली जाण्याचे कारण म्हणजे पुरुषांप्रमाणे बायका व मुले जोरात पळू शकली नाहीत व आसामी आणि ती लालुंग टोळीवाल्यांच्या तावडीत सापडली. अर्थात नेल्लीतही बंगाली मुस्लिमांचे सरसकट हत्याकांड झाले नाही, तर त्यात बंगाली हिंदूही होते व हे दोन्हीही बांगलादेशातून आलेले घुसखोरच ! नेल्लीतील हत्याकांडास इतिहासात तोड सापडणार नाही ! ह्या दंगलीत हजार लोक मारले गेलेच; पण हजारो लोक बेघर झाले, जखमी झाले, कित्येक कुटुंबेच्या कुटुंबे संपूर्णपणे मारली गेली व इतके दिवस सहकार्याच्या भावनेने रहाणाऱ्या ह्या लोकांमध्ये कायमचा दुरावा निर्माण झाला !

केंद्र सरकारची निवडणुकीची हौस भागली ती आसामात रक्ताचे पाट वाहवूनच आणि या सर्व भीषण हत्याकांडाची जबाबदारी केंद्र सरकार कशी टाळणार ? गुप्तचर विभागाचा निवडणूक न घेण्याचा सल्ला डावलून, आसाममध्ये निवडणुका घेण्यात आल्या. प्रथम आसाम विद्यार्थी संघ व गणसंग्राम परिषद यांचा पाठिंबा रोखणे हाच निवडणुकांचा हेतू होता व निवडणुका घेण्याचा जो अविचार करण्यात आला तो अंगाशी येत आहे हे थोड्याच दिवसांत केंद्र सरकारच्या लक्षात आले; पण आता माघार घेणे म्हणजे केंद्र सरकारच्या प्रतिष्ठेचा प्रश्न होता. मग आकाशपाताळ एक झाले तरी चालेल; पण निवडणुका घ्यायच्याच या अट्टाहासाने मृत्यूच्या थैमानाकडे दुर्लक्ष करण्यात आले.

## संघर्ष चालूच !

इंदिरा काँग्रेस, काँग्रेस (स) मार्क्सवादी कम्युनिस्ट, कम्युनिस्ट यांच्या उमेदवारांना सभा घेणे दूरच राहिले; पण प्रचार करणेही अशक्यच झाले होते. रात्री काळोखात जीव मुठीत धरून उमेदवारांना व त्यांच्या सहकार्यांना घरोघर जाऊन प्रचार करावा लागत होता आणि तरीही इंदिरा गांधी व मार्क्सवादी नेते कोकलतच होते की, आसामातील लोकांना निवडणुका हव्या आहेत. चार जागा इंदिरा काँग्रेसला बिनविरोध मिळाल्या त्या वेळेसच निवडणुकीचे खरे स्वरूप समजले. मतदान अपेक्षेप्रमाणे शांततेने पार पडलेच नाही. कित्येक मतदारसंघात पुन्हा मतदान घ्यावे लागले तर काही मतदानकेंद्रात बूथच नव्हते ! कित्येक ठिकाणी होते तरी तेथे एकही मत पडले नाही. १२६ विधानसभेच्या जागांपैकी १०८ ठिकाणीच मतदान घेता आले व त्यातल्या ८८ जागा काँग्रेसने जिंकल्या, यातच निवडणुकीचे खरे स्वरूप दिसते. ह्या एकतर्फी निवडणुकीचा आनंद इंदिरा काँग्रेसला फार काळ लुटता येणार नाही. कारण मतदानाच्या आकडेवारीवरून इंदिरा काँग्रेसचे निवडून आलेले बरेचसे आमदार हे घुसखोरांनी निवडून दिलेत व आसामी जनता त्यांना आपले मानणे शक्यच नाही.

कित्येक मतदारसंघात हजारो मतदार नोंदवलेले असताना काही शेकड्यातच मतदान झाले व तेही सर्वच्या सर्व इंदिरा काँग्रेसला ! यावरून आसामी जनतेला त्यात किती रस होता ते दिसून येतेच. काही मतदारसंघात उभ्या राहिलेल्या उमेदवाराला स्वत:चेही मत नोंदवता आले नाही ! भारताच्या निवडणुकांच्या इतिहासातील हा सर्वांत मोठा विनोद असावा. तरीही रेडिओ व दूरदर्शन मतदान चांगले झाल्याच्या बातम्या देऊन स्वत:ची व भारतीय जनतेची फसवणूक करत होतेच. काचर या मुस्लिम व घुसखोर बहुसंख्य असलेल्या जिल्ह्यातील मोठ्या प्रमाणावरील मतदान सोडल्यास आसामच्या इतर भागात वीस ते पंचवीस टक्केही मतदान कुठे झाले नाही, तर काही ठिकाणी ही आकडेवारी दहा टक्क्यांच्या आतच होती आसाम विद्यार्थीसंघ व गणसंग्राम परिषद यांचा आसामी जनतेवर फारसा प्रभाव नसल्याचा सरकारचा समज खोटा ठरला होता. विद्यार्थीसंघ व गणसंग्राम परिषद ह्यांना शहरी व ग्रामीण भागांतून सारखाच मोठ्या प्रमाणावर पाठिंबा आहे ही वस्तुस्थिती आहे. यापुढे केंद्र सरकारशी परकीय नागरिकांच्या समस्येबाबत कोणतीही चर्चा करावयाची नाही असा निर्णय ऑल आसाम विद्यार्थी संघटना व ऑल आसाम विद्यार्थीसंघ यांनी पूर्वीच घेतलाय. तीन वर्षे वाटाघाटींचे नाटक करून काहीच निष्पन्न झाले नाही. उलट अचानक निवडणुका जाहीर करून, विद्यार्थीनेत्यांची धरपकड करून त्यांचा विश्वासघात करण्यात आला हे शल्य त्यांच्या जिव्हारी लागले आहे. वाटाघाटींच्या भोवऱ्यात आता केंद्र सरकार अकालींना फिरवत आहे व पूर्वी आसामी लोकांशी खेळलेला जुना डाव आता केंद्र सरकार अकालींशी खेळत आहे.

आसामात संघर्ष चालूच आहे. साईकीया यांच्या मंत्रिमंडळाला लोकांचा पाठिंबा नाही. उलट त्यावर आसामींचा राग आहे. मग ते त्यांना सुखासुखी राज्य करू देणार नाहीत याबद्दल वादच नाही. केंद्रसरकारही आपल्या पक्षाची राजवट आसामवर थोपण्याच्या आपल्या हट्टाग्राही मताशी चिकटून बसलंय. वाटाघाटींना मार्ग बंद झालाय. हे न संपणारे दुष्टचक्र आहे. आसामींना आपल्या देशाबद्दल प्रेम वाटू नये व त्यांच्यात प्रादेशिकता जाग-

पृष्ठ २२ वर




# पोलंडचा पुरुषोत्तम लेक वालेसा

पोलंडमधल्या 'बेबंदशाहीचा' शेवटचा अंक सुरू झाला. राजकारणाच्या रंगमंचावर खलनायकाचं आगमन झालं होतं. फेब्रुवारीच्या ९ तारखेस पोलंडच्या पंतप्रधानपदी जनरल यारुझेस्की या लष्करी अधिकाऱ्याची नेमणूक करण्यात आली. राज्यकारभाराची सूत्रं त्यांच्या हाती सोपविण्यात आली तरी पक्षाचे प्रमुख म्हणून कानियाच काम पहात होते. कम्युनिस्ट देशात सत्तेची सूत्रं खऱ्या अर्थानं पक्षप्रमुखाच्या हाती असतात, राज्यप्रमुखाच्या नव्हे. त्यामुळं जनरलसाहेबांच्या मनात असूनही बऱ्याच गोष्टी त्यांना करता येत नव्हत्या. देशात माजलेला सावळागोंधळ सावरण्यासाठी अस्तन्या सावरून कामाला लागण्याची गरज होती. सॉलिडॅरिटीनं कानियांच्या बोटचेपेपणाचा पुरेपूर फायदा उचलला होता. मवाळ प्रवृत्तीच्या कानियांना सॉलिडॅरिटीनं खिशात घातलं आहे अशी समजूत करून घेणं क्रेमलिनच्या दृष्टीनं चुकीचं नव्हतं. या संदर्भात क्रेमलिनमध्ये उच्च वर्तुळात झालेलं एक संभाषण बोलकं आहे.

ब्रेझनेव्ह : कानियांना आपण तीनतीनदा इथं बोलावून घेतलं; पण त्याचा काही फायदा झालेला दिसत नाही.

ग्रोमिको : इथं करण्यात आलेलं त्यांचं ब्रेनवॉशिंग म्हणजे पालथ्या घड्यावर पाणीच असं म्हणायला हरकत नाही.

ब्रेझनेव्ह : आणखी एकदा विचारून पाहू या का ?

ग्रोमिको : परिस्थितीत काहीच फरक दिसत नाही.

ब्रेझनेव्ह : या गोष्टीचा गंभीरपणे विचार करायला हवा, अन् तोही तातडीनं.

ग्रोमिको : त्याला पदच्युत करून पाठवायचं तरी कुठं ? तसा तो फार लोकप्रिय मनुष्य आहे.

ब्रेझनेव्ह : अशी लोकप्रिय माणसं पोकळ लोकशाहीच्या प्रमुखपदीच शोभून दिसतात. त्याला एखाद्या धाईला आलेल्या लोकशाहीत पंतप्रधान म्हणून पाठवून द्या ! ( थोडंसं हसून ) आपण असं करू. त्याचे सर्वच अधिकार काढून घेऊ आणि जनरल यारुझेस्कीला देऊन टाकू.

हे संभाषण अमेरिकेतल्या एका लोकप्रिय दैनिकानं यारुझेस्कींची पंतप्रधानपदी निवड झाल्यानंतर काही दिवसांनी प्रसिद्ध केलं होतं. यात भविष्यवाणीपेक्षा विडंबनाचाच भाग जास्त होता; पण हे विडंबन काही महिन्यातच सत्यात उतरलं आणि अमेरिकेतल्या इतर दैनिकांच्या संपादकांनी तोंडात बोटं घातली. वॉशिंग्टन पोस्टनं तर हे विडंबनात्मक संभाषण उद्धृत करून शेवटी एक छोटीसी टीप जोडली होती, या संभाषणावरूनच ब्रेझनेव्हना कानियाची राजकीय वस्त्रं उतरण्याची प्रेरणा मिळाली नसेलच असं नाही.

कानियांची पक्षप्रमुखपदावरून हकालपट्टी करण्यात आली. कारण सॉलिडॅरिटीला नमविण्यात कानिया अपयशी ठरले. वालेसाला वाकविण्याचा वकूब ते दाखवू शकले नाहीत. पक्षप्रमुखाची वस्त्रं जनरलसाहेबांच्या अंगावर चढविण्यात आली. वास्तविक सोव्हिएट साम्राज्यात हा प्रकार अनोखा होता. कम्युनिस्ट पक्षाच्या नागरी प्रमुखानं लष्कराची सूत्रं हाती ठेवायची हा त्यांचा नेहमीचा शिरस्ता. लष्करप्रमुखाला पक्षाची सूत्रं देऊन क्रेमलिननं सर्वच कम्युनिस्ट देशांना आश्चर्याचा धक्का दिला होता. निष्कर्ष एकच : सोव्हिएट सत्ताधिशांचा विश्वास पूर्णपणे गमावण्यात पोलंडचा कम्युनिस्ट पक्ष यशस्वी (?) ठरला होता.

पक्षप्रमुख, राज्यप्रमुख आणि लष्करप्रमुख या तिन्ही बिरुदावल्या लाभल्यामुळं जनरल यारुझेस्कीसारखा पूर्वी जवळजवळ अज्ञात असणारा माणूस एकदम प्रसिद्धीच्या झोतात आला आणि तो पोलंडच्या इतिहासातला सर्वसमर्थ सत्ताधीश बनला.

यारुझेस्कीची निवड करताना मास्कोनं बऱ्याच गोष्टींचा विचार केला असणार. त्याची पार्श्वभूमी पडताळून पाहिली असणार, त्याच्या श्रद्धा, समजुती विचारात घेतल्या असणार. दहा वर्षांत पोलंडच्या प्रमुखपदासाठी तीन-तीन बदल मास्कोला घडवून आणावे लागले होते. त्यामुळं तेथील स्थैर्य कमी कमी होत गेलं होतं. आता हा जुगार पुन्हा खेळण्याची मास्कोची इच्छा नव्हती.

जनरल यारुझेस्की यांचं लष्करी शिक्षण सोव्हिएट मिलिटरी अॅकॅडमीत झालं होतं. दुसऱ्या महायुद्धात रशियन सेनाधिकाऱ्यांच्या खांद्याला खांदा लावून लाल सेनेतून त्यांनी नाझी शत्रूंशी झुंज घेतली

होती. सरळ आणि स्वच्छ चारित्र्याच्या या माणसाच्या कम्युनिझम-विषयीच्या निष्ठा अढळ होत्या. गिरेक आणि कानिया यांच्या सरकारात बोकाळलेला लाचखाऊपणा निर्दयपणे निपटून टाकण्यात हा माणूस मागं पुढं पाहणार नाही, याची क्रेमलिनला खात्री होती. दहा वर्षं पोलिश पॉलिटब्यूरोमध्ये महत्त्वाच्या पदावर काम करून देखील अंतर्गत स्पर्धा आणि तंटेबखेडे यापासून अलिप्त राहण्याचं धैर्य त्यांनी दाखवलं होतं आणि सर्वात महत्त्वाची जमेची बाजू म्हणजे संरक्षणमंत्री म्हणून पोलंडचं लष्कर त्यांनी सदैव शिस्तबद्ध आणि सुसज्ज ठेवलं होतं. त्यामुळं पोलंडच्या जनतेच्या मनातील लष्कराविषयीचा आदर कधीही कमी झाला नाही.

## पुढच्या नाटकाची नांदी !

वालेसाप्रमाणं अचानक प्रसिद्धी लाभलेला हा माणूस वालेसापेक्षा किती तरी वेगळा होता. भलं मोठं टक्कल असलेल्या या माणसाचा चेहरा प्रथमदर्शनी काहीसा उग्र आणि थंड वाटतो. डोळ्यांवर सदैव असलेल्या काळ्या चष्म्यामळं त्याच्या उग्रतेत आणखीनच भर पडते. वास्तविक हा चष्मा त्याला असलेल्या डोळ्यांच्या जुनाट विकारामुळं डॉक्टरांच्या सल्ल्यानुसार मनाविरुद्ध घालावा लागतो; पण आपल्या भावना लपविण्यासाठी तो काळा चष्मा वापरतो असा गैरसमज पोलिश जनतेत विनाकारणच पसरला आहे. मात्र एका गोष्टीसाठी पोलिश जनतेचा आदर त्याला पुरेपूर प्रमाणात मिळाला आहे, ती म्हणजे संप करणाऱ्या कामगारांविरुद्ध त्यानं सैनिकांचा वापर करण्याचं नेहमीच नाकारलं आहे. संरक्षणमंत्री असताना त्यानं सरकारला जाहीरपणे ठणकावून सांगितलं, 'पोलिश सैनिक पोलिश कामगारांवर कधीही गोळ्या झाडणार नाहीत. 'Polish soldiers will not fire on Polish workers.' त्याच्या या उद्गारांना बिगरकम्युनिस्ट राष्ट्रांनी इतकी प्रसिद्धी दिली होती की, यासाठी त्याला वरिष्ठांकडून कानपिचक्याही मिळाल्या होत्या. यारुझेल्स्कींची पोलंडच्या प्रमुखपदी नेमणूक होताच, पूर्वी एकदा लष्करात नोकरी केलेल्या लेक वालेसानं उद्गार काढले, 'यारुझेल्स्की हा हाडाचा सैनिक आहे आणि पोलंड आपल्या सैनिकांवर प्राणापेक्षा जास्त प्रेम करतं !'

सत्तेवर आल्या आल्या सेनेला बराकीतून बाहेर काढण्याचं काम यारुझेल्स्कीनं केलं. ३५०० सेनाधिकारी आणि त्यांचे सहकारी यांना पोलंडच्या लहान मोठ्या गावात पाठविण्यात आलं. तो ऑक्टोबर महिना होता. विस्कळित झालेली नागरी यंत्रणा सुरळीत करणं, अन्नधान्याच्या वाटपातले अडथळे दूर करणं आणि सामाजिक सुव्यवस्थेला हातभार लावणं इत्यादी कामं त्यांच्यावर सोपविण्यात आली होती. हे सारं करताकरताच लाचखाऊ आणि निष्काळजी नागरी अधिकाऱ्यांना शोधून काढून त्यांना योग्य ते शासन करण्याचं कामही त्यांनी सुरू केलं होतं.

या सेनाधिकाऱ्यांचं लोकांनी सहर्ष स्वागत केलं. मुळातच पोलिश जनतेचा लष्करावर भलता विश्वास ! त्यामुळं लष्करानं हाती घेतलेली 'सफाईची' मोहीम लोकांना स्वागतार्ह वाटली नसल्यासच नवल ! अनागोंदी माजलेल्या पोलंडमध्ये लष्कर शिस्त आणि सुव्यवस्था आणू शकेल असा विश्वास लोकांना वाटू लागला यारुझेल्स्कीबद्दलचा आदर दुणावला आणि हे नवे राजकीय नेतृत्व आपल्याला सुखासमाधानाचे दिवस दाखविणार याची लोकांना खात्री वाटू लागली.

वरवर पाहता हे चित्र मोठं गोंडस दिसत होतं. सेनाधिकारी लोकांशी मोठ्या गोडीगुलाबीनं वागत होते. लोककल्याणाचा लष्कराला आलेला हा पुळका प्रथमदर्शनी मोठा विलोभनीय वाटला; पण दिसतं तसं नसतं हे पोलिश जनतेला कळायला अजून महिन्या-दोन महिन्यांचा अवधी होता. लोककल्याणाचं पवित्र कार्य साधतासाधता सॉलिडॅरिटीच्या संभाव्य आणि अंतस्थ हालचालींची इत्थंभूत माहिती लष्कराच्या गुप्त दप्तरात जमा होऊ लागली. सरकार व पक्षविरोधी कारवायांच्या नोंदी गुपचुपपणे वर पाठविल्या जाऊ लागल्या. जनतेची सहानुभूती संपादन करून सॉलिडॅरिटीच्या पाठीत खंजीर खुपसण्याची ही तयारी असावी अशी शंका सॉलिडॅरिटीलादेखील आली नाही, यातच यारुझेल्स्कीचं यश सामावलं आहे. लष्करी कायदा लागू झाल्यानंतर मात्र स्वतःला चाणाक्ष राजकीय निरीक्षक समजणारे लोकदेखील आश्चर्यानं तोंडात बोट घालून म्हणू लागले, 'अरे ! ही तर पुढं घडणाऱ्या घटनांची चाहूल होती, लवकरच होणाऱ्या नाटकाची नांदी होती.' पोलंडमध्ल हे पहिलंच नेतृत्व असं होतं की ज्याच्या खेळीचा थांगपत्ता शेवटच्या क्षणापर्यंत कुणालाही लागू शकला नाही.

प्रत्यक्ष नाटक सुरू व्हायच्या आधी यारुझेल्स्कीनं वेगळाच पवित्रा घेतला. त्यानं साऱ्या देशाला एकीचं आव्हान केलं. सॉलिडॅरिटी आणि धर्मपीठं यांना प्रेमाची निमंत्रणं गेली. कम्युनिस्ट पक्ष, सॉलिडॅरिटी आणि चर्चेस यांनी एकत्र येऊन देशाचे अवघडलेले प्रश्न सोडवावेत अशी विनंती सरकारनं त्यांना केली. लोकशाहीच्या सूर्याचा उदय पोलंडच्या राजकीय क्षितिजावर होत आहे असाच भास

---

**वालेसाचा आजवर असा अपमान कधी झाला नव्हता. त्याच्या नेतृत्वाला असं उघडउघड आव्हान देण्याचं धाडस यापूर्वी कोणी दाखवलं नव्हतं. त्याच्या अहंकाराला डिवचण्याचं सामर्थ्य दुसऱ्या कोणत्याही नेत्यात नव्हतं. लोकप्रियतेच्या दृष्टीनं त्याच्या जवळपास देखील कोणी येऊ शकत नव्हतं. असं असताना अशा उद्धटपणे आपल्याला जाब विचारण्यात यावा याचा वालेसाला विलक्षण धक्का बसला !**

**लेखांक : आठवा । लेखक : श्रीकांत मुंदरगी**

---

साऱ्यांना होऊ लागला. राज्यसत्ता, लोकसत्ता आणि धर्मसत्ता एकत्र येऊन पोलंडवर रामराज्य आणणार अशी सुखस्वप्नही अनेकांना पडू लागली.

## विलक्षण धक्का

नोव्हेंबर ४.. वार्साच्या पार्कोवा गेस्ट हाउसवर पोलंडचे सर्व क्षेत्रातले नेते एकत्र जमले होते. लष्करी गणवेषावर शौर्यपदकं लटकावलेल्या जनरल यारुझेल्स्कींनी १ कोटी कामगारांचं नेतृत्व करणाऱ्या विक्षिप्त वालेसाचं प्रेमभरानं हस्तांदोलन करून स्वागत केलं आणि म्हणाले, 'देशातल्या कामगारांच्या सर्वश्रेष्ठ नेत्याचं लष्कराचा प्रमुख या नात्यानं मी मन:पूर्वक स्वागत करतो !' वालेसानं या स्वागताचा स्वीकार करताना उद्‌गार काढले, 'दोन मोठ्या शक्ती आज एकत्र येण्याचा हा गेल्या तीस वर्षातला पहिला सुयोग आहे आणि सर्वात भाग्याची गोष्ट म्हणजे याला पोलंडमधल्या सर्वात मोठ्या शक्तीचा म्हणजे धर्मशक्तीचा आशीर्वाद लाभतो आहे. तीन कोटी पोलिश कॅथॉलिकांचा धर्मगुरू आर्चबिशप जोसेफ ग्लेम्प यांनी प्रथम यारुझेल्स्कींना आणि नंतर वालेसाला कवेत घेऊन आपल्या शुभेच्छा व्यक्त केल्या.

२ तास २० मिनिटं चाललेल्या या चर्चेत पोलंडच्या उज्ज्वल भवितव्याचा आराखडा आखण्यात आला. देशाची एकी अभंग राखण्याची वचनं एकमेकाला दिली गेली. पोलंडचे प्रश्न पोलंडनंच सोडवायचे याविषयी साऱ्यांचं एकमत झालं. साऱ्या देशाचं लक्ष वेधलेल्या या तीन मोठ्या नेत्यांच्या वाटाघाटीतून काय निष्पन्न होणार याची अचूक जाण फक्त यारुझेल्स्कीवगळता एका नियतीलाच होती.

इकडं सॉलिडॅरिटीच्या महामंडळानं वालेसाला धारेवर धरलं. सरकारशी एकट्यानं वाटाघाटी करण्याचा अधिकार कुणी बहाल केला असाही प्रश्न त्याला विचारण्यात आला. वाटाघाटींचं फलित काय, असं विचारताच सॉलिडॅरिटी आणि सरकार यापुढं चर्चेसाठी नेहमीच एकत्र येतील असं त्यानं उत्तर दिलं. अजून खूप वाटचाल करायची आहे तेव्हा कुठं इच्छित स्थळी पोहोचणं शक्य होईल, ही तर नुकती सुरुवात आहे असं त्यानं सांगताच एका चिडलेल्या नेत्यानं वालेसाला ठणकावलं, 'आम्हाला लाळघोटेपणा नको, काळकाढूपणाही नको आम्हाला सरकारशी नमतं घेणाऱ्या नेत्याकरवी वाटाघाटीही नकोत. आम्हाला देशात लोकशाही हवी आहे. त्याअगोदर आम्हाला ती संघटनेतदेखील हवी आहे. या असल्या हुकुमशाहीचा आम्ही धिक्कार करतो. जे संघटनेत हुकूमशाही करतात ते देशाला काय लोकशाही देणार ?'

वालेसाचा आजवर असा अपमान कधी झाला नव्हता. त्याच्या नेतृत्वाला असं उघडउघड आव्हान देण्याचं धाडस यापूर्वी कोणी दाखवलं नव्हतं. त्याच्या अहंकाराला डिवचण्याचं सामर्थ्य दुसऱ्या कोणत्याही नेत्यात नव्हतं. लोकप्रियतेच्या दृष्टीनं त्याच्या जवळपासदेखील कोणी येऊ शकत नव्हतं. असं असताना अशा उद्धटपणे आपल्याला जाब विचारण्यात यावा याचा वालेसाला विलक्षण धक्का बसला. त्याला झालेलं अनावर दु:ख त्याच्या डोळ्यांतून आसवांच्या रूपानं ओघळू लागलं आणि मोठ्या आवाजात ओरडून तो म्हणाला 'ठीक आहे. सरकारशी मी बोलणी करू नयेत तशी तुमची इच्छा असेल तर ते मला मान्य आहे; पण यापुढं असंस्कृत आणि रानटी लोकांशीही बोलणी करण्याची माझी इच्छा नाही; पण ध्यानात ठेवा या गोष्टीवर मतदान झालं पाहिजे. लोकशाहीत मतदानानंच सर्व प्रश्न सोडवायचे असतात.' विरोधकांचे दात त्यांच्याच घशात घालण्याचा त्यानं जणू पणच केला होता. त्याला हे पक्कं ठाऊक होतं की, सॉलिडॅरिटीला आपल्यावाचून पर्याय नाही. अन् झालंही तसंच. बऱ्याच वादावादीनंतर सॉलिडॅरिटीनं सरकारशी चर्चा करण्याचे सर्वाधिकार अखेरीस वालेसाकडेच सुपूर्द केले. मात्र त्याला एक छोटंसं गालबोट लावण्यात आलं होतं. तीन महिन्यात वाटाघाटी यशस्वी झाल्या नाहीत तर देशव्यापी संप सुरू करण्यात यायचा होता. तसंच वालेसानं विनंती करूनही मधूनमधून निरनिराळ्या ठिकाणी होणारे छोटे छोटे स्थानिक संप थांबविण्याचंही अमान्य करण्यात आलं.

यारुझेल्स्की आणि वालेसा यांच्या भेटीगाठी होत राहिल्या. चर्चेतून निरनिराळे प्रश्न पुढं येत होते; पण त्यांची निश्चित उत्तरं मिळत नव्हती. सरकार कोणत्याही गोष्टीची हमी द्यायला तयार नव्हतं सुधारणांची आश्वासनं मिळत राहिली; पण प्रत्यक्षात सुधारणा घडून येत नव्हत्या. नाही तरी आश्वासनं देणं एवढंच सरकारचं काम असतं, असं जगातल्या अनेक सरकारांचं ठाम मत आहे. आश्वासनं अमलात आणावी अन् तीही अगदी तातडीनं अशी आवश्यकताच त्यांना वाटत नाही. पोलंडही त्याला अपवाद नव्हतं.

## धर्मपीठाचा मार्गच योग्य !

सरकारनं सॉलिडॅरिटीला दिलेल्या आश्वासनांची पूर्तता करण्यास टाळाटाळ सुरू केली होती, मात्र सॉलिडॅरिटीकडून सरकारची अपेक्षा वाढतच होती.

सरकारच्या आर्थिक योजनेला सॉलिडॅरिटीनं पाठिंबा द्यावा अन् तोही बिनशर्त अशी त्यांची मागणी होती.

सरकारला दैनंदिन गरजेच्या वस्तूंची किंमत भरपूर वाढवायची होती, तीही सॉलिडॅरिटीच्या संमतीनं. एका दगडात दोन पक्षी मारण्याची ही युक्ती होती. किंमती वाढविल्या की सरकारचा रिता खजिना भरता येईल आणि सॉलिडॅरिटीचा भाववाढीला पाठिंबा असल्यामुळं जनता सॉलिडॅरिटीवर नाराज होईल आणि तिच्या लोकप्रियतेला आपोआपच ओहोटी लागेल.

चांगल्या गोष्टी करण्यासाठी सरकारला सॉलिडॅरिटीच्या सहकार्याची गरज भासत नव्हती. कारण त्याचं श्रेय फक्त आपल्याला मिळावं, त्यात सॉलिडॅरिटीची भागिदारी नको ही सरकारची इच्छा. दुष्कृत्यात मात्र वाईटपणा घ्यायला सॉलिडॅरिटीचं सहकार्य त्यांना हवं होतं.

सॉलिडॅरिटीनं याला नकार दर्शविताच सरकारनं ठेवणीतलं अस्त्र बाहेर काढलं. जिवापाड भांडून गडॅन्स्कच्या वाटाघाटीत मिळवलेले संपाचे हक्क काढून घेण्याची भाषा सरकार बोलू लागलं. परिणाम व्हायचा तोच झाला ... संघर्षाला सुरुवात झाली !

सरकार आणि सॉलिडॅरिटी यांच्या विचारांची दरी रुंदावतच चालली.

सॉलिडॅरिटीला पाठिंबा देणारं कॅथॉलिक धर्मपीठ ही कोंडी फोडू शकलं नाही. सरकार आणि सॉलिडॅरिटी यातला हा महत्त्वाचा दुवा दुर्बल ठरण्याची भीती निर्माण झाली.

मरगळलेल्या वाटाघाटीत चैतन्य आणण्याच्या सदिच्छेनं व्हॅटिकनच्या धर्मपीठावरून पोप पॉलनी सॉलिडॅरिटीला आपला पाठिंबा जाहीर केला, 'प्रत्येक माणसाला त्याचे हक्क मिळालेच पाहिजेत, कामगारांचा संप करण्याचा हक्क हिरावून घेणं म्हणजे माणुसकी पायदळी तुडविण्यासारखं आहे!'

याचा परिणाम उलटाच झाला. सॉलिडॅरिटी धर्मपीठाशी संगनमत करून कम्युनिझमचा नायनाट करण्याचा कट रचत आहे असा आरोप कम्युनिस्ट पक्षातर्फे करण्यात आला. त्या गंभीर आरोपाला रशियाची फूस असणार हे ओळखायला राजनीतिज्ञांची गरज नव्हती- संघर्षानं गंभीर वळण घेतलंय याची जाणीव सर्वांनाच झाली.

सरकार आणि सॉलिडॅरिटीच्या संघर्षात धर्मपीठाला गुंतविण्याची वालेसाची इच्छा नव्हती. त्याचं मत होतं, चर्चला या संघर्षात ओढणं आपल्याला फायद्याचं वाटत असलं तरी ते चर्चच्या दृष्टीनं घातक आहे. या संघर्षाचा शेवट काय होणार आहे हे परमेश्वरालाच ठाऊक! कदाचित आमची सर्व वाटचाल चुकीची ठरण्याचा संभव आहे; पण धर्मपीठाचं चुकलं असं कुणीही म्हणता कामा नये. धर्मपीठानं चोखाळलेला मार्ग योग्य तोच असायला हवा.

We cannot put the church at risk, because we do not know how this will end. We may be wrong, but church has to be right.

हे उद्गार वालेसाच्या प्रगाढ धर्मश्रद्धेचे निदर्शक होते.

## स्वातंत्र्याचा पुन्हा अस्त

सरकार आणि सॉलिडॅरिटीच्या वाटाघाटी फिसकटल्या तसं यारुझेस्कींनी आक्रमक पवित्रा घेतला. संपावर बंदी घालणारा ठराव त्यांनी पार्लमेंटकडं मंजुरीसाठी पाठविला. कम्युनिस्ट देशात सरकारला हवी असणारी गोष्ट पार्लमेंटकडून तात्काळ मंजूर होऊन मिळते. कारण पार्लमेंटवर कम्युनिस्ट पक्षाची सत्ता असते; पण यारुझेस्कींनी पाठवलेला ठराव पार्लमेंटमध्ये मंजूर होऊ शकला नाही. पोलंडचा कम्युनिस्ट पक्ष मोडकळीस आला असून त्याची अंतर्गत शिस्त संपूर्ण संपुष्टात आली आहे हाच या गोष्टीचा पुरावा होता.

इकडं पक्ष मोडकळीस आलेला, अर्थव्यवस्था कोसळत चाललेली, सॉलिडॅरिटीचा जोर वाढलेला अन् तिकडं रशियाची बोचणी तीव्र होत चाललेली! अशा इकडं आड अन् तिकडं विहीर असलेल्या बिकट परिस्थितीत यारुझेस्की सापडले होते. आता त्यांना एकुलता एक आधार शिल्लक होता तो म्हणजे लष्कराचा. हा भात्यातला शेवटचा बाण काढण्याआधी वार्साच्या अग्निशामक शिक्षणसंस्थेत विद्यार्थ्यांचा चाललेला बैठा संप मोडण्यासाठी यारुझेस्कींनी राखीव पोलिसदलाला पाठविलं. विद्यार्थ्यांना पकडून नेण्यात आलं. या गोष्टीच्या निषेधार्थ राजधानीत सॉलिडॅरिटीने निषेधमोर्चे काढले. त्यांच्या प्रतिकारासाठी उरलेलं पोलिसदलही बाहेर पडलं; पण दंगेधोपे आटोक्यात येईनात. यारुझेस्कींना लष्कराला पाचारण करायचं होतं; पण त्यासाठी तसंच जबरदस्त कारण शोधणं जरूर होतं. सरकारनं ते शोधून काढलं.

एका कुठल्या तरी सॉलिडॅरिटीच्या महत्त्वाच्या बैठकीत वालेसा आपल्या भाषणात त्वेषानं उद्गारला होता, 'अखेर संघर्ष हा अटळ आहे आणि आज ना उद्या तो होणारच!' केव्हा तरी ध्वनिमुद्रित केलेले वालेसाचे हे उद्गार आकाशवाणीवरून पोलिश जनतेला ऐकविण्यात आले आणि निवेदकानं वालेसावर प्रथमच अगदी कडाडून आणि कठोर शब्दात हल्ला चढविला, 'जनतेची दिशाभूल करणारा हा माणूस मूठभर मूर्ख माणसांचं नेतृत्व करतो आणि देशात अराजक माजवून देशाला विनाशाकडं नेण्याचा प्रयत्न करतो!' कटाची एवढी सिद्धता झाल्यानंतर जनरल यारुझेस्की अंतिम निर्णय घेण्याच्या तयारीत असतानाच सॉलिडॅरिटीनं सरकारनं लावलेल्या सापळ्यात स्वतःहून उडी घेतली. सॉलिडॅरिटीच्या अखेरच्या बैठकीत अतिमहत्त्वाचा असा एक ठराव चर्चेसाठी घेण्यात आला. पोलंडचा राज्यकारभार चालविण्यास सध्याचं कम्युनिस्ट सरकार लायक आहे की नाही हे सार्वजनिक लोकमतानं ठरविण्यात यावं, तसंच पोलंड आणि रशिया यांच्यात असलेला लष्करी करार यापुढं चालू ठेवावा किंवा नाही हेही लोकमतानंच ठरविण्यात यावं असा हा ठराव कडाक्याच्या चर्चेनंतर बहुमतानं मंजूर करण्यात आला. फक्त वालेसा आणि काही मवाळ मतवादी सदस्य यांनी या ठरावाला विरोध केला. वालेसाची भविष्यवाणी तर तंतोतंत खरी ठरली! '१२ डिसेंबरचा हा ठराव म्हणजे आपल्या स्वातंत्र्याची मृत्युघंटा ठरण्याची शक्यता आहे. आपणहून शत्रूच्या हाती मशाल पेटवून देणं म्हणजे वणव्याला निमंत्रण देण्यासारखंच आहे!'

पोलंडचं सरकार आणि त्यांचे रशियन पाठराखे यांनी सॉलिडॅरिटीचे शंभर अपराध पोटात घातले असते; पण कम्युनिझमवरचा हा उघडउघड हल्ला त्यांना मुळीच सहन होण्याजोगा नव्हता. सरकारच्या गुप्तहेरांनी सॉलिडॅरिटीच्या रात्री उशिरापर्यंत चाललेल्या बैठकीचा अहवाल सरकारकडं पाठविला. अजूनही ही बैठक संपण्यापूर्वीच जनरल यारुझेस्कींनी क्रेमलिनशी फोनवर संपर्क साधून तो महत्त्वाचा निर्णय घेतला.

जनरल यारुझेस्की पोलंडवर लष्करी कायदा लागू करण्याच्या आज्ञापत्रावर सही करीत असताना तिकडं सॉलिडॅरिटीच्या बैठकीचा समारोप वालेसा आपल्या वैफल्यग्रस्त परंतु क्रुद्ध आवाजात करत होता, 'तुम्ही घेतलेल्या निर्णयाचे परिणाम देशाला बराच काळ भोवणार आहेत. भावनेच्या भरात घेतलेले निर्णय भवितव्याला भलतंच वळण देऊ शकतात हे विसरू नका! आजचा हा ठराव पास करून आपण आपल्याच पायावर धोंडा पाडून घेत आहोत!'

वालेसा आणि सॉलिडॅरिटीचे नेते बैठक संपवून रात्रीच्या अंधारात घरोघरी परतत होते त्या वेळी सरकारी आज्ञेनुसार बाहेरच्या जगाशी पोलंडचा संपर्क पूर्णपणे तोडण्यात आला होता ... वार्साच्या लष्करी तळावरून रणगाडे शहराच्या रोखानं धावत निघाले होते ... पोलंडमधले सर्व नागरी विमानतळ परदेशी विमानांना बंद करण्यात आले होते ... कारखाने, खाणी, गिरण्या साऱ्यांवर लष्कराचा पहारा बसविण्यात आला होता ... संगिनी रोखून पोलिश सैनिक शहरांच्या रस्त्यारस्त्यांतून गस्त घालू लागले होते ... पोलंडच्या नागरी स्वातंत्र्याचा पुन्हा एकदा अस्त झाला होता. (क्रमशः)

रंगभूमी

# एक वाजून गेला आहे !

## नाटककाराच्या प्रतिभाशोधात सहा पात्रे

'कन्यादान 'मध्ये विजय तेंडुलकरांनी समाजवादी माणसाची पार्श्वभूमी नाटकासाठी घेतली होती त्याच्या जोडीनेच साम्यवादी नेत्याच्या आयुष्याची पार्श्वभूमी लाभलेले नवे नाटक ' एक वाजून गेला आहे!' ड्रॉपर्स या संस्थेतर्फे रंगभूमीवर आले. नाटकाचे लेखक आहेत श्री. गोविंद पुरुषोत्तम देशपांडे.

' उध्वस्त धर्मशाळा ' या आपल्या पहिल्याच नाटकाने गाजलेल्या या लेखकाने ' उध्वस्त धर्मशाळा ' या नाटकाच्या पुस्तकाला एक अतिशय सुंदर प्रस्तावना लिहिली आहे तीच प्रस्तावना देशपांडेचांच्या ' एक वाजून गेला आहे !' या नाटकालाही लागू पडेल, असे मला वाटते साहजिकच ' एक वाजून गेला आहे !' च्या संदर्भात ' उध्वस्त धर्मशाळा ' या नाटकाचा आणि तिच्या प्रस्तावनेचा वारंवार संदर्भ घेणे मला आवश्यक वाटते. ' एक वाजून गेला आहे !' च्या बाबतीत लिहिताना त्या नाटकाचे दिग्दर्शक डॉ. श्रीधर कानेटकर यांच्याशी मी चर्चा केली आहे. त्यातील काही मुद्द्यांचा सर्वप्रथम उल्लेख करतो.

साधारण एकोणीसशे पंच्याहत्तरच्या दरम्यान देशपांडेचांनी हे नाटक लिहिले. आणीबाणीच्या कालखंडात त्याला हात लावण्याची बात कोणी केली नाही. नंतर डॉ. श्रीराम लागू, अरविंद देशपांडे अशा बुजुर्गांकडे ते नाटक रंगभूमीवर जाण्याची वाट पाहात पडून होते. अखेर ड्रॉपर्सने जिद्दीने एक आव्हान म्हणून हे नाटक रंगभूमीवर आणले.

या नाटकाची सुरुवात करताना डॉ. कानेटकरांना पहिला प्रश्न पडला तो त्यातील नानासाहेब अग्निहोत्री या प्रमुख व्यक्तिरेखेचा. पंचाहत्तरीच्या वृद्धाची ही भूमिका करण्यासाठी ड्रॉपर्समधील कोणी तरुण कलाकार निवडून अगदी गॅदरिंगचे नाटक होणे टाळण्यासाठी कानेटकरांनी ड्रॉपर्सबाहेरील कलाकार घेण्याचे ठरवले. त्यासाठी त्यांनी चार कलाकारांकडे विचारणा केली. 'जागर' या नाट्यसंस्थेच्या संमतीने त्या संस्थेतील कलाकार श्री. वासुदेव पाळंदे यांनी शेवटी नानासाहेबांची भूमिका केली. माझ्या मते. पुण्याच्या हौशी रंगभूमीवर या निमित्ताने एक नवी चांगली प्रथा पडत आहे. संस्थाबाजीचे तट ढासळून ' हे परस्परसहकार्य चालवणे म्हणजे आपली संस्था दुसऱ्याच्या गोठ्यात नेऊन बांधणे नव्हे ' ही जाणीव सगळ्याच संस्थांमध्ये पसरली, तर या नवीन साथीचे स्वागतच होईल.

नाटकाबद्दल काही लिहिण्यापूर्वी शेवटच्या गोष्टीचा उल्लेख म्हणजे–नाटकातील बऱ्याच भागांबद्दल उपस्थित झालेले आक्षेप, शंका डॉ. कानेटकरांनी त्यांच्या देशपांड्यांशी झालेल्या चर्चेमध्ये उपस्थित केले. त्यांच्यापैकी काही देशपांडेचांनी मान्यही केले; परंतु त्याच वेळी सुमारे सात-आठ वर्षांपूर्वी लिहिलेल्या या नाटकात आता तितकीशी भावनिक जखडणूक न राहिल्याने ते भाग पुनर्लिखित करण्यासंबंधी असमर्थताही व्यक्त केली.

### पार्श्वभूमी–लेखकाची, ' धर्मशाळा 'ची

प्रा. गोविंद पुरुषोत्तम देशपांडे दिल्लीच्या जवाहरलाल नेहरू विद्यापीठात राज्यशास्त्र विभागाचे अध्यापन करतात. साहजिकच त्यांच्या लेखणीतून उतरणारे राजकीय आणि सामाजिक परिस्थितीचे चित्र हे जाणकाराने केलेले विवेचन बनते. या सर्व परिस्थितीसंबंधी त्यांनी केलेले मतप्रदर्शनही डोळस आणि तज्ज्ञ भाष्य ठरते. हा अनुभव ' धर्मशाळा 'च्या बाबतीत नाटक आणि प्रस्तावना दोन्हीतून प्रकर्षाने येतो.

देशपांडेचांच्या मते–नाटकात एक सामाजिक वास्तव दिसते, असते, (या सामाजिक वास्तवाचा आजच्या परिस्थितीच्या संदर्भात विचार करताना) सगळ्या क्षेत्रात नेतृत्व फार लहान माणसांकडे आहे. त्यात पर्वतप्राय महत्तेचा माणूस कुणी दिसत नाही. आहेत त्या लहानसहान टेकड्या...अर्थात मोठेपण नाहीच असा याचा अर्थ नव्हे, परंतु हे बरेचसे पराभूत मोठेपण आहे. कुठे चमक दिसलीच, कुठे खिळवून टाकणारा विचार दिसलाच, कुठे दूरवर चळवळ दिसलीच तर ती बहुधा ह्या पराभूतांमुळे आहे. ही मंडळी नवीन भविष्य निर्मू शकत नाहीत; परंतु आज ना उद्या नवीन भविष्य येईल एवढा आशावाद ही मंडळी जागा ठेवून आहेत. आजच्या यशस्वी लेखकांपेक्षा, राजकारणधुरंधरांपेक्षा, सामाजिक प्रबोधनाच्या मिरासदारांपेक्षा काही बरेच मोठे ह्या मंडळींनी अनुभवलेले आहे. पराभूत असूनही, दुर्लक्षित असूनही... ही माणसे पराभूत का होतात व त्याहीपेक्षा ती काय असतात की ज्यामुळे ती पराभूत होतात, हे ' उदास गरुड ' असे खाली का झेपावतात ह्याचा कलात्मक पातळीवर शोध घेण्याचा एक प्रयत्न म्हणजे ' उध्वस्त धर्मशाळा ' हे नाटक. ' धर्मशाळा ' मध्ये आशयाच्या दृष्टीने तर हा शोध अत्यंत भेदक स्वरूपात झालेला आहेच; पण नाटकाची तांत्रिक बांधणीही देशपांडेचांनी अत्यंत पक्की आणि कसबी रेखीवपणे केलेली होती. ' धर्मशाळा 'तील नायकाच्या चौकशीच्या निमित्ताने नाटकाच्या सुरुवातीपासूनच उभा ठाकणारा संघर्ष त्यातील भूतकालीन घटनादृश्ये वा स्मृतिदृश्यांच्या आधारे अधिकाधिक गडद होत जातो, त्यातून उघड होणाऱ्या उच्चपदस्थांच्या क्षुद्रतेमुळ नायकाचे पराभूत मोठेपणही त्या पार्श्वभूमीवर विलक्षण मोह घालते.

या सगळ्या पार्श्वभूमीचा विचार करता ' एक वाजून गेला आहे !' या नाटकाच्या बाबतीत मात्र माझा बराच गोंधळ उडाला.

नारायण गोपाळ ऊर्फ नानासाहेब अग्नि-

होत्री हे साम्यवादी पुढारी. त्यांच्या पंचाहत्तरीच्या निमित्ताने त्यांच्या जीवनाचा ताळेबंद मांडला जातो आहे. त्यांचा थोरला मुलगा माधव लष्करात मोठा अधिकारी आहे. दुसरा मुलगा राघव मुख्यमंत्र्यांचा सचिव आहे, ज्या प्रस्थापित यंत्रणेविरुद्ध नानासाहेबांनी आयुष्यभर झगडा केला, त्या यंत्रणेचा एक अविभाज्य भाग असेच राघवचे आजचे स्वरूप आहे. नानांची मुलगी उमा व्यक्तिवादी/व्यक्तिनिष्ठ चित्रकार आहे. उमाचा माजी नवरा–विनायक नानांच्या पार्टीतील कार्यकर्ता अधिक एक वेळ भावकवी आहे. नानांचा सर्वात धाकटा मुलगा उद्धव नक्षलवादी बनला आहे. या वेगवेगळ्या व्यक्तिरेखांमधून आणि मुख्यतः नानांशी येत असणाऱ्या त्यांच्या संबंधांमधून एका शोकात्म पराभवाचा गोफ प्रेक्षकांपुढे विणला जावा, असे बहुधा लेखकाला अपेक्षित असावे. (या विधानातील अनिश्चितता एवढ्यासाठीच की, त्याबद्दल देशपांड्यांशी प्रत्यक्ष केलेली चर्चा या एका गोष्टीव्यतिरिक्त बाकी गोष्टींवरच मी विसंबून आहे.)

## प्रयोजन काय ?

माझ्यापुढे पडणारा आणि मला गोंधळात टाकणारा पहिला प्रश्न म्हणजे हा शोकात्म पराभव कोणाचा, असे लेखकाला अपेक्षित आहे ? नानासाहेब अग्निहोत्री नामक एक मोठेपण पराभूत झाले की, नानासाहेब अग्निहोत्री नावाच्या माणसाच्या छोटेपणामुळे त्याने बांधण्याचा प्रयत्न केलेली चळवळ पराभूत झाली ? की पराभूत मोठेपण आणि पराभूत चळवळ असा दुहेरी पराभव लेखकाला अपेक्षित आहे ? असे प्रश्न पडण्याचे सर्वांत प्रमुख कारण म्हणजे नानासाहेबांची अत्यंत फसलेली व्यक्तिरेखा. (या फसलेपणास लेखक देशपांड्यांइतकेच ती भूमिका साकार करणारे श्री. वासुदेव पाळंदेही जबाबदार आहेत.)

हा गोंधळ दूर करण्यासाठी मी दिग्दर्शक डॉ. श्रीधर कानेटकरांनाच विचारले, 'नानासाहेब अग्निहोत्री हा माणूस क्रियाशील व्यक्ती आहे की नुसताच चळवळीमध्ये फक्त उपस्थिती दाखवून तोंडची वाफ दवडणाऱ्यांपैकी आहे ? थोडक्यात त्याच्यात खरोखरचा मोठेपणाचा अंश कितपत आहे, असे लेखकाला वाटते ?' त्यावर कानेटकरांचे उत्तर असे; 'नानासाहेब अग्निहोत्री लोकमान्य टिळकांकडून राजकारणाची स्फूर्ती घेऊन राजकारणात पडले. आयुष्यभर साम्यवादाचा वसा घेऊन हा माणूस चालला. स्वतःच्या वयाच्या बासष्ट-पासष्ट वर्षांपर्यंत हा माणूस अत्यंत क्रियाशील आणि सर्व चळवळींमध्ये सक्रिय सहभागी होता. – एकोणीसशे बासष्टमध्ये चिनी आक्रमणाच्या वेळी नानासाहेबांना सरकारने अटक केल्याचा नाटकात उल्लेख आहे. या सगळ्याचा विचार करता तो खरोखरीच मोठा आहे, असे म्हणायला हरकत नाही.'

हे अपेक्षित मोठेपण व्यक्त न होण्याची कारणे–

(१) संपूर्ण नाटक घडते ते नानांच्या पंचाहत्तराव्या वाढदिवशी. देशपांड्यांच्याच शब्दांमध्ये लिहायचे झाले तर 'त्यांच्या (पराभूतांच्या) मोठेपणाचा विषय काढून अश्रू ढाळणे व्यर्थ असते. टेकड्यांना खूष ठेवून आपली सात्त्विकता शाबूत राखण्याचा तो केविलवाणा प्रयत्न असतो. एकसष्टी, अमृतमहोत्सव ह्या संस्था त्यातून निर्माण झाल्या आहेत ! त्यावर खरे तर बंदी घालायला हवी !' नायकाच्या चौकशीच्या निमित्ताने 'धर्मशाळां'तून उभ्या राहणाऱ्या धारदार संघर्षामुळे नायकाचे पराभूत मोठेपण डोळ्यांत भरते. 'एक वाजून गेला आहे !' मध्ये मात्र खरे तर अधिक सूक्ष्म, अधिक तरल पातळ्यांवर असलेला संघर्ष (जो नाटकात तशा स्वरूपात उभा राहिला नाही) पंचाहत्तरीच्या निमित्ताने होत असल्यामुळे एकदम सपक आणि मिळमिळीत होऊन जातो.

(२) नानांच्या पंचाहत्तरीला त्यांच्या मुलांनी–' राजकारणी नाना...विद्वान नाना ... टीकाकार नाना' (उमा) 'पार्टीचे नाना ..शोषितांचे नाना, लढाऊ नाना, जेलवासी नाना, मार्क्सिस्ट नाना' (माधव) अशी त्यांची केलेली यादीदार कौतुके आणि दोन-चार ठिकाणी आलेले अत्यंत उडते संदर्भ वगळता नानांच्या कामगिरीचा कोणताही भक्कम आलेख प्रेक्षकाच्या डोळ्यांपुढे येत नाही.

(३) नाना अग्निहोत्री हा माणूस हुशार वाटतो, समृद्ध व्यक्तिमत्त्वाचा वाटतो, उच्च अभिरुचिसंपन्नही वाटतो; पण तो थोर वगैरे वाटत नाही. वासुदेव पाळंद्यांचे तलम रेशमी झब्बा, त्यावर कुसरकाम आणि पांढरे शुभ्र मलमली धोतर या वेषातील दर्शन, त्यांचे सतत चाललेले पेयपान यामुळे नाना अग्निहोत्री हा अनेक अनुभव पाठीशी घेतलेला, चळवळीत रापून निघालेला माणूस न वाटता एक अत्यंत सुखासीन सुरक्षित जीवनाची चटक असलेला गुलछबू म्हातारा वाटतो. थोडक्यात नाना अग्निहोत्री हा माणूस थोर, मोठा सोडून बाकी सगळा वाटतो. साहजिकच नाटकातून पराभूत मोठेपण किंवा 'खाली झेपावलेल्या उदास गरुडां'चे दर्शन घडत नाही.

दुसरा प्रश्न येतो तो देशपांड्यांना चळवळीचा पराभव दाखवायचा आहे का ? पुन्हा देशपांड्यांचेच शब्द मदतीला घेऊन सांगायचे तर–' काही चळवळी आज या देशात नोकरशाह्या होऊन बसलेल्या आहेत. विशेषतः डाव्या चळवळी.' डाव्या चळवळीचे हे नोकरशाहीपण आणि तिचा या नोकरशाहीपणाच्या पथ्यांना बळी पडलेल्या डाव्यांकडूनच झालेला पराभव हे देशपांड्यांना अपेक्षित आहे काय? नक्षलवादी उद्धव आणि नाना यांच्या अखेरच्या संवादामधून या चळवळीच्या पराभवाला नाटक कुठे तरी घसटून जाते; पण उरलेल्या संपूर्ण नाटकात हा पराभव म्हणजे काय? तर सर्वांचे सामुदायिक दारू पिणे आणि अधूनमधून नानांना पंचाहत्तरीनिमित्त चीअर्स करणे.

## व्यक्तिरेखा, परस्परबंध

नानासाहेब अग्निहोत्रींची अत्यंत फसलेली मध्यवर्ती व्यक्तिरेखा आणि विनायक हे नानासाहेबांच्या माजी जावयाचे पात्र वगळता माधव, उमा, राघव आणि उद्धव ही पात्रे बरीच बरी उभी राहिली आहेत. नाटक अपयशी ठरते ते या सगळ्यांचे परस्पर बंध रेखाटण्यात.

(१) नाना आणि माधव–माधव हा लष्करी अधिकारी असलेला नानांचा थोरला मुलगा; पण संपूर्ण आयुष्य राजकारणात घालवलेल्या माणसाच्या घरात जन्म घेऊन, वाढून माधवला राजकारणात गोडी नाहीच, उलट काहीसा तिटकाराच. नानांमध्ये आणि माधवमध्ये त्यामुळे कोणताही संवाद नाही, दोघांमध्ये कोणताही विसंवादही नाही; पण त्याचे कारण माधवची अलिप्त आणि थंड ग्रहणकवृत्ती. नानांना तो कोणत्याही गोष्टीत

सहकार्य करीत नाही, तसा विरोधही करीत नाही. नानांसाठीच नाही तर कुटुंबातील सर्वच माणसांसाठी माधवमध्ये एक अलिप्त सर्वसमावेशकता आहे; पण तरीही माधव लष्करी अधिकारी बनला, म्हणजे अप्रत्यक्षत: का होईना, प्रस्थापितांचा रक्षक बनला, याची खंत नानांना असेल का? कोण जाणे, ही उगाचच माझ्या डोक्यात उठलेली कळ; नाटकात तसा काहीच उल्लेख नाही नानांना माधवच्या या सर्वसमावेशकतेमुळे–ज्याला ते वात्सल्याने मुलाचा समजूतदारपणा म्हणतात–माधवबद्दल ओलावा आहे. या ओलाव्याचा एक धागा नानांच्या मृत पत्नीमध्येही गुंतलेला आहे माधवव्यतिरिक्त कोणाही मुलाला आईची आठवण होत नाही.

२) नाना आणि राघव–राघव हा नानांचा मुलगा, तरी मुख्यमंत्र्यांचा सचिव म्हणजे उघडउघड प्रस्थापित यंत्रणेत सामील झालेला, तिचा एक भाग बनलेला. तसे मुलगा शत्रुपक्षाला सामील झाल्याने निर्माण झालेले पिता-पुत्र संघर्ष आपल्याला शिवाजी–संभाजीपासून माहीत आहेत आणि रंगभूमीवरही ते रायगड जागा झाल्यापासून दाखवले गेले आहेत. 'एक वाजून गेला आहे!' मध्ये मात्र नाना आणि राघव यांच्यात संघर्ष कुठे फारसा जाणवतच नाही. अगदी उद्धवच्या बाबतीत दोघांचे झालेले बोलणेही संघर्षापेक्षाही राघव व उद्धव या दोन भावांमध्ये थोडी दिलजमाई घडवण्यासाठी चाललेली नाना-शिष्टाई वाटते. नाटकात तर राघव या पात्राचा वापर लेखकाने फारच विनोदी पद्धतीने केला आहे. सुमारे सलग अर्ध्या तासाचा नाटकाचा एक भाग असा आहे की, दरम्यानच्या काळात या राघोबाचे काय करावे ते न कळल्यामुळे लेखकाने त्याला झकास झोपवून टाकले आहे आणि मग अचानक 'अरे, आले वाटते माझे वाक्य. हा उठलोच मी.' असे जागवलेही आहे.

३) राघव आणि उद्धव–उद्धव हा नक्षलवादी बनलेला नानांचा धाकटा मुलगा. साहजिकच राघवबरोबर त्याचा उघडउघड संघर्ष सारखाच होत राहतो; पण बहुतेक वेळा हा संघर्ष मुद्दे वगळून गुद्द्यांवर येणारा असल्याने अत्यंत ढोबळ बनला आहे.

प्रस्थापितांबद्दल देशपांडेच 'धर्मशाळां'च्या प्रस्तावनेत म्हणतात, 'प्रस्थापित काही अपघाताने प्रस्थापित झालेले नसतात. ते अपघाताने किंवा भ्रष्टाचाराने मोठे झालेले असतात हा सध्या प्रचलित असलेला गैरसमज आहे. ते भ्रष्ट असतात ही खरे पाहता आनुषंगिक बाब आहे .....शेवटी राजकारण हा सामाजिक आणि आर्थिक शक्तींचा खेळ आहे. त्यात यशस्वी होणारांनी ह्या शक्तीबरोबर जोखलेल्या असतात, आडाखे बांधलेले असतात व स्वत: त्या खेळात कुठे उभे राहायचे हे सर्व विचार करून ठरविलेले असते. त्यामुळे ज्याला रूढार्थाने आपण प्रस्थापित म्हणतो ते प्रस्थापितसुद्धा तर्कसंगत राजकारण करीत असतात.' प्रस्थापितांचे हे चित्र राघवच्याबाबतीत कुठेच दिसत नाही. नाटकामध्ये राघव या हुषार आणि चाणाक्ष प्रस्थापितांचे प्रतिनिधित्व करण्याऐवजी एक रेम्याडोक्या, चिडचिडा, मंत्र्यांची हांजीहांजी करणारा माणूस म्हणूनच उभा राहतो. दोन सामर्थ्यवान आणि तुल्यबळ मल्लांची कुस्ती प्रेक्षणीय ठरते; पण या कुस्तीमध्ये मात्र राघव आणि उद्धव सामर्थ्यवान तर नाहीतच; पण राघव म्हणजे 'मल्ला' मधला 'म' सुद्धा वाटत नाही.

४) नाना आणि उद्धव – नाटकामध्ये त्यातल्या त्यात बरा आकार घेणारे हे एकमेव नाते. आपला वसा चालवणाऱ्या या पोरामध्ये नाना भविष्याचे स्वप्न बघत आहेत; पण त्याच वेळी नानांच्या कार्याला नाकारून उद्धव त्यांच्यावर प्रस्थापितांकडे झुकल्याचा आरोप करतो आहे. ह्या पोरानेही आपल्याला समजून घेऊ नये, यामुळे नाना विद्ध आहेत. त्याचबरोबर ह्या पोराबरोबरही संवाद साधता येत नाही, यामुळे अगतिकही आहेत.

नाटकाची संहिता वाचल्यानंतर मला जाणवलेली गोष्ट म्हणजे– उद्धव प्रत्यक्षात या समारंभाला उपस्थितच नाही. त्याचे अस्तित्व नानांच्या मनातच अधिक आहे; पण ही गोष्ट जाणवते ती फक्त उद्धव आणि नानांच्या शेवटच्या काही संवादांवरून आणि तीही संहिता वाचताना. डॉ. कानेटकरांशी बोलताना याचा उल्लेख केला असता ते म्हणाले, 'उद्धव कल्पनेत आहे, असेच मला (आणि देशपांड्यांनाही) अपेक्षित आहे.' त्यासाठी रंगमंचावर कोणती उपाययोजना केली होती. तेही कानेटकरांनी सांगितले; पण ही उपाययोजना उद्धवची अवास्तवता व्यक्त करण्यास असमर्थ ठरली. त्याची प्रामुख्याने कारणे–(१) उद्धव कल्पनेतील असेल, तर कोणाच्या कल्पनेतील? नानांच्या की सगळ्याच पात्रांच्या? (२) उद्धवचे संपूर्ण वास्तव पातळीवर होणारे अन्य पात्रांबरोबरचे बोलणे आणि वावरणे. (३) नाटकाच्या शेवटी रंगमंचावर नाना, माधव आणि उमा असतात, उद्धव आणि राघव दोघेही जण रंगमंचावर नसतात. या दोघांच्या अनुपस्थितीमुळे – उद्धवचे अचानक जाणे, ज्यामुळे त्याची अवास्तविकता कदाचित जाणवली असती–अजिबात पोहोचतच नाहीत.

५) नाना आणि उमा– उमा ही नानांची आत्यंतिक व्यक्तिवादी, चित्रकार मुलगी. नानांची राजकीय तत्त्वे तिला पटत नसली, तरी ती नानांची भक्त आहे, त्यांच्या व्यक्तिमत्त्वाचा तिच्यावर जबरदस्त पगडा आहे; पण याहीपेक्षा अधिक काही तरी दोघांमध्ये आहे का? इडिपल कॉम्प्लेक्सला समांतर असे–मुलीला वडिलांविषयी वाटणारे आकर्षण–देशपांड्यांना दाखवायचे आहे का? या दोन्ही प्रश्नांची उत्तरे संदिग्ध आहेत; पण ती उत्तरे होकारार्थी असावीत असे सूचित करणारे तीन उल्लेख नाटकात आहेत,

(१) उमा नानांकडे बघून खट्याळ हसते आणि म्हणते, 'नाना, I rather love you, seriously, dad, I haxe always love you.'

(२) नानांच्या तोंडून 'आम्ही पाषाणपुरुष आहोत.' असे वाक्य ऐकल्यानंतर उमेच्या मनात उठणारा स्मृतितरंग, 'पाषाणपुरुष...पाषाणपुरुष...पाषाणपुरुषाचं एक शिल्प हवं आहे मला, विनायक. ज्याच्या छाताडावरून ओसंडणाऱ्या, फेसाळणाऱ्या धारा वाहात आहेत, असा पाषाणपुरुष. विनायक, तू पाषाणपुरुष नाहीस. तू सचेतन डोळ्यांचा आणि जागृत वैखरीचा फक्त कवी आहेस. मला पाषाणपुरुष हवा आहे. पाषाणपुरुष...पाषाणपुरुष...!'

(३) 'त्याची (विनायकची) तऱ्हाच असह्य होण्याची होती. (नानांपाशी जाते. त्यांच्या गळ्यात हात घालून) नाना, ह्या माणसानं त्याच्या असह्यपणानं मला

छळलंय. माझ्या देहाला, नंतर मनाला, नंतर माझ्या रंगांना...' या उमाने नानांपाशी केलेल्या तक्रारीनंतर विनायकने 'वडलांच्या गळयात हात घालून इतक्या intimate गोष्टी बोलायच्या.' हे काढलेले उद्‌गार. अर्थात ही संदिग्धता वगळल्यास नाना आणि उमा यांच्या परस्परबंधांना फारशी वेगळी मिती नाही.

६) विनायक– विनायक म्हणजे उमाचा माजी पती. हा नाटकात कशासाठी आहे, असा प्रश्न त्याने रंगमंचावर प्रवेश केल्यापासूनच पडतो. डॉ. कानेटकरांच्या म्हणण्याप्रमाणे– नानांच्या व्यक्तित्वाला पार्श्वभूमी म्हणून उमा आणि उमाच्या व्यक्तित्वाला पार्श्वभूमी म्हणून विनायक असे काहीसे चित्र देशपांड्यांना अपेक्षित आहे. प्रत्यक्षात मात्र या पात्राची अवस्था–असून अडचण आणि अडचणीमुळेच घोटाळा अशी झाली आहे. उमाबरोबरची दोन-तीन स्मृतिदृश्ये–ज्यातून त्याच्यात आणि उमामध्ये दुरावा का निर्माण झाला, ही गोष्ट स्पष्ट होते; पण हीही गोष्ट या स्मृतिदृश्यांव्यतिरिक्त नाटकातून अनेक ठिकाणी स्पष्ट झालेली आहेच, त्यामुळे तशी ही स्मृतिदृश्येही नाटकात अनावश्यक क्लृप्ती म्हणूनच येतात– तर ही दोन-तीन स्मृतिदृश्ये वगळता विनायकला माधवने 'जेव' सांगितल्यावर जेवणे, 'दारू पी' सांगितल्यावर दारू ढोसणे याव्यतिरिक्त काही कामच उरत नाही. वाढदिवसाच्या समारंभाला आगंतुक म्हणून आलेला विनायक नाटकातही उपराच राहिला आहे. विनायकच्या व्यक्तित्वाचे एक वैशिष्ट्य म्हणून त्याच्या Cerebrally mediated sensuality (? बुद्धिगम्य शारीरवासना) चा डॉ. कानेटकरांनी उल्लेख केला.

'तिच्या हिमाच्या शुभ्रशुभ्रतर
वक्षावरचा तीळ जांभुळा डाव्या'

आणि

'एका वेळी कोणताच एक रंग दिसत नाही
कधी ओठांची लाली
तर कधी वक्षांची हिमगौरता
तर कधी जांघांचा सावळेपणा
तर कधी जांभळी वासना
पण एक रंग सापडेना,
आवाज उमटेना,
प्रतिध्वनी ऐकू येईना,
आवर्त...आवर्त...'

या कवितांना नाटकात जागा मिळवून देण्याव्यतिरिक्त या cerebrally mediated sensualityने नाटकात काही भर घातली आहे, असे मला वाटत नाही.

एकूणच ही नाटकातील सहाही पात्रे एकदा नाटकातून जन्म मिळालेला आहेच, म्हटल्यावर आपल्या निश्चित व्यक्तित्वाच्या शोधात भरकटत राहतात. धड तेही त्यांना मिळत नाही; त्यामुळेच देशपांड्यांना अपेक्षित असे काही सामाजिक वास्तवही या नाटकातून पुरेशा ताकदीने उभे राहत नाही.

## ढिसाळ आकृतिबंध

'धर्मशाळा'ची अत्यंत बांधीव रचना आठवल्यानंतर त्याच देशपांड्यांनी हे नाटकही बांधले असेल, यावर विश्वास बसत नाही. पात्रांच्या एकमेकांशी असलेल्या संबंधामधून शोकात्म पराभवाचा हा गोफ विणला जावा, अशी अपेक्षा असताना प्रत्यक्षात मात्र फक्त एकमेकांचा ग्लास भरून देण्यासाठी वा भरलेला ग्लास पास करण्यासाठी पात्रांचा एकमेकांशी संबंध येतो. नाटकाच्या सुरुवातीला नाना आणि उमाचे चहापान होते. ते पूर्ण होते न होते तोच माधव दारूची बाटली उघडतो. मग विस्की ऑन रॉक्स, स्कॉच, क्वांत्रो, वाअिन इत्यादी प्रदेशांमधून सर्व लोकांचा मुक्त संचार चालू असताना त्याबरोबर शेंगदाणे आणि चणे खावेत, त्याप्रमाणे लोक राजकारणाच्या, कलेच्या, साहित्याच्या गोष्टी चघळतात. मध्येच एकदा लोक Shredded chicken with capsium चोपतात. मग त्यानंतर कॉफीपानाची टूम निघते. या सगळ्या खाद्यपेयांचा समाचार घेताना नाना-उद्धव आणि उमा-विनायक यांचा संघर्ष एकमेकांना समांतर जात आहे, असे दाखविण्यासाठी त्यांचे आपापसातील संवाद एकाआड एक घालण्याचा विनोदी प्रकारही नाटकात दोन-तीन ठिकाणी आहे. प्रत्यक्षात त्यातून पात्रांचे एकमेकांशी चाललेले बोलणे आणि घडणाऱ्या प्रतिक्रिया यांच्या वाढत्या गोंधळाशिवाय काहीच निष्पन्न होत नाही. मी यापूर्वीच उल्लेख केला, धर्मशाळा'तील संघर्ष हा प्रत्येक ठिकाणी उघडउघड दोन फळ्यांमधील संघर्ष होता. संघर्षाचे मुद्दे आणि पातळ्या वेगळ्या असल्या, तरी त्यात दोन उघड तट होते. 'एक वाजून गेला आहे!' मध्ये अपेक्षित असलेला संघर्ष हा अधिक क्लिष्ट, अधिक सूक्ष्म होता. ही क्लिष्टता, सूक्ष्मता नाटकातून अितस्ततः विखुरलेल्या एखाद्या तुकड्यातून क्वचित जाणवत असली, तरी सगळ्या नाटकात ती कायम मुठीत ठेवणे देशपांड्यांना साधलेले नाही. साहजिकच संपूर्ण नाटकाची बांधणी ही सहज न वाटता अत्यंत वेगवेगळी ठिगळे एकमेकांपुढे मांडून केल्यासारखी खुपत राहते.

या नाटकाचे दिग्दर्शक डॉ. श्रीधर कानेटकर यांनी एक गोष्ट प्रांजलपणे मान्य केली की, नाटकात काही जागा लेखकाशी तपशीलवार चर्चा करूनही त्यांना नीटशा कळल्या नाहीत किंवा अपेक्षित आशय प्रेक्षकांपर्यंत पोहचवताना (काही वेळा तांत्रिक कारणांमुळे) त्यांना अपयश आले; पण त्याचबरोबर नाटकाच्या संहितेला आत्यंतिक प्रमाण (sacred) मानून, त्यात यत्किंचितही बदल न करता त्यांनी हे नाटक सादर केले. नाटकासंबंधीचे त्यांचे अन्य विवरण लेखात यापूर्वीच त्या त्या मुद्द्याच्या अनुषंगाने आले आहेच. माझ्या मते नाटकाच्या आशयाला धक्का न लावता नाटकातील अनावश्यक गोष्टींना कानेटकरांनी कात्री


**प्रकाशनाच्या वाटेवर**

'माणूस' १९८२ दिवाळी अंकात
प्रसिद्ध झालेली

# आयडा स्कडर

या आद्य मिशनरी स्त्री डॉक्टरची
अपूर्ण जीवनकहाणीही
लवकरच पूर्ण पुस्तकरूपात.

लेखिका : सौ. वीणा गवाणकर

**राजहंस प्रकाशन, पुणे**

लावायला हरकत नव्हती. उदाहरणार्थ– १) पात्रांचे दारू पिणे (हे तर संपूर्ण नाटकात अतिके अंगावर येत होते की, काही वेळाने पहिल्या दुसऱ्या रांगेतील प्रेक्षकांना नुसते पाहूनच दारू चढायला लागली असती.) उच्च वर्गीयांचे,त्यातही masses चा कैवार घेणाऱ्या उच्चवर्गीयांचे राहणीमान या गोष्टीपलीकडे फारम हत्त्व दारूला देण्याचे वा येण्याचे काही कारण नव्हते. २) जेवणाच्या दृश्यात 'जेवायच्या वेळचं संभाषण स्थूलमानानं खालीलप्रमाणे' अशी लेखकाची स्पष्ट सूचना असताना ते 'स्थूलमान' संवादच जसेच्या तसे घेण्याइतकी संहिता प्रमाण मानली नसती तर ते दृश्य काकणभर तरी कमी बेचव आणि कमी असह्य झाले असते. अर्थात दिग्दर्शकाकडून अपेक्षित असलेले हे किरकोळ तपशिलांचे बदल म्हणजे फाटल्या आभाळाला ठिगळे लावण्याचाच प्रकार होता. संहितेतील 'वातावरणात आता विलक्षण तणाव' किंवा 'दोघांमध्ये अदृश्य पण भासमान तणाव' ही कंसातील वाक्ये संवादांमधून अथवा घटनांमधूनच व्यक्त होत नसतील तर बिचारा दिग्दर्शक तरी किती तांत्रिक क्लृप्त्या लढवत बसणार?

नाटकातील श्री. वासुदेव पाळंद्यांच्या भूमिकेचा उल्लेख यापूर्वी केलेला आहेच. अन्य भूमिकांपैकी माधव आणि विनायक यांच्या भूमिका अनुक्रमे राहुल सोलापूरकर आणि सुहास कुलकर्णी यांनी योग्य उभ्या केल्या. उद्धव झालेला मिलिंद मोघे काही वेळा मतप्रणालीला विचारपूर्वक बांधला गेलेला नक्षलवादी तरुण वाटण्याऐवजी अमिताभ बच्चनी अँग्री यंग मॅन वाटत होता.

नेपथ्य, प्रकाश, संगीत वगैरे तांत्रिक बाजूंबद्दल म्हणजे– मुळातच लोळागोळा असलेल्याला या तांत्रिक कुबड्या फार उभारी देऊ शकत नाहीत.

थोडा लहान तोंडी मोठा घास प्रकार करूनही गोविंद पुरुषोत्तम देशपांड्यांना विनंती करावीशी वाटते,

'काहीशी सवंतीची भावनिक जखडणूक करून का होईना; पण या आपल्या मानसपुत्राला जरा प्रेमाने वाढवा!'

–डॉ. सदानंद बोरसे

## आसाम प्रश्न

पृष्ठ १३ वरून

रूक होऊन ते भारतापासून फुटून निघावे (आसामचा बांगलादेश व्हावा) अशी परिस्थिती अजाणतेपणे निर्माण करण्यात येत आहे. त्यात आशेचा एकच किरण म्हणजे राष्ट्रवादाचा पुकारा करणारा भारतीय जनता पक्ष आपले वजन आसामी संघटनांवर राखून आहे व तोच त्यांना अलग होण्यापासून वाचवू शकेल! साईकीयांच्या मंत्रिमंडळात अन्वरा तैमूर व केशवचंद्र गोगोई ह्या आसामी जनतेच्या रोषास पात्र झालेल्या नेत्यांना घेण्यात आलंय व आसामी जनतेच्या जखमांवर मीठ चोळण्याचे काम नीटपणे बजावण्यात आलंय.

आसाममध्ये जी जाणीवपूर्वक घुसखोरी झाली त्यामुळे तेथील आसामी लोक अल्पसंख्य झाले तेव्हा ह्या घुसखोरांना बांगला देशात परत पाठवणे व काहींना भारताच्या इतर भागात पाठवणे ही आसामी लोकांची मागणी ग्राह्य आहे. हे काम तसे अवघडच आहे; पण अशक्य मात्र नाही. केंद्र सरकारने मतांच्या गठ्ठ्याच्या पाठीमागे न लागता गंभीरपणे याची दखल घेऊन कार्यवाही केली असती तर हा प्रश्न एव्हाना थोडासा मार्गी लागला असताही. विद्यार्थी संघटना व केंद्र सरकार यांच्यातील वाटाघाटींनुसार मूळ वर्ष निश्चित करून १९६१ नंतर आलेल्या घुसखोरांना मतदारयाद्यांतून वगळून मतदारयाद्या पुन्हा बनवणे हे केंद्र सरकारला शक्य होते; पण त्यांना वाटाघाटींचा नुसता घोळ घालत बसायचे होते. अजूनही केंद्र सरकार या बाबतीत गंभीरपणे लक्ष घालण्यास तयार नाही; तर घुसखोरांवरील अत्याचाराचे भांडवल करण्यात गुंतलय तेव्हा आसामी जनतेला केंद्र सरकारबाबत विश्वास कसा वाटावा? आता तर इंदिरा गांधी म्हणत आहेत की, बांगलादेश सरकार घुसखोरांना (१९७१ नंतरच्या) परत घेण्यास तयार नाही व काही घुसखोर पिढ्यानपिढ्या आसामात रहात आहेत, त्यांना बाहेर कसे व कुठे हाकलणार? मग आता वाटाघाटींचा प्रश्नच उरलेला नाही. त्यातच यापुढील वाटाघाटींना केंद्र सरकार, अल्पसंख्य प्रतिनिधींना (घुसखोरांचे प्रतिनिधी) व पी. टी. सी. ए. च्या प्रतिनिधींना बोलावणार असल्याने आसामीनेते वाटाघाटींना नक्कीच हजर रहाणार नाहीत व व आसामची समस्या सुटण्याची उरली सुरली आशाही संपुष्टात येईल! □

**दलित–दलितेतर या भेदांना ओलांडून जाणारे**
**गोष्टीरूप आंबेडकर चरित्र**

सर्व मराठी मुलांच्या हाती हा 'कथा-संग्रह' देणे योग्य ठरेल! दलित–दलितेतर या भेदांना ओलांडून जाणारा हा स्फूर्तिदायक कथा-संग्रह संस्कारक्षम मुलांना अत्यंत उद्‌बोधक वाटेल.
इतिहासाचे सर्जनशील साहित्यात कथारूपाने जे रूपांतर होते ते सिद्धहस्त लेखक कसे सोन्यासारखे करून दाखवितो त्याचा पुरावा बाबुलांच्या या गोष्टीरूप चरित्रातून मिळतो.

**–ग. रा. जाधव**
(केसरी, रविवार, ६–१२–८१)

# आंबेडकर भारत

लेखक : **बाबुराव बागुल**
**राजहंस प्रकाशन, पुणे.** मूल्य : २० रुपये.

अस्लम शेरखानच्या आत्मचरित्राचा हा शेवटचा सहावा भाग. खेळाडूंच्या 'फॅन 'मंडळींचं एक वैशिष्ट्य असतं. त्यांना त्या खेळाडूच्या खेळाबद्दल जेवढी माहिती नसते तेवढी त्याच्या व्यक्तिगत आयुष्याबद्दल असते. अस्लमच्या आत्मचरित्रात फक्त या 'फॅन' मंडळींनाच खूष ठेवण्याचा प्रयत्न नाही. त्याचं चरित्र वाचून एकूण भारतीय हॉकीबद्दलचं एक जिवंत चित्र डोळ्यांसमोर उभं रहातं. खेळ आणि खेळापाठीमागचं राजकारण हा एक वादाचा विषय. त्यात उठून दिसणारा अस्लम हा माणूस या पुस्तकात दिसतो म्हणून हे पुस्तक महत्त्वाचं—या लेखाबरोबरच अस्लमची ओळख संपली....

# 'टू हेल विथ हॉकी'

**इंग्रजी शब्दांकन : मतीनखान**

**मराठी रूपांतर : द्वारकानाथ संझगिरी**

१९७१ साली पाकिस्तानला जाण्याची माझी संधी हुकली होती. त्या वेळी राजकारणात स्वत:चं बस्तान बसवू पहाणाऱ्या अब्दुल हफिज कारदारचा भारतद्वेष उफाळून आला होता.

त्यानंतर बरोबर पाच वर्षांनी पाकिस्तानला जाण्याचा योग आला. केवळ भारतीय संघातला एक खेळाडू म्हणून नव्हे, तर चक्क कर्णधार म्हणून ! कायदेआझम ट्रॉफीसाठी त्यांचं भारताला आमंत्रण आलं होतं आणि त्या वेळी क्रीडाक्षेत्रात कारदार एव्हढंच 'अस्लम शेरखान' हे नाव सुप्रसिद्ध होतं. कारदारप्रमाणेच क्रीडाक्षेत्रात घुसू पहाणाऱ्या राजकारणाचा मला तिटकारा होता. काही वेळा मी त्याचा उघड निषेधही केला होता; पण माझी टीका क्रीडासंस्था आणि एकंदरीत क्रीडाक्षेत्रातलं वातावरण एव्हढ्यापुरतीच मर्यादित होती. कारदारप्रमाणे खेळाच्या माध्यमातून इतरांबद्दल द्वेष पसरवण्याचा हलकटपणा मी कधी केला नाही.

मला नेतृत्व मिळालंय ही बातमी मला विमानप्रवासात कळली. इंडियन एअरलाइन्सच्या संघाबरोबर मी बंगलोरला चाललो होतो. बातमी कानावर पडली आणि अंगावर रोमांच उभे राहिले. माझ्या वडलांनी फक्त भारतीय संघाचं प्रतिनिधित्व केलं होतं. माझं पाऊल त्यांच्यापुढं पडलं होतं. नेतृत्वाचा मुकुट माझ्या मस्तकावर ठेवण्यात आला होता. अम्माला त्याचा नक्कीच अभिमान वाटणार ह्याची मला खात्री होती; पण मी निवडलेला संघ पाहिला आणि माझा उत्साह पार मावळला. नवख्या, अननुभवी खेळाडूंचा संघ माझ्याकडे सुपूर्द केला होता. नेहमीप्रमाणे प्रशिक्षणशिबिरही आयोजित केलेलं नव्हतं.

मी निवडसमितीला स्पष्टपणे सांगितलं की, 'चांगला संघ द्या नाही तर, नेतृत्व वगैरे नको.' मला 'संघ' हवा होता,' शिष्टमंडळ' नव्हे. लगेच माझी समजूत घालण्यात आली. 'नव्या रक्ताला वाव देण्याचा हा प्रयत्न आहे. त्यांचं भविष्य तुला घडवायचंय.' वगैरे वगैरे !

शब्द काही वेळा अर्थहीन असतात, तर काही वेळा खरोखरच अर्थपूर्ण ! ते उच्चारणाऱ्या व्यक्तीच्या प्रामाणिकपणावर अवलंबून असतं. माझ्या तोंडाला पानं पुसली जातायत हे मला कळत होतं. माझ्या संघातली बरीचशी मंडळी आमच्या भोपाळची होती आणि मुस्लिमी होती. त्यांची विभागीय संघातसुद्धा खेळण्याची लायकी होती शेवटी जफर आणि मेहबूबचा समावेश करण्यात आला... आमच्या संघाला कोच नव्हता. मी निवडसमितीला पुन्हा फैलावर घेतलं. लगेच गुरुचरणसिंग बोधीला पाचारण करण्यात आलं. आमचा मॅनेजर होता मशबूर हसन, आमच्या भोपाळचाच ! त्या वेळी इंडियन हॉकी असोसिएशनचा तो उपाध्यक्ष होता; पण हे महाशय नेहमी दिल्लीतच असायचे. असा सगळा सावळा गोंधळ होता.

आम्ही लाहोरला कसे जाणार आहोत ह्याचाही कुणाला पत्ता नव्हता. जलंदरला हंपायर हॉकी स्टिक्स बनवणाऱ्या रमेश कोहलीकडून आम्ही किट् घेतला; पण लाहोरला जायला ट्रान्सपोर्टच नव्हता बसभाडं भरायलासुद्धा माझ्याकडे किंवा मॅनेजरकडे पैसे नव्हते. जे होते ते पतियाळाच्या नॅशनल इन्स्टिटयूट ऑफ स्पोर्ट्स्पासून जलंदरला जाईपर्यंत संपले होते.

काय परिस्थिती आहे पहा ! कोटयवधी रुपये खेळाच्या नावाखाली ह्या संस्थेत उडवले जातात आणि कित्येक वर्षांनी पाकिस्तानला जाणाऱ्या राष्ट्रीय संघाकडे बसभाडं भरायला पैसे नसतात! शेवटी डेप्युटी इन्स्पेक्टर जनरल ऑफ पुलीस आमच्या मदतीला आला. त्यांनी आम्हाला पाकिस्तानच्या हद्दीपर्यंत पोलीसव्हॅनमधून सोडण्याची व्यवस्था केली.

तिथे सीमेवर, पाकिस्तानी पत्रकार आमच्यावर प्रश्नांची सरबत्ती करायला तयारच होते. त्यांना पाहिल्यावर आमच्या मॅनेजरनं सूंबाल्या ठोकला.

'माझी पहिलीच वेळ आहे. प्रेसशी कसं बोलावं मला कळत नाही. तूच त्यांना सांभाळ.' अशी मला त्यानं विनंती केली आणि हळूच कणी कापली.

### मला तोच सन्मान वाटतो !

आमचा नवीन खेळाडूंनी काठोकाठ भरलेला संघ पाहून ते चपापले ! 'हा भविष्यकाळ डोळ्यांसमोर ठेवून निवडलेला संघ आहे. ह्यातले काही चेहरे तुम्हाला पुढच्या ऑलिंपिक्समध्ये दिसतील.' मी नेहमीची पोपटपंची केली आणि वेळ मारून नेली.

ह्या स्पर्धेत आठ संघ होते आणि पाकिस्तानचे ज्येष्ठ (senior) आणि कनिष्ठ (Junior) असे दोन संघ उतरले होते. पाकिस्तानच्या ज्येष्ठ संघाला अर्थातच पहिलं सिडिंग होतं. आमचा पहिला सामना होता पोलंडशी, गदाफी स्टेडियमवर ! पन्नास हजार प्रेक्षकांची व्यवस्था करणारा हा स्टेडियम एका बाबतीत इतर स्टेडियमपेक्षा वेगळा आहे. इथे चक्क लिंगभेद पाळला जातो. पुरुष आणि

स्त्रियांसाठी वेगवेगळ्या जागा आहेत. ते एकत्र बसू शकत नाहीत. मला विचित्र वाटलं. आमच्या इस्लामनं स्त्री-पुरुषांना एकत्र ' हाज ' करण्याची परवानगी दिलीय... पण ' मुस्लिम राष्ट्र ' म्हणून टेंभा मिरवणाऱ्या पाकिस्तानात स्त्री-पुरुषांना एकत्र बसून साधा सामना पहाता येत नाही !

आम्ही पोलंडला सहजगत्या हरवलं. कौशिक, चरणजीत, सौंधी, सय्यदअली मेहबूब, खुर्शिद, जफर ह्या नव्या दमाच्या खेळाडूंनी माझ्या अपेक्षेप्रमाणे खेळ केला.

पुढच्या सामन्यात पाकिस्तानविरुद्ध अर्थातच आम्ही हरलो. गोविंदा किंवा अशोक जर आमच्या आघाडीच्या फळीत असता तर कदाचित निर्णय वेगळा लागला असता.

तिसरा मलेशियाविरुद्धचा सामना आमच्या दृष्टीनं फार महत्त्वाचा होता. मुंबईच्या फर्नांडिसऐवजी बंगालच्या चेत्रीला गोलकीपर म्हणून खेळवण्याचा माझा विचार होता; पण आमच्या मॅनेजरला फर्नांडिसच हवा होता. ' त्याचे रिफ्लेक्सेस चांगले आहेत; पण तू म्हणत असशील तर चेत्रीला खेळव. ' आमचा मॅनेजर मला म्हणाला.

मध्यंतरच्या काही मिनिटं अगोदर सेंटर फॉरवर्ड लोबोनं गोल मारून आम्हाला आघाडी मिळवून दिली. मध्यंतराच्या वेळी मॅनेजरच मला म्हणाला, ' आपण फर्नांडिसला बसवू या आणि चेत्रीला खेळवू या ! ' मॉंट्रियल ऑलिंपिक्सला चेत्री भारतातर्फे खेळला होता. त्याला बाजूला बसवल्यामुळं कदाचित अपमानास्पद वाटलं असावं. कारण त्यानं खेळायला सरळ नकार दिला. आमच्या मॅनेजरनं फेडरेशनला त्याच्या वर्तणुकीचा रिपोर्ट केला की नाही ठाऊक नाही; पण हॉकी फेडरेशननं मात्र त्याच्यावर काहीही ॲक्शन घेतली नाही.

दुसऱ्या सत्रात पेनल्टी कॉर्नरच्या सहाय्यानं मलेशियानं आमच्यावर दोन गोल चढवले आणि आमचं तथाकथित आव्हान संपुष्टात आणलं.

ह्या स्पर्धेत आमचा पाचवा क्रमांक लागला. असोसिएशननं आम्हाला सावत्र मुलासारखं वागवूनही मॉंट्रियल ऑलिंपिक्सपेक्षा दोन क्रमांकानं आम्ही वर चढलो होतो.

मलेशियाविरुद्धचा सामना संपल्यावर स्टेडियममधून बाहेर पडताना, मला खास भोपाळी उर्दूतली हाक ऐकू आली. मी त्या दिशेला चमकून पाहिलं. १९४८ साली लंडन ऑलिंपिक्समध्ये भारताचं प्रतिनिधित्व करणारा लतिफ उर रेहमान मला बोलवत होता. आता तो पाकिस्तानमध्ये स्थायिक झालाय.

आम्ही दोघं बोलत असताना चाहत्यांनी मला घेराव घातला. त्यातला एक खास पंजाबी टोनमध्ये मला म्हणाला, ' तू इथं का येत नाहीस ? तू आलास तर आमचा संघ परिपूर्ण होईल ! '

' का म्हणून येऊ ?' माझं प्रत्युत्तर !

' तू सहा कोटी मुस्लिमांचं प्रतिनिधित्व करू शकशील. ' –तो.

' मी साठ कोटी भारतीयांचं प्रतिनिधित्व करतो. त्यातले दहा कोटीपेक्षा जास्त मुस्लिमच आहेत. ' – मी

' इतक्यात एक युनिव्हर्सिटीचा ब्लेझर घातलेला तरुण म्हणाला, ' नको अस्लम, तुझ्या देशासाठीच खेळ. तू भारताचं नेतृत्व करतोस ह्यातच आम्हाला अभिमान वाटतो ! '

' होय ! ' मी ओरडलो. ' मला तो माझा मोठा सन्मान वाटतो; पण तुला माहितीय ना भारतातल्या सर्वात मानाच्या पदावरही एक मुस्लिमच बसलाय. झाकिर हुसेन, आठवतोय ? फकरुद्दीन अली अहमद आता आमचे राष्ट्रपती आहेत. ' लगेच शांतता पसरली.

## त्यातून उठणंच कठीण वाटतं !

पुढचा क्षण मला थोडाफार टेन्स वाटला; पण इतक्यात कुणी तरी ओरडलं, ' अस्लम शेरखान झिंदाबाद ! ' आणि शांततेचा भंग झाला.

ह्या दौऱ्यावरून भारतात परतल्यावर, पुन्हा माझी साडेसाती सुरू झाली.

त्याच काळात ह्या देशातली परिस्थितीही खालावली होती. ती सुधारण्यासाठी सरकारला आणीबाणी पुकारावी लागली. ह्या देशात अराजक माजवण्यासाठी ज्या शक्ती राबत होत्या, त्याला विरोध करण्याचं काम युवक काँग्रेसनं शिरावर घेतलं होतं. युवक काँग्रेसचं नेतृत्व आता संजय गांधीकडे आलं होतं. संजयनं हातात सूत्रं घेतली आणि मरगळलेल्या युवक काँग्रेसमध्ये जान आली. गुफ़ाननेही भोपाळच्या छोट्या राजकारणातून युवक काँग्रेसच्या सरचिटणीसपदावर उडी मारली होती.

१९७६ च्या हिवाळ्यात एक रशियन युवकांचं शिष्टमंडळ दिल्लीत आलं होतं. त्या वेळचे नभोवाणीमंत्री विद्याचरण शुक्लांनी त्यांच्या सन्मानार्थ एक पार्टी आयोजित केली होती. मला आणि इनामला आमंत्रण होतं. इनाम हा फाटक्या तोंडाचा माणूस आहे. तो कुणाचीही तमा न बाळगता बिनधास्तपणे बोलत असतो. त्या पार्टीत त्याने सरळ संजयला गाठलं आणि म्हणाला, ' साब, जरा हॉकी को भी ठीक कर दो ! '

' बहुत पॉलिटिक्स है ' असं संजय म्हणाला आणि पुढं सटकला. त्याच्या उत्तरानं मी चक्रावून गेलो तो माणूस अराजकवाद्यांच्या विरुद्ध लढत होता. भारतीय राजकारणात एक नवं पर्व सुरू करू पहात होता. असा माणूस हॉकीत चिक्कार राजकारण आहे म्हणून हॉकीच्या भानगडीत पडू इच्छीत नव्हता. एक तर हॉकीला त्याच्या लेखी फारसं महत्त्व तरी नव्हतं किंवा संजयसारख्या डॅशिंग माणसाला ही हॉकीतली दलदल साफ करणं कठीण वाटत असावं.

दुसराच तर्क बरोबर असावा. कारण त्याच्या मातोश्रींप्रमाणेच संजयला भारताने क्रीडाक्षेत्रातही जागतिक कीर्ती मिळवावी असं वाटत होतं. त्या काळातल्या अनेक युवकांप्रमाणे मलासुद्धा संजयच्या व्यक्तिमत्त्वानं भुरळ घातली होती.

१९७७ साली सर्व विरोधी पक्षांनी एकजूट करून जनता पक्ष स्थापन केला आणि सत्ता मिळवली. ज्यांच्या हातात सत्ता गेली, त्या पुढाऱ्यात सिकंदर बख्तही होते. हे कालचे दिल्लीचे हॉकीपटू ! त्यांना माझी युवक काँग्रेसवरची निष्ठा भयंकर खुपली असावी. मी संजयवादी, इंदिरावादी आणि जनता विरोधी, म्हटल्यावर माझ्यापुढे अडचणी उभ्या रहाणार ह्याची मला खात्री होती. युवक काँग्रेसच्या कित्येक नेत्यांना आणि कार्यकर्त्यांना जेलची हवा दाखवण्यात आली. मला मिळालेली शिक्षा वेगळी होती. पुन्हा एकदा भारतीय संघातली ' जागा ' मला ' खाली ' करावी लागली ... मी बहिष्कृत झालो होतो.

ब्यूनोस एयर्सच्या विश्वचषकस्पर्धेची तयारी सुरू झाली होती. शिबिरासाठी मला अर्थातच आमंत्रण नव्हतं. पुन्हा मला एकटेपण

जाणवायला लागलं. नैराश्य आपल्याला गिळून टाकतंय अशी भावना व्हायला लागली. माझ्या कारकीर्दीत कित्येक वेळा मी लाथाडला गेलोय; पण नैराश्येनं मी असा कधीही ग्रासला गेलो नव्हतो. आता पुन्हा उठणंच कठीण आहे असं वाटायला लागलं.

मानसिक ताणामुळं मी आजारी पडलो. मला भलताच ताप चढायचा. मी एकटा आणि अंगात चारपर्यंत ताप. विचार करा काय अवस्था झाली असेल ! मी बाथरूमला जायला उठलो की, संपूर्ण खोली माझ्याभोवती गरगर फिरतेय असं वाटायचं.

## ठीक कर दूंगा !

एके दिवशी तापानं मी फणफणलो असताना, कबरीतून उठून वडील माझ्याकडे चालत येतायत असा मला भास झाला असा भास मला पूर्वी फक्त एकदाच झाला होता. माझ्या मोठ्या बहिणीच्या लग्नाच्या वेळी तिच्या वरातीच्या पॉश गाडीत मला बसायचं होतं. इतक्यात हात उगारत माझ्याकडे येणारे वडील दिसले. 'मला गाडीत नाही बसायचं, मला मारू नका. मी तुमचा छोटा मुलगा अस्लम आहे.' मी ओरडलो. तरीही वडील जवळ येतच होते. मी संरक्षणासाठी हात उचलण्याचा प्रयत्न केला; पण जमलं नाही. ते जवळ आले, डोक्यावर हात ठेवला आणि निघून गेले.

मी दचकून जागा झालो. माझं संपूर्ण शरीर थरथरत होतं. अंगाला दरदरून घाम सुटला होता.

मला ते न्यायला आलेत का ? मी आता मरणार ? माझा शेवट आता जवळ आलाय ? असे अनेक प्रश्न डोक्यात उठत होते.

दुसऱ्या दिवशी अंगात त्राण नसतानाही मी उठून अंघोळ केली आणि अल्लाकडे प्रार्थना केली किमान तो तरी डॉ. लंका शिवाजीच्या मदतीला धावून जाईल अशी आशा वाटून ! त्या दिवशी डॉक्टरांनी मला स्पष्टपणे सांगितलं, 'मियाँ, तुला काहीही झालेलं नाही. काहींचा आजार डोक्यात असतो, काहींचा हृदयात असतो. तुझा पोटात आहे. तुला घरचं जेवण मिळत नाही. का लग्न करून टाकत नाहीस ? बघ आजारपण चटकन् दूर पळेल !'

ऑफिसला गेल्यावर मला समजलं की, आमचा इंडियन एअरलाइन्सचा संघ जॉन केनेडी हॉकी स्पर्धा खेळण्यासाठी वॉशिंग्टनला जातोय आणि तिथून मग ब्युनोस एयर्सला जाणार आहे. आमच्या संघात तसा दम नव्हता. चांगले खेळाडू शिबिराला गेले असल्यामुळं संघ कमजोर झाला होता. जुन्या मंडळींपैकी फक्त मी आणि अशोक होतो.

तिथे पतियाळाच्या शिबिरातही धमाल चाललेली होती. तब्बल पन्नास खेळाडूंना बोलावलं होतं, तरीही शिक्षण आणि क्रीडाखात्यातर्फे एक कमिटी स्थापन करून काही वगळलेल्या अनुभवी खेळाडूंना आमंत्रण देण्याच्या ऑर्डर्स निघाल्या. त्यात 'अशोककुमार' आणि 'अस्लम शेरखान'चाही समावेश होताच. पुढे त्या पतियाळाच्या शिबिरातून सुरजीतसिंग, बलदेवसिंग आणि वीरेंद्रसिंग, पक्षपाताचा आरोप करून बाहेर पडले. सुरजीतनं तर कलकत्त्याच्या एका मासिकाला दिलेल्या मुलाखतीत चक्क म्हटलं होतं,' शीखसुद्धा भारतीयच आहेत हे विसरू नका !'

त्या भानगडीनंतर मी इनाम आणि के. पी. रॉय, सिकंदर बख्तना भेटलो. त्यांनी मला विचारलं, 'तू शिबिराला का गेला नाहीस ?' माझं उत्तर सरळ होतं. आजपर्यंत मी कित्येक शिबिरांना गेलोय, राष्ट्रीय संघात माझी निवड झालीय; पण स्पर्धेच्या वेळी हात चोळत बाहेर बसायची पाळी माझ्यावर अनेकदा आलीय. मागच्या अनुभवावरून मी शहाणा झालोय. ह्यापुढं मला माझी कुठल्याही प्रकारची मानहानी होऊन द्यायची नाही ! गेल्याच वर्षी मी राष्ट्रीय संघाचं नेतृत्व केलं होतं आणि त्यानंतर पुन्हा माझ्यावर तिथं जाऊन संघाबाहेर बसण्याची पाळी आली तर तो निव्वळ माझाच नाही तर भारतीय संघाचा अपमान होईल. विश्वचषकांच्या सामन्यात माझी निवड शंभर टक्के होणार त्याची खात्री तुम्ही देत असाल तरच मी शिबिरात जातो !'

माझ्या ह्या उत्तरानं सिकंदर बख्त एकदम खवळले. 'ठीक कर दूंगा !' ते सतत हेच वाक्य बडबडत राहिले. 'तुला पुन्हा भारतातर्फे कधीच खेळता येणार नाही अशी व्यवस्था मी करतो' अशी वर धमकीही त्यांनी मला दिली.



अस्लम आणि रेहाना

¤

## माझे दिवस बदलले !

ह्या वेळी तुला 'हॉकीतून उठवतो' अशी धमकी 'माझ्याबरोबर झोप' असं सांगणारा विकृत कोच देत नव्हता. जनता शासनाचा एक सन्मानीय मंत्री मला हॉकीतून उठवायला निघाला होता.


निरंतर आगेकूच
९ व्या अशियाई क्रीडा महोत्सवाचे संयोजक म्हणून आपण जे यश मिळविले त्याबद्दल साऱ्या जगातर्फे भारतावर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.
ठराविक मुदतीत क्रीडा मैदाने उभारण्यात आली. देशात तसेंच देशाबाहेर लक्षावधि घरांतून लोकांना, रंगीत दूरचित्रवाणीवर क्रीडा स्पर्धा आणि सामने पाहणे शक्य झाले. गणकयंत्रे, विद्युतकण विस्तार केंद्रे, मॅक्रो-व्हेव आणि उपग्रह शृंखला यांचा प्रचंड विस्तार करून त्यांचा विविध सेवांसाठी सुरळीत आणि कार्यक्षमतेने उपयोग करण्यात आला.
संघटित, परिश्रम करून काय शक्य आहे, याचे हे प्रत्यक्ष उदाहरणच आहे.
याच प्रेरणेने जर आम्ही परिश्रम केले तर राष्ट्रीय विकासाच्या अनेक क्षेत्रांतहि,असेच भरघोस यश मिळविणे शक्य आहे.
खांद्याला खांदा लावून करू काम
आपुल्या राष्ट्राला करू बलवान
davp 82/568

'आम्हीही बघून घेऊ !' मी म्हटलं आणि आम्ही त्यांच्या निर्मल-भवनामधल्या ऑफिसमधून बाहेर पडलो.

आता माझ्यापुढं दोनच पर्याय राहिले होते : एक तर सरळ गुडघे टेकून शरणागती पत्करायची, नाही तर डोळ्यातले अश्रू आणि चढलेलं रक्त पुसून अन्यायाविरुद्ध झगडायचं.

मी दुसरा पर्याय स्वीकारला.

१ ऑगस्ट १९७७ ला मी दिल्ली दूरदर्शनला मुलाखत दिली. मुलाखतीत मी फेडरेशनवर कडाडून हल्ला चढवला. 'शासन, फेडरेशन खेळाडूंवर करत असलेल्या अन्यायाविरुद्ध काहीही करत नाही. ह्याचा अर्थ शासनाचीही ह्या अन्यायाला मूक संमती आहे !' असंही वर बोललो.

सिकंदर बख्तच्या अंगाची लाही लाही झाली असावी. त्यानं मला प्रत्युत्तर देण्यासाठी दूरदर्शनला मुलाखत दिली. आता युद्ध सुरू झालं होतं.

माझी वाट आता काटयाकुटयांनी भरलेली आहे ह्याची मला पूर्ण कल्पना होती. वॉशिंग्टनला जाणारा इंडियन एअरलाइन्सचा संघ जाहीर झाला. माझं आणि अशोकचं नाव त्यात नव्हतं. का ? कारण फेडरेशनची आमच्या नावाला मान्यता नव्हती. मी आमचे मॅनेजिंग डायरेक्टर महेश सरीनना गाठलं आणि स्पष्टपणे सांगितलं, 'इंडियन एअरलाइन्सनंही आम्हाला जर लाथाडलं तर आमची भलतीच इज्जत जाईल !' त्यांनी मला सांगितलं, 'नंतर भेट, बोलू या !'

शेवटी असं ठरलं की, संघानं पुढं जायचं आणि आम्ही फेडरेशनचे अध्यक्ष रामस्वामींची भेट घेऊन, त्यांच्याकडून मान्यता मिळवून वॉशिंग्टनला प्रयाण करायचं. आम्ही रामस्वामींना फोनवर गाठलं. आमच्या सेनगुप्तांनी आमची केस त्यांच्या समोर मांडली आणि अचानक फोन डिसकनेक्ट झाला; पण आम्ही प्रयत्न सोडला नाही. त्यांची नंतर मद्रासला जाऊन भेट घेतली. रामस्वामीनं मला दूरदर्शनवरच्या मुलाखतीतल्या टीकेबद्दल फैलावर घेतलं. अशोक गप्पच बसला. मी सरळ सांगितलं, सत्य मांडायला कशाला भ्यायचं ? बराच वेळ वादविवाद झाला. शेवटी त्यांनी परवानगी दिली.

मी वॉशिंग्टनवरून परतल्यावर भारतातली राजकीय परिस्थिती बदलत होती. हे जनता-शासन आमच्या हॉकीसंघासारखं होतं. त्यांच्याकडे बुद्धिमान नेते होते; पण भयंकर अहंकारी ! सत्तेसाठी हपापलेले ! सांघिक वृत्तीचा तिथेही अभावच होता आणि शिबिरातून बाहेर पडणाऱ्या आमच्या हॉकीखेळाडूंप्रमाणे जनता पक्षातली काही मंडळीही पक्षातून बाहेर पडण्याची धमकी वारंवार देत होती.

वॉशिंग्टनहून परतल्यावर मी मिळालेल्या प्रत्येक व्यासपीठावरून हॉकी फेडरेशनवर टीकास्त्र सोडायला सुरुवात केली. काही वर्तमानपत्रांनीही मला चांगली साथ दिली.

असाच एके दिवशी संध्याकाळी नॅशनल स्टेडियमवर मला बिशनसिंग बेदी भेटला. त्यानं मला उपदेश केला की, तू हॉकी खेळाडूंची संघटना स्थापन कर, त्याशिवाय तुझ्याकडे कुणीही लक्ष देणार नाही. मी त्यासंबंधी अनेक हॉकीपटूंशी बोललो; पण कुणीही रामस्वामी आणि कंपनीचा राग ओढवून घेण्याच्या मनस्थितीत नव्हते. शेवटी एका मित्रानं मला सल्ला दिला-' उगाच भिंतीवर आपटून घेऊ नकोस - 'तिला' पुन्हा सत्तेवर येऊ दे !'

आणि १९८० च्या जानेवारीत 'ती' सत्तेवर पुन्हा आली. माझे दिवस बदलले !

## तू लग्न कर !

दूरदर्शनवर एक क्रीडा-कार्यक्रम ठरवण्यासाठी दूरदर्शनच्या स्वदेशकुमारनं मला बोलावून घेतलं. जयदेवसिंग आणि जोगाराव ह्या समालोचकांप्रमाणे स्वदेशकुमारही माझा चांगला मित्र आहे. माझा मैदानावरचा पराक्रम ह्यांनीच घरोघरी पोचवला होता. दूरदर्शनकेंद्रावरून बाहेर पडल्यावर मी सहज बाजूच्या आमच्या एअरलाइन्स ऑफिसात डोकावलो. तिथे एम्. जे. अकबर भेटला. आम्ही त्याला फक्त 'एम्जे'च म्हणतो. माणूस मोठा आहे. प्रत्येक अन्याय तो 'संडे'च्या पानातून वेशीवर टांगण्याचा प्रयत्न करतो. तो मला म्हणाला, 'अस्लम, तू राजकारणात का शिरत नाहीस ? तिथून तू क्रीडाक्षेत्रातली घाण फार लवकर काढू शकशील !' ही कल्पना माझ्या मेंदूत खोलवर रुतली. मी सजयच्या विश्वासातल्या काही मित्रांशी बोललो आणि लगेच मध्यप्रदेश विधानसभेचं तिकिट मला मिळालं. मला तिकिट मिळाल्यावर इतर काँग्रेसवाल्यांच्या पोटात दुखायला लागलं ... परिणाम ? मी निवडणुकीत साफ आडवा झालो ! माझा अहंकार दुखावला गेला होता. मला घराबाहेर पडायला लाज वाटत होती.

अम्मालाही भयंकर दुःख झालं ... तिचा दुःखावरचा उतारा वेगळा होता. 'तू आता लग्न कर !' तिनं माझ्यापाठी टुमणं लावलं. 'अल्लाच्या कृपेनं तुझ्या वडिलांची इच्छा मी पूर्ण केलीय. तू आता माझी इच्छा पूर्ण कर ! ...मरण्यापूर्वी नातवाचं तोंड पाहू दे !'

पण माझ्या आणि अम्माच्या पसंतीस पडेल अशी मुलगी लवकर सापडणं कठीणच होतं. माझ्या अपेक्षा माफक होत्या; पण अम्माच्या ? तिला उंच, अंगापिडानं व्यवस्थित आणि मुख्य म्हणजे पोटाकडचा भाग 'रुंद' असलेली मुलगी हवी होती. तो भाग रुंद असला की दणकट मुलं जन्माला येतात अशी तिची समजूत ..

'मुलीचा' शोध जोरदार चालला होता...ती अखेर भेटली; पण भारतात नाही. थेम्सनदीच्या किनाऱ्यावर लंडनला ! तिचे वडील भारतीय मुस्लिम; पण वडलांची भाषा तिला येत नव्हती. प्रॉब्लेम ! सुरुवातीच्या नुसत्या हावभावांनी कम्युनिकेशन व्हायचा. आम्ही चक्क मूकनाट्याच्या काळात जाऊन थडकलो होतो.

लग्नानंतर रेहना आणि अम्माला एकमेकांची भाषा कळत नाही, ह्याचा मला फार आनंद झाला. त्यामुळं सासू-सुनेच्या झगडयाची चिंता नव्हती. ही भाषेची भिंत माझ्या पथ्यावरच पडली. विशेषतः आमच्या सासूबाई मुलीच्या बाळंतपणासाठी लंडनहून आल्यावर त्याचं महत्त्व जास्तच पटलं...

कोठारी नर्सिंग होमच्या पॅसेजमध्ये मी अस्वस्थ होऊन फेऱ्या घालत होतो. कधी एकदा कानावर 'टँहँ' पडतंय असं झालं होतं...हॉकीच्या मैदानावर जी माझी अवस्था असायची तीच इथं होती...फक्त तिथं संघात घेतील की नाही ही चिंता असायची. इथं मुलगा की मुलगी हा प्रश्न पडला होता...

मला मुलगाच झाला ! ...माझा आनंद गगनात मावेना...मुलाच्या

रूपानं माझ्या वडलांनीच पुन्हा आमच्या घरात प्रवेश केलाय असं वाटायला लागलं...मुलाचं नाव आम्ही अक्रम शेरखान ठेवलं.

माझ्या मुलाचा जन्म १७ ऑगस्ट १९८२ चा आणि त्यानंतर बरोबर १५ दिवसांनी स्वातंत्र्यानंतर प्रथमच स्वतंत्र क्रीडा-खात्याचा 'जन्म' झाला! सरदार बुटासिंग भारताचे पहिले क्रीडा-मंत्री. मी आणि रेहनानं त्यांचं अभिनंदन केलं. त्यांनी अभिनंदनाची परतफेड केली आणि म्हटलं 'मुलाचं नाव तुम्ही 'एशियाड महमद-खान' ठेवलं पाहिजे!'

ह्याच काळात एका भयानक हत्याकांडानं आम्ही शहारून गेलो. हत्याकांड दूर लेबेनॉनमध्ये घडलं; पण त्याचा धक्का इथं भारतातही जाणवला. पॅलेस्टिनी पुरुष, बायका आणि निष्पाप मुलांचीही क्रूर हत्या करण्यात आली होती. ह्या हत्याकांडावर खुद्द ज्यू मंडळीही स्वतःच्या बांधवांवर वैतागली, बंड करून उठली. म्युनिकमध्ये इस्रायली खेळाडूंची हत्या झाली होती तेव्हा मी ओक्साबोक्सी रडलो होतो...मला आज त्यांची घृणा वाटत होती प्रजोत्पादन करता येऊ नये म्हणून पुरुषांची 'लिंगं' त्यांनी कापली, स्त्रियांचे स्तन उडवले आणि निष्पाप मुलांनी पुढं मोठेपणी स्वतःचा प्रदेश मागू नये म्हणून त्यांना चिरडून टाकलं!

ह्या बुद्धिमान वंशाच्या मंडळींची ही वागण्याची क्रूर पद्धत मला समजू शकत नव्हती.फरोदा त्यांचा नायनाट करू शकला नाही.हिटलरही त्या वंशाचं समूळ उच्चाटन करू शकला नाही. माणसाला मारता येतं; पण संपूर्ण वंश उध्वस्त करता येत नाही, हे स्वानुभवावरून माहीत असूनही हा मूर्खपणा ते का करत होते? हिटलरच्या अत्याचारातून वाचलेली मंडळी आता त्याहीपेक्षा भयानक अत्याचार पॅलेस्टिनींवर करत होते...

माझ्यासारखे अनेक अहिंसक भारतीय ह्या अत्याचाराची नुसती वर्तमानपत्रातली वर्णनं वाचून नखशिखांत शहारले होते...

## त्याला उचललं आणि बाहेर पडलो

माझ्या मुलाचा 'आक्वीका' करायचं आम्ही ठरवलं. हा समारंभ म्हणजे हिंदूंमध्ये लहान मुलाचं 'जावळ' काढतात, तसलाच प्रकार! आम्ही त्या वेळी त्याचं नावही ठेवतो. ह्या समारंभाला नातेवाईक, मित्रमंडळी अगदी संध्याकाळपर्यंत होती. संध्याकाळी हळूहळू सर्व मंडळी परतायला लागली. तरीही काही बायका रेंगाळतच होत्या. बायकांना ही सवयच असते. दिवसभर गप्पा मारूनही त्यांच्या गप्पा संपत नाहीत. अगदी निघतानाही दरवाज्यात त्या गप्पा मारत उभ्या असतात!

सर्व मंडळी निघून गेल्यावर अम्मा तिच्या प्रार्थनेला लागली. तिकडे माझ्या बहिणींनी रेहनाचा ताबा घेतला होता. लंडनमधल्या एकंदर लाइफ-स्टाइलची विचारपूस चालली होती. मी माझ्या मुलाला उचललं आणि घराबाहेर पडलो. बाहेर टॅक्सी पकडली आणि सैफिया कॉलेजपाशी उतरलो. तिथून सरळ कब्रस्थानाकडे चालायला सुरुवात केली. उभ्या आयुष्यात मी तिथं फक्त एकदाच गेलो होतो, कोल्हापूरहून आल्यावर! वडलांवर अंत्यसंस्कार करायलाही मला नेलं नव्हतं...कारण त्या वेळी मी तसा लहान होतो.

लहान मुलाला कब्रस्थानात नेणं कदाचित अम्माला आणि रेहनाला आवडलं नसतं. मूर्खपणाचं वाटलं असतं; पण मला तसं वाटत नव्हतं. मी त्याला त्याच्या उगमापाशी घेऊन जात होतो.

फुटलेल्या पाइपातून पाण्याचे फवारे उडावेत असे अनेक वेगवेगळ्या विचारांचे फवारे माझ्या डोक्यातून उडत होते...

माणसांची 'परंपरा' म्हणजे काय असतं? माझी परंपरा काय आहे? जी माझ्या आजोबांनी माझ्या वडलांसाठी ठेवली आणि वडलांनी माझ्यासाठी......

या प्रश्नांची उत्तरं माझ्या आकलनापलीकडची आहेत. मला अनुभवानं फक्त एवढंच ठाऊक आहे की, शास्त्रीय शोधामुळं जन्मावर नियंत्रण ठेवता येतं, मृत्यूवर येत नाही; पण माणूस तरीही जन्म घेतो आणि मरतो. दरम्यानच्या काळात काहीजण नाव कमावतात, काहीं पैसा, तर काही मानसन्मान, तर काही फक्त बाराव्या खेळाडूप्रमाणे संधीची वाट पहात बसतात, देवाकडे करुणा भाकत!

लहानपणी मी रात्री उठायचो आणि बाजूला झोपलेली आई जिवंत आहे की नाही ते पहायचो. तिची छाती वर-खाली होताना दिसली नाही, तर कान लावून छातीचे ठोके ऐकण्याचा प्रयत्न करायचो. एके दिवशी आईला जाग आली आणि तिनं मला मिठीत घेतलं आणि विचारलं, 'तू असं का करतोस?' मीसुद्धा तिला सांगून टाकलं की, 'तू जिवंत आहेस की नाहीस ते पहातो!' वडील गेले,निदान तू तरी मला सोडून जाऊ नकोस!'मला त्या रात्री अम्मानं समजावून सांगितलं– 'मलाही आई होती आणि माझंही तिच्यावर खूप प्रेम होतं. माझ्या आईलाही आई होती आणि तिचंही आईवर प्रेम होतं; पण तिलासुद्धा जगातून जावं लागलं!'

जन्माला येणारा प्रत्येक माणूस कधी तरी मरणार हे तिनं हळूच माझ्या मनावर बिंबवलं; पण तरीही एक प्रश्न मला सतावतोच!

माणूस जन्माला का येतो? त्याला मरावं का लागतं?

मी कब्रस्थानात शिरलो आणि वडलांच्या कबरीपाशी थांबलो. ह्या वेळी माझ्या डोळ्यांत अश्रू नव्हते. मी मुलाला कबरीपाशी ठेवलं.

माझ्या मुलानं त्याच्या आजोबांपासून स्फूर्ती घ्यावी अशी माझी इच्छा होती.

आयुष्यात पराभव होऊनही मन न खचू देण्याची स्फूर्ती!

आणि बापाप्रमाणेच एखादं ध्येय पकडून थेट नरकापर्यंत जाण्याची स्फूर्ती!

मी खाली वाकलो. वडलांचा माझ्या गळ्यात इतके वर्षं घातलेला ताईत मी मुलाला बांधला. त्याला उचललं आणि कब्रस्थानातून बाहेर पडलो!

**स मा प्त**

# ती. अक्का

**एक सत्यकथा**

## माणूस वासंतिक अंकात

जमखिडीच्या एका आपटे कुटुंबातील भावंडांची अक्का ही मोठी बहीण. तिचं नाव यमुना. वडिलधाऱ्यांना यमू. शेजाऱ्या-पाजाऱ्यांना यमनाक्का.

अक्काचं लग्न लहानपणीच झालं. तिचं सासरचं नाव पार्वती. आडनाव शिंत्रे. लग्नानंतर ५–७ वर्षांतच या अक्कावर वैधव्य कोसळलं. अक्का पुन्हा माहेरी आपट्यांच्याच घरी राहिली. तेव्हाच्या रिवाजाप्रमाणे अक्काचे दीर तिला वर्षाकाठी १८ रु. पोटगी पाठवायचे. पाच भाऊ आणि तीन बहिणी या सर्व भावंडांची आणि त्यांच्या मुलानातवंडांची ही अक्का होती तरी कशी ?

अक्काच्या वहिनी शारदाबाई आपटे यांनी सांगितलेल्या आठवणींतून अक्काचं एक प्रखर, भावपूर्ण चित्र डोळ्यासमोर उभं राहतं. मनोविजयाची एक उंच पातळी या अक्कानं गाठली होती.

पुण्याच्या विद्यार्थी साहाय्यक समितीचे संस्थापक, शैक्षणिक क्षेत्रातील एक तळमळीचे कार्यकर्ते श्री. अच्युतराव आपटे यांनी या आठवणी – आजच्या पिढीला कल्पनाही येणार नाही अशी ती. अक्काची सत्यकथा–एक-दीड वर्षापूर्वी माणूसकडे सोपविली; पण प्रसिद्धीचा योग जमू शकला नव्हता.

अक्काच्या आठवणींची ही सत्यकथा आता प्रसिद्ध होत आहे– माणूस वासंतिक अंकात.

□

मागच्या पिढ्यांमधील कित्येक घरांत अशा एखाद्या अनासक्त, त्यागमयी अक्कामुळं ती ती घरं टिकून राहिल्याची उदाहरणं सहज सापडतील.

आज आजूबाजूच्या घरांत काय दिसतं ?

नेमकं याच्या उलट चित्र आजच्या व्यक्तिवादी समाजात दिसतं. घरातली माणसं एकमेकांपासून मनानं दूर चालली आहेत. घराच्या विघटनाचा वेग वाढलाय, घटस्फोटांचं प्रमाण वाढलंय, एक नवी संस्कृती मूळ धरायला लागलीय – विभक्त संस्कृती.

या पार्श्वभूमीवर अक्का कोणत्या तरी दुसऱ्याच जगातली वाटते. आताचा काळ – स्त्री-स्वातंत्र्याचा, आर्थिक स्वावलंबनाचा आणि विभक्त जगण्याचा !

याचा वेध घेणारा एक खास विषयही वासंतिक अंकातच–

# पाया हादरलेली घरं

# माणुसकीचा झरा

दुर्बल घटकांच्या आर्थिक विकासासाठी भारताच्या पंतप्रधान श्रीमती इंदिरा गांधी यांनी जाहीर केलेले ' २० कलमी आर्थिक कार्यक्रम म्हणजे माणुसकीचे झरेच. ' मिंटी म्हणजे असाच एक माणुसकीचा झरा---

आज सगळीकडे पाण्याची वानवा असताना मिंटीमुळे किती लोकांना जीवन मिळाले त्याची थोडी झलक---

- खेड्यातील पाण्याचा प्रश्न सुटावा म्हणून कूपनलिका करून देणाऱ्या **पंधरा** तरुणांना रिग्जसाठी **अडीच कोटी** रुपये दिले आहेत व त्यामुळे आजपर्यंत हजाराचेवर विहिरींची निर्मिती.
- **तेरा हजार** लहान शेतकऱ्यांना नवीन विहिरी खोदण्यासाठी व पंपसेट वा ऑइल इंजिने बसविण्यासाठी **दहा कोटी** रुपयांचे आर्थिक सहाय्य देऊन सुमारे **पन्नास हजार** एकर जमीन ओलिताखाली आणली आहे.
- नवीन **एकतीस हजार** शेतकऱ्यांना विजेची कनेक्शन्स मिळावीत म्हणून महाराष्ट्र व मध्यप्रदेश राज्य विद्युत् मंडळांना **साडेपाच कोटी** रुपयांचे कर्ज.
- वेठबिगारीतून मुक्त झालेल्या **दोनशेसहा** मजुरांना पुनर्वसनासाठी **सात लाख** रुपयांचे आर्थिक सहाय्य.
- अनुसूचीत जाती व वनवासी जमातीच्या **छत्तीस हजार** दुर्बल व्यक्तींना शेती, दुग्धव्यवसाय, कुक्कुटपालन व इतर ग्रामीण व्यवसायासाठी **साडेआठ कोटी** रुपयांचे आर्थिक सहाय्य. **या पैकी** वीस हजार लोकांना हे कर्ज केवळ ४ टक्के व्याजदराने दिले आहे.
- एकात्म ग्रामीण विकास योजनेखाली **चोवीस हजार** दुर्बल व्यक्तींना **साडेसात कोटी** रुपयांचे आर्थिक सहाय्य.

**मिंटी म्हणजेच महाबँक**

**महाबँक म्हणजेच माणुसकीचा झरा---**

## बँक ऑफ महाराष्ट्र

**[ भारत सरकारचा उपक्रम ]**



**मुख्य कचेरी : " लोकमंगल " १५०१, शिवाजीनगर, पुणे – ४११ ००५**